म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. १६०३
१६६५

# वक्तृत्व स्पर्धांतील

# गाजलेली भाषणे

म. अ. कुलकर्णी

REFBK-0014393

डायमंड ... सांगली

वक्तृत्व स्पर्धातील

# गाजलेली भाषणे

लेखक

म. अ. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९.८३.९३

डायमंड बुक स्टॉल : सांगली

आवृत्ती पहिली
२५ सप्टेंबर १९६५
घटस्थापना

सर्व हक्क स्वाधीन

किंमत रुपये तीन

मुखपृष्ठ
दत्ता महाबळेश्वरकर

प्रकाशक
**मा. ना. गाडगीळ**
डायमंड बुक स्टॉल,
मारुती चौक, सांगली

मुद्रक
**वि. ग. माटे**
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे २.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४००४६ वि: निबंध
क्रमांक ९६०३ नों: दि: २८।१४६९

सिटी हायस्कूल व
विलिंग्डन महाविद्यालय
येथील—
माझ्या आवडत्या व आदरणीय
गुरुजनांच्या चरणी—



# आ शी र्वा द

संरक्षणमंत्री

अनेक विद्यार्थ्यांना वक्तृत्वाची आवड असते आणि त्याची जोपासना झाली तर ते उत्कृष्ट वक्तेही होऊ शकतात. ही जोपासना तरुणपणीच होते. पाठांतरासारख्या गोष्टी लहानपणीच सहज साध्य होतात. पाठांतराबरोबरच वक्तृत्वासंबंधी योग्य मार्गदर्शन त्याला लाभेल तर तो या वक्तृत्वकलेत पारंगत होऊ शकतो.

वक्तृत्वाची कला ही सवयीने येते. त्याचा अभ्यास करीत असताना विद्यार्थ्यांना विषयाची मांडणी कशी करावयाची याची माहिती होणे आवश्यक असते. या दृष्टीने श्री. कुलकर्णी यांचा हा स्पर्धेतील गाजलेला भाषणांचा संग्रह विद्यार्थ्यांना उपयोगी सिद्ध होईल व महाराष्ट्रातील नव्या पिढीला या कलेचा अभ्यास करण्याची स्फूर्ती देईल अशी मला आशा आहे.

माझ्या शुभेच्छा.

यशवंतराव चव्हाण

नई दिल्ली
दिनांक : १-४-६५

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४००४६ वि: निबंध
क्रमांक १६०३ नों दि: २८।१।५६

वाङ् मे मनसि प्रतिष्ठिता मनो मे वाचि प्रतिष्ठितमावि-
रावीर्म एधि ॥ वेदस्य म आणीस्थः श्रुतं मे मा प्रहासी-
रनेनाधीतेनाऽहोरात्रान्संदधाम्यृतं वदिष्यामि ॥ सत्यं
वदिष्यामि ॥ तन्मामवतु तद्वक्त रमवतु अवतु मामवतु
वक्तारमवतु वक्तारम् ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

# माझी वक्तृत्वसाधना

'वक्तृत्वस्पर्धांतील गाजलेली भाषणे' हा माझ्या भाषणांचा संग्रह आज प्रकाशित होतो आहे. गेल्या दहाबारा वर्षांत मी स्वतः, माझा भाऊ आणि माझे विद्यार्थी यांनी केलेल्या काही निवडक भाषणांचा समावेश या संग्रहात केला आहे......

मी जेव्हा जेव्हा माझ्या वक्तृत्वकलेसंबंधी विचार करू लागतो तेव्हा तेव्हा हर्षविषादाचे, सुखदुःखाचे, तृप्तीअतृप्तीचे अनेक प्रसंग माझ्या नजरेसमोर उभे राहतात. मराठी सातवीची परीक्षा पास होऊन सिटी हायस्कूलमध्ये पुढील शिक्षणासाठी सांगलीला आलो. खेडेगावामधून आलेला विद्यार्थी मी, पण विविध खेळांत, स्पर्धांत आपण भाग घ्यावा ही उमेद होती...सिटी हायस्कूलमध्ये त्या वर्षी टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. टिळकांच्या जीवनासंबंधी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वस्पर्धा घेण्यात येणार होत्या. या स्पर्धेसाठी मीही नाव दिलं आणि वडिलांच्या मार्गदर्शनाखाली पाच, सात मिनिटांचं भाषण तयार केलं. ते लिहून काढून चांगलं पाठ केलं. आरशासमोर, भिंतीसमोर कुठंही उभा राहून मी ते न चुकता म्हणून दाखवू लागलो. आपलं भाषण उत्तम होणार अशा आत्मविश्वासानं मी एक ऑगस्टच्या त्या कार्यक्रमासाठी गेलो.

विद्यार्थ्यांनी सारं सभागृह तुडुंब भरलं होतं. सारे शिक्षक त्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते....काही निमंत्रितही आले होते. वक्तृत्वस्पर्धेला आरंभ झाला. ...माझा क्रमांक येताच मी व्यासपीठावर जाऊन उभा राहिलो "सन्माननीय परीक्षक, उपस्थित शिक्षक आणि माझ्या बंधुभगिनींनो, मी टिळकांच्यासंबंधी जे चार शब्द सांगणार आहे ते आपण शांतचित्ताने ऐकून घ्यावेत अशी माझी नम्र विनंती आहे"... एवढं एकच वाक्य मी कसंबसं उच्चारलं आणि काय झालं कोण जाणे, आपल्या पायाखाली भूकंपाचे हादरे बसताहेत असा भास व्हायला लागला. पाय थरथरायला लागले... मी त्यांना जोरजोरात रेटून ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करू लागलो... तो ते जास्तच जोरानं थरथरायला लागले... सारी मुलं हसायला लागली... टाळ्या पिटू लागली मी तर घाबरून गेलो. सारं अंग लटलटायला लागलं... सारं सभागृह आपल्या भोवती फिरतं

आहे... भिंती अंगावर कोसळताहेत... जमीन वर आणि छप्पर खाली होत आहे... असं विलक्षण दृश्य नजरेसमोर दिसू लागलं !... मी धाडकन स्टेज-वरून उडी टाकली आणि सरळ घरचा रस्ता सुधारला...

...पुढं जवळजवळ वर्षभर कुठं कशातही भाग घेतला नाही. पण मनातून सारखं वाटे, आपल्याला बोलता आलंच पाहिजे. आपण पुन्हा प्रयत्न केले पाहिजेत...पण मनातून भीती काही केल्या जात नव्हती. खूप एकलकोंडा बनलो होतो. स्वतःच्या करमणुकीसाठी नानाविध पुस्तकं, मासिकं, वृत्तपत्रं वाचीत होतो.

सुदैवानं पुढल्या वर्षी आमच्या शाळेत वसंत अ. कुंभोजकर हे शिक्षक म्हणून आले. विद्यार्थ्यांच्या अंगचे कलागुण चाणाक्षपणानं शोधून त्यांच्या विकासासाठी धडपडणारा इतका चांगला शिक्षक निदान मी तरी दुसरा पाहिला नाही ! हस्ताक्षर आणि लेखन यांमुळं त्यांची मर्जी माझ्यावर बसली. त्यांनी मला हाताशी धरलं. त्या वर्षी टिळक पुण्यतिथीच्या कार्यक्रमात मी पुन्हा भाग घेतला. धाडस करून बोललो. भाषण चांगलं झालं ! माझा आत्मविश्वास दुणावला.

सांगलीला वेलणकर वक्तृत्वस्पर्धा तेव्हा फार मोठ्या प्रमाणावर उत्साहानं आहोत असत. सांगलीमधल्या बहुतेक हायस्कूलमधून या स्पर्धेत विद्यार्थी अहमहमिकेनं भाग घेत असत. त्या वर्षी या स्पर्धेसाठी माझीही निवड झाली. 'नाटककार देवल' या विषयावर भाषणाची उत्तम तयारी केली. ते भाषणही अतिशय गाजलं. अध्यक्ष श्री. गोपीनाथ तळवलकरांनी अध्यक्षीय भाषणात माझ्या भाषणाचा गौरव केला, पण परीक्षक ? त्यांनी 'चौथा' क्रमांक दिला.

तरीही हायस्कूलमध्ये दुसरे दिवशी सत्कार-समारंभ झाला. गौरवादाखल शिक्षक-विद्यार्थ्यांची भाषणे झाली. त्यात प्रत्येकाने परीक्षकांनी माझ्यावर अन्याय केल्याचे सांगितले. आधीच त्या अन्यायाने मनातून जळत होतो. सत्कारातील गौरवाच्या भाषणांनी त्यात अधिक भर पडली. उत्तरादाखल भाषण करताना भावनेच्या आवेगात अखेरी जाहीर प्रतिज्ञा केली की, "पुढल्या वर्षी पहिल्या क्रमांकाची ढाल मिळवेन तरच यापुढे आयुष्यात व्यासपीठावर बोलायला उभा राहीन !"......

पाच सहाशे विद्यार्थ्यांसमोर प्रतिज्ञा तर केली होती ! पुढील वर्षाचा आरंभ होताच मी वक्तृत्वाच्या तयारीला प्रारंभ केला. 'आयत्या वेळची भाषणे'

आणि ' तयारीची भाषणे ' असे दोन प्रकार या वक्तृत्वस्पर्धेत असत. मी आयत्या वेळच्या भाषणासाठी येतील अशा सुमारे दोनशे विषयांची यादी केली. आणि जवळजवळ चार महिने त्या विषयावर रोज एकदोन विषय याप्रमाणं घरीच मुद्दे काढू लागलो. भाषणही करू लागलो. एवढी खात्री झाली की कोणताही विषय ऐनवेळी दिला तरी आपण पाच-सात मिनिटं उत्तम बोलू शकतो. त्या वर्षीच्या वेलणकर वक्तृत्वस्पर्धा जाहीर झाल्या. पुन्हा निवड झाली. ' माझा आवडता विनोदकार—' या विषयावर ' आचार्य अत्र्यांच्या विनोदावर ती ' श्री. कुंभोजकरांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम भाषण तयार केलं. ( कुंभोजकरांची तेव्हा तासगावला बदली झाली होती; तर तयारीसाठी मी सांगलीहून तासगावला जात असे ! ) आणि नशीब... प्रतिज्ञा खरी झाली ! पहिल्या क्रमांकाची ढाल जिंकली ! !

महाविद्यालयात गेल्यावर, वादविवाद-सभा, वाङ्मयमंडळ, कलामंडळ अशा विविध मंडळांचा सेक्रेटरी झालो. बेळगावपासून पुण्या-मुंबईपर्यंत अनेक स्पर्धांत भाग घेतला ! अनेक ठिकाणी पारितोषिकं मिळवली ! अर्थातच त्या काळातल्या माझ्या भाषणांचं स्वरूप फार मर्यादित होतं. स्पर्धेत भाग घ्यायचा तो बक्षीस मिळविण्यासाठीच ही भूमिका होती ! म्हणून विषयाची निवड मोठ्या दक्षतेनं करीत असे. वक्तृत्वस्पर्धेसाठी चार-पाच विषय दिलेले असतात. सारेच चांगलेही असतात, पण विषय चांगला, म्हणून कोणताही मी निवडत नसे. समजा ' विज्ञानाची महती ' आणि 'साहित्याची थोरवी' असे दोन विषय असले तर माझ्या आवडीचा विचार करून मी ' साहित्याची थोरवी ' हाच विषय निवडेन ! आवडीच्या विषयावर बोलताना त्या विषयाशी मला सहज समरस होता येते......

भाषणाची तयारी करण्यासाठी त्या विषयाच्या संदर्भात आवश्यक ती सर्व माहिती जरूर गोळा करावी, पण भाषण तयार करताना मात्र चार सहा मुद्द्यां-खेरीज अधिक मुद्दे असू नयेत. त्या चार सहा मुद्द्यांचीच नीट सुसूत्र मांडणी करावी. त्यासाठी समर्पक उदाहरणं घ्यावीत. आवश्यक तर एखादुसऱ्या अवतरणाचाही उपयोग करावा. काही वेळा विद्यार्थी असंख्य मुद्दे आणि असंख्य अवतरणे यांच्या सहाय्यानंच आपलं भाषण तयार करू पाहतात. ते भाषण म्हणजे अनेक मुद्दे आणि अवतरण यांची एक गोधडी बनते !

वादस्पर्धेतील भाषण करण्यात मला विशेष आनंद वाटे तिथं संघर्ष असतो. इतरांशी विरोध करायचा असतो. इतरांच्या विचारांचं खंडन करायचं असतं! दिलेल्या प्रस्तावाच्या विरुद्ध बाजूनं बोलण्यात आपलं आगळं कसब दाखवता येते असा माझा अनुभव आहे. 'कसेल त्याची जमीन या कायद्यानं जमिनीचा प्रश्न सुटेल काय?' 'गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी ललित साहित्यात समाज-मनाचे प्रतिबिंब पडले आहे काय?' —या वादग्रस्त प्रस्तावात–'नाही' ही विरोधकाची भूमिका मी घेत असे आणि प्रस्तावाच्या बाजूनं बोलणाऱ्या स्पर्धकांची भंबेरी उडविण्याचा प्रयत्न करीत असे. एकदा तर मी माझ्या भाषणाचा प्रारंभ–"या प्रस्तावाच्या बाजूनं बोलणारे आमचे हे विरोधक मूर्ख तरी असले पाहिजेत किंवा अविचारी तरी असले पाहिजेत. कारण ते शहाणे असते तर त्यांनी खात्रीनं आमचीच बाजू घेतली असती! आणि विचारी असते तर आमचं म्हणणं मान्य करून शरणागती तरी पत्करली असती!"– असा केला होता!... वादस्पर्धेत विरोधक मांडूण मांडून कोणते मुद्दे मांडतील याचाच आधी मी विचार करी. त्यांचं खंडन कसं करता येईल याचाही विचार करून ठेवी. कधी आपल्या भाषणाच्या पूर्वार्धात विरोधी पक्षाचीच बाजू व्यवस्थित रीतीने मांडी आणि उत्तरार्धात त्यांतील एकेका मुद्द्याचा यथास्थित 'समाचार' घेई. मात्र वादविवादासाठी व्यासंग हवा, समयसूचकता हवी. आपलंच म्हणंण खरं आहे, हे श्रोत्यांना पटवून देण्याचं कसब हवं!

ही स्पर्धेतील भाषणे करताना प्रा. ना. सी. फडके यांच्या वक्तृत्वाचा आदर्श मी माझ्या पुढे ठेवला होता. भाषणाचा आरंभ, त्याचा विकास, परिणाकारक शेवट या सर्व दृष्टींनी प्रा. फडक्यांची भाषणं त्यांच्या लेखनाप्रमाणंच 'आदर्श' आहेत 'मंथन,' 'गाजलेली भाषणं' आणि 'मित्रहो'। हे प्रा. फडक्यांचे भाषणांचे संग्रह मी त्या वेळी जवळजवळ पाठ केले होते. प्रा. फडक्यांचे शब्दोच्चार, त्यांचे हातवारे यांचीही मी सहीसही नक्कल करीत होतो...पण या साऱ्याचा परिणाम असा झाला की कोणत्याही विषयावर विचार करताना मला चार-सहा मुद्द्यां-खेरीज अधिक मुद्दे सुचेनात आणि पंधरावीस मिनिटांपेक्षा अधिक वेळ भाषणही करता येईना... "तुम्ही प्रा. फडक्यांच्या सारखं हुबेहुब बोलता" ही प्रारंभी प्रारंभी स्तुती ऐकायला बरी वाटे, पण मी प्रा. फडक्यांची केवळ नक्कलच करतो

असा त्या स्तुतीमागे दडलेला निंदेचाही भाग माझ्या ध्यानी येऊ लागला.

हे भाषणाच्या तंत्रमंत्राचं जोखड आणि प्रा. फडक्यांच्या भाषणशैलीचे दृढ संस्कार पुसून काढण्यासाठी मला तितकेच परिश्रम करावे लागले. मी मुद्दाम अगदी विरुद्ध टोकाच्या पद्धतीनं देणाऱ्या वक्त्यांची भाषणं तितक्याच आस्थेनं ऐकू लागलो. त्यांचा अभ्यास करू लागलो, तेव्हा माझ्या हे लक्षात आलं की श्री. भाऊसाहेब खांडेकरांचं भाषण हे मुद्देसूत, सुसूत्र नसेल, पण त्यांचा व्यासंग आणि समाजहिताची त्यांना असणारी कळकळ, दादा धर्माधिकाऱ्यांच्या विचारांतील झेप, जगन्नाथराव जोशांच्या भाषणांतील तेजस्वी देशभक्ती, आचार्य अत्र्यांच्या भाषणातील आवेश आणि विविधता, यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांतील सहजता आणि जनमन जिंकण्याचं कसब...या साऱ्या गोष्टी उत्तम वक्ता होऊ इच्छिणाऱ्यानं आत्मसात केल्या पाहिजेत !

पुढे विषयाचा भरपूर अभ्यास करून भाषण लिहूनबिवून न काढता, केवळ मुद्दे जवळ ठेवून बोलण्याचा–अगदी स्वतंत्ररीत्या माझ्या भाषेत बोलण्याचा मी प्रयत्न करू लागलो. त्याचाही चांगला सराव झाला. वसंत व्याख्यानमाला, विचार विकास मंडळ या संस्थांचा त्या बाबतीत चांगला उपयोग करून घेतला. ही भाषणंही चांगली रंगू लागली, तेव्हा मला वक्तृत्वातलं खरंखुरं समाधान अनुभवता येऊ लागलं. आनंद वाटू लागला.

१९६१ च्या मे महिन्यातली गोष्ट. नुकतंच 'महाराष्ट्र राज्य' स्थापन झालं होतं. जळित पीडितांची कर्ज त्या वेळी माफ करण्यात आली होती म्हणून सांगलीला त्यावेळच्या महाराष्ट्र राज्याच्या मुख्य मंत्र्यांचासत्कार आयोजित केला. त्या सत्कारसमारंभात मला बोलण्याची संधी श्री गणपतराव गोडबोले यांनी मुद्दाम दिली होती. अवघं दहाएक मिनिटांचंच भाषण मी केलं, पण ते इतकं हृदयस्पर्शी झालं की सारी सभा भारावून गेली. खुद्द यशवंतराव चव्हाण गहिवरून गेले. उत्तरादाखल भाषण करताना यशवंतरावांनी माझा मुद्दाम नामोल्लेख केला. कौतुक केलं आणि मी मांडलेल्या विचारांचा परामर्श घेतला. सभा संपल्यानंतर बोलावून घेऊन पाठ थोपटली !... उत्तम भाषण केल्याबद्दल मला आजवर अनेक पारितोषिकं मिळाली, त्या सर्वांत ही शाबासकी –मला अधिक मोलाची अजूनही वाटते !...

वक्तृत्वकला ही इतर सर्व कलांपेक्षा श्रेष्ठ कला आहे, अशी माझी धारणा

आहे. कारण तीत काव्य, नाट्य, चित्र, शिल्प. . . अशा साऱ्यांचा समन्वय झाला आहे. तिचा जनमनाशी साक्षात संबंध आहे. हजारोंची अंतःकरणं जिंकण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे. ते सामर्थ्य आपल्याला आलं पाहिजे. आज लोकशाहीच्या काळात वक्तृत्वकलेची जोपासना चांगल्या आस्थेवाईकरीतीनं केली पाहिजे. त्या दृष्टीनं मी हायस्कूलमध्ये अनेक प्रयोग केले. त्यांना चांगलं यशही आलं ! !

वक्तृत्वस्पर्धेतील गाजलेल्या ' भाषणां ' चा संग्रह माझे मित्र श्री. माधव गाडगीळ उत्साहानं प्रकाशित करीत आहेत. या प्रसंगी माझे हायस्कूलमधील श्री. व. अ. कुंभोजकर, श्री. भा. ल. रानडे, श्री क. श्री. काळे, श्री. भा. द. सहस्त्रबुद्धे व महाविद्यालयांतील—प्रा. एन. के कुलकर्णी, प्रा. अ. के. भागवत, प्रा. मालती किर्लोस्कर, डॉ. वि. रा. करंदीकर इत्यादी मार्गदर्शकांची कृतज्ञतेने आठवण होते आहे. प्रसंगोपात्त केलेल्या चांगल्या भाषणांचे मुक्तकंठाने कौतुक करणारे कवी गिरीश, काव्यविहारी, श्री. के क्षीरसागर, प्रा. अनंत काणेकर, भाऊसाहेब खांडेकर . . . या साऱ्यांच्या आशीर्वादाचेही स्मरण होत आहे. सांगलीच्या ज्ञात-अज्ञात रसिक श्रोत्यांना कोणत्या शब्दांत धन्यवाद देऊ ?... सर्वासर्वांच्या कौतुकांचे आणि आशीर्वादांचे ऋण मी आनंदाने मानतो आहे. एवढ्यासाठीच म्हणतो...

बहुत काय सांगणे ? कृपा लोभ आहेच तो अखंड असो द्यावा !

या संग्रहातील भाषणे माझा भाऊ चि. शशिकांत, विद्यार्थिनी कुमारी शुभांगी सबनीस, कु. विजया सहस्त्रबुद्धे, कुमार निरंजन पोंक्षे, कुमार काशिनाथ महाबळ... यांनी आस्थेने जपून ठेवली होती. ती त्यांच्याकडून मिळाली. त्यांचाही उल्लेख या ठिकाणी केला पाहिजे.

माननीय यशवंतराव चव्हाण यांनी या संग्रहाला आशीर्वाद म्हणून चार शब्द लिहून पाठवले, त्या वेळी झालेला आनंद वर्णनातीत आहे. त्यांचे आभारही कोणत्या शब्दांत मानू ?......

विद्यार्थी, शिक्षक, रसिक या सर्वांना ही पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणारी भाषणे आवडतील अशी अपेक्षा करून हे निवेदन संपवितो !

—म. अ. कुलकर्णी.

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | स्वा. विवेकानंद : व्यक्ती आणि कार्य. | १ |
| २. | माझा आवडता विनोदकार : आचार्य अत्रे. | ७ |
| ३. | मृत्युंजय स्वातंत्र्यवीर सावरकर. | १२ |
| ४. | थोर समाजसेविका – रमाबाई रानडे. | १७ |
| ५. | माझा आवडता कथाकार – रणजीत देसाई. | २२ |
| ६. | म. अण्णासाहेब कर्वे. | २६ |
| ७. | पं. जवाहरलाल नेहरू. | ३१ |
| ८. | मराठी रंगभूमीचे भवितव्य. | ३५ |
| ९. | वृत्तपत्रांचे कार्य. | ४१ |
| १०. | चित्रपट असे असावेत ! | ४६ |
| ११. | आधी सुधारणा कोणाची ? व्यक्ती की समाज ? | ५१ |
| १२. | महाराष्ट्र आजचा व उद्याचा ! | ५६ |
| १३. | नवकथेचे स्वरूप. | ६२ |
| १४. | विद्यार्थी आणि राजकारण. | ६९ |

१५. आजचे शालेय व शाळेबाहेरील शिक्षण आणि संस्कार आदर्श नागरिक निर्माण करणारे आहेत ! † ७५

१६. आजचे शालेय व शाळेबाहेरील शिक्षण आणि संस्कार आदर्श नागरिक निर्माण करणारे आहेत ! ‡ ७९

१७. राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक आहे ! † ८३

१८. राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक आहे ! ‡ ८८

१९. माध्यमिक शाळेत संस्कृत विषयाचे प्राधान्य अलीकडे कमी करण्यात आले आहे हे इष्ट आहे ! † ९२

२०. माध्यमिक शाळेत संस्कृत विषयाचे प्राधान्य अलीकडे कमी करण्यात आले आहे हे इष्ट आहे ! ‡ ९८

---

† ( प्रस्तावाच्या बाजूनें )

‡ ( प्रस्तावाच्या विरुद्ध )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४७०४९ वि: निबंध
दि: २८।१।५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........

१

# स्वामी विवेकानंद : व्यक्ती आणि कार्य

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो ! —*

हिंदीमहासागरामधून एक बोट भारताकडे यावयाला निघाली होती. असंख्य माणसांनी बोट भरून गेली होती. कोणी व्यापारासाठी, कुणी उद्योग-व्यवसायासाठी, कोणी प्रवासासाठी निघाले होते. त्यातच एक ख्रिस्ती धर्मप्रचारक आपल्या धर्ममतांचा प्रचार करण्यासाठी निघाले होते. जगातल्या सर्व मानवांना तारणारा एकमेव धर्म म्हणजे आपला ख्रिश्चन धर्म आणि इतर सर्व धर्म केवळ तुच्छ, टाकाऊ अशी त्यांची समजूत होती. ते धर्मोपदेशक आपल्या आकाशस्थ बापाची थोरवी गात आणि इतरांच्या देवाधर्माची निंदानालस्ती करीत साऱ्या बोटीमधून भटकत होते. त्यांच्या बरोबरच्याच बोटीमधून एक हिंदू संन्यासी प्रवास करीत होता. अंगात कफनी, डोईवर फेटा आणि मुखमंडल असं प्रशस्त की पाहताक्षणी हा कोणी खराखुरा योगी स्वर्लोकामधून अवतरला असावा अशीच कल्पना व्हावी. आदरानं त्यांच्या पायावर मस्तक ठेवावं आणि कृतार्थ व्हावं असाच विचार मनात यावा, पण त्या बिशप महाशयांना हा संन्याशी पाहताच विलक्षण राग आला. अंतरंगी दडलेला द्वेष, मत्सर नागाच्या फड्याप्रमाणे उफाळून वर आला. ते या संन्याशाची निर्भर्त्सना करून हिंदुधर्मावरही गरळ ओकू लागले... 'तुमचा हिंदुधर्म हा रानटी लोकांचा धर्म आहे. लुच्चा, लबाड, लफंग्या लोकांनी सांगितलेल्या

वेडगळ आणि खुळचट, भाकड कथा म्हणजे तुमचा हिंदू धर्म आहे!...' तेव्हा आपल्या चित्ताची शांतता तिळमात्र ढळू न देता तो संन्यासी शक्य तेवढ्या मृदु स्वरात त्यांना म्हणाला—"महाशय, धर्म म्हणजे देवाकडं जाण्याचा मार्ग. साऱ्याच नद्या जशा शेवटी समुद्रालाच जाऊन पोहोचतात, त्याप्रमाणं सारे धर्मपंथ त्या एकाच परमेश्वराची प्राप्ती घडवितात! आपण थोर धर्मोपदेशक आहात. परधर्माची निंदा करणं आपल्याला शोभत नाही!" त्यावर तो धर्मोपदेशक अधिकच भडकला आणि म्हणाला—"एकदा नव्हे, दहादा नव्हे, शंभरदा मी हिंदू धर्माची निंदाच करेन!" तो हा संन्यासी ताडकन् पुढं झाला, त्या बिशपाचा हात खंबीरपणे पकडून म्हणाला, "हिंदुधर्माची निंदा करणारा एक शब्द यापुढं तुमच्या तोंडून निघू द्या-- उचलून समुद्रात फेकून देईन!" संन्याशानं हे चौदावं रत्न दाखवताच बिशपमहाशय खाडकन शुद्धीवर आले. गयावया करून म्हणू लागले,- "माफ करा! माझी चूक झाली!!"... मित्र हो – तो स्वाभिमानी संन्यासी होता —

स्वामी विवेकानंद!

आजच्या स्पर्धेमध्ये मी स्वामी विवेकानंद : व्यक्ती आणि कार्य हा विषय मांडणार आहे. स्वामीजींच्या खऱ्याखुऱ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख व्हावी, अशी आपली इच्छा असेल तर काही महत्त्वाच्या गोष्टी आपण प्रथम पाहिल्या पाहिजेत.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वामी रामकृष्ण परमहंस नावाचे एक अलौकिक थोर सत्पुरुष भारतात होऊन गेले. भक्ती, ज्ञान, कर्म, तंत्र, मंत्र सर्व साधनमार्गांनी त्यांनी परमेश्वराची प्राप्ती करून घेतली होती. इतकेच नव्हे, चोवीस तास ते परमेश्वराच्या आनंदस्वरूपात रमणाम होऊ शकत. पूर्वाश्रमीचे नरेंद्र त्यावेळी महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. मनाच्या समाधानासाठी इतिहास, तत्त्वज्ञानाचीही पुस्तकं वाचीत होते. कॅांट, इलेगेल, शॉपेन हावर, मिल आदि तत्त्वज्ञान्यांची पुस्तके त्यांनी वाचली होती. नरेंद्र पूर्ण बुद्धिवादी होते. परमेश्वरस्वरूपाची स्तुतिस्तोत्रे गाणाऱ्या, परमेश्वराचा अगाध महिमा वर्णन करणाऱ्या प्रत्येक विद्वान-पंडिताबरोबर ते वादविवाद करीत. त्या वादातून त्यांच्या शंकांचा उपशम कधीच झाला नाही. त्यांची अस्वस्थता एकसारखी वाढतच चालली होती. १८८१ साली सुरेंद्रनाथ मित्र यांचेकडे

कसलासा समारंभ होता. या समारंभास स्वा. रामकृष्ण परमहंस आले होते. मित्रांच्या आग्रहावरून नरेंद्रही तिथं गेला होता. समारंभ संपल्यावर सार्‍यांच्या विनंतीवरून नरेंद्रानं तिथं एक पद आपल्या सुरेल आवाजात म्हटलं, ते पद अर्थघन तर होतंच, पण त्याहीपेक्षा नरेंद्रान आपल्या गोड आवाजात अतिशय आर्ततेनं म्हटलं! ते पद ऐकता ऐकता स्वा. रामकृष्णांची भाव-समाधीच लागली. समाधीमधून भानावर आल्यावर त्यांनी नरेंद्राचा हात धरून त्यास एका बाजूस नेलं. त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रूधारा वाहात होत्या. सद्‍गदित स्वरांनी ते नरेंद्राला म्हणू लागले– "हे काय, किती दिवस वाट पाहतो आहे मी. लोकांच्या तक्रारींनी माझं अंत:करण विव्हल झालं आहे. मला माहीत आहे तुम्ही पूर्वीचे ते नारायण ऋषी आहात"... दक्षिणेश्वरी येण्यासंबंधीचं निमंत्रण परमहंसानी दिलं आणि त्या दोघांची भेट संपली.

निमंत्रणाप्रमाणं स्वामी रामकृष्णांच्या भेटीसाठी नरेंद्र दक्षिणेश्वरी गेले आणि अनेक साधुसंतांना, पंडित-विद्वानांना त्यांनी वारंवार विचारलेला तो प्रश्न परमहंसांनाही विचारला. "आपण देव पाहिला आहे का?" स्वामी रामकृष्णांनी आपली शांत नजर नरेंद्राकडे स्थिर केली. ते क्षणभर हसले आणि म्हणाले–, "होय, मी पाहिला आहे परमेश्वर! तुला आता जितक्या स्पष्टपणानं पाहतो आहे तितक्या स्पष्टपणानं पाहिला आहे. तुला पाहायची इच्छा आहे? मी सांगेन त्या मार्गांनी जाशील तर तुलाही तो परमेश्वर खात्रीनं भेटेल!..." नरेंद्र आश्चर्यचकित झाला. एवढ्या अधिकारवाणीनं उत्तर देणारा हा पहिलाच महात्मा त्याला भेटला होता. रामकृष्णांनी याच क्षणी नरेंद्राच्या खांद्याला स्पर्श केला. एका दिव्य अनुभूतीची विलक्षण लहर नरेंद्राच्या अंगामधून निघून गेली. या क्षणानंतर नरेंद्राच्या जीवनाची दिशाच बदलली. विवेकानंदांच्या व्यक्तिमत्त्वाची किंवा कार्याची ओळख करून घ्यायची असेल, तर त्यांच्या पाठीशी उभ्या असलेल्या रामकृष्ण परमहंसांची योग्यता, थोरवी आपण प्रथम ध्यानी घेतली पाहिजे!...

१८८२ ते १८८६ पर्यंत नरेंद्र रामकृष्णांच्या आणि प्रामुख्यानं रामकृष्णच नरेंद्राच्या मागं अधिक लागले. आठपंधरा दिवसांत नरेंद्र भेटला नाही तर रामकृष्ण वेड्यासारखे करू लागत. त्याला शोधण्यासाठी रस्त्यारस्त्यांतून धावत असत. "तुझ्यासाठी मी भिक्षादेखील मागेन रे," असं म्हणून ते ओक्साबोक्शी

रडतदेखील! या चारपाच वर्षांच्या काळात परमहंसांनी नरेंद्राकडून सर्व तऱ्हेच्या साधना करून घेतल्या. नरेंद्राची आध्यात्मिक तयारी परिपूर्ण झाली आणि १८८६ मध्ये रामकृष्णांची अवतारसमाधी झाली! १८८७ ते १८८९ पर्यंत विवेकानंदांनी आपल्या गुरुबंधूसमवेत वेदांताचे अध्ययन केले. जवळजवळ साऱ्या भारतभर प्रवास करून हिंदूसमाजाचे अवलोकन केले. दारिद्र्य, अंधः-श्रद्धा, रूढी, परंपरा यांनी आपला देश कसा अधःपतित झालेला आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव झाली. " हा देश आपला आत्माच विसरला आहे. चैतन्य जागृत करून हा समाज उभा केला पाहिजे! " असे विचार त्यांच्या मनात वारंवार येऊ लागले! अयोध्या, काशी, वृन्दावनापासून त्रिवेंद्रम, रामेश्वर, कन्याकुमारीपर्यंत साऱ्या भारताचा प्रवास त्यांनी केला.

१८९३ मध्ये अमेरिकेत सर्वधर्म परिषद भरणार होती. देशोदेशींचे नामांकित विद्वान या परिषदेला हजर राहणार होते. खेत्रीचे महाराज, गुरुबंधू आणि असंख्य हिंदुधर्माभिमान्यांच्या आग्रहावरून विवेकानंद या परिषदेसाठी गेले. हावर्ड विद्यापीठातील प्राध्यापक राईट आणि मिसेस् हेल् यांच्या मदतीने त्यांना परिषदेच्या कामास उपस्थित राहण्याची व भाषण करण्याची संधी मिळाली. परिषदेचे अध्यक्ष होते कार्डिनल गिबन्स! सर्व जगातल्या अनेक राष्ट्रांच्या व धर्मांच्या प्रतिनिधींनी आपआपल्या धर्माची महती सांगणारी तयारी भाषणे केली आणि सर्वांत शेवटी अगदी काही मिनिटेच भाषण करण्याची संधी विवेकानंदांना मिळाली. त्यांचा तेजस्वी चेहरा, पाणीदार डोळे, रुबाबदार शरीरयष्टी, ती भगवी कफनी आणि तो फेटा—त्यांच्या आगळ्या व्यक्तिमत्त्वाने सारा श्रोतृसमाज आधीच भारून गेला होता. स्वामीजी बोलायला उठले आणि " माझ्या अमेरिकन बंधुभगिनींनो! " हे अमृतासारखे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला! आपल्या अस्खलित वक्तृत्वाने साऱ्याची अंतःकरणे त्यांनी जिंकली. ते म्हणाले, " संकुचितपणाच्या, पक्ष, पथ, धर्माची पिशाच्चे यापुढे राहणार नाहीत हेच या परिषदेचा घंटारव आपल्याला सांगतो आहे. खरोखरी ही पिशाच्चे उभी राहिली नसती तर सारा मानवसमाज आज केवढा प्रगत झाला असता! या नव्या निनादांनी, तरवारीच्या तडाख्यांनी अथवा लेखणीच्या फटकाऱ्यांनी पंथनिष्ठेच्या प्रचाराची पिसाटवृत्ती गेली नि एकाच ध्येयाच्या दिशेने जाण्याची प्रेरणा

मिळाली आहे. . . .मांगल्य, पावित्र्य, दया ही काही कोण्या एका धर्माचीच मक्तेदारी नव्हे, माझाच धर्म सर्वश्रेष्ठ व इतर धर्म चुकीचे ही संकुचितपणाची भावना कीव करण्यासारखी आहे ! ” स्वामीजींच्या या तेजस्वी वक्तव्याने सारे धर्मपंडित आश्चर्यचकित झाले. सर्वसंग्राहक वृत्तीच्या, सर्वांना समान मानणाऱ्या व श्रेष्ठतम तत्त्वज्ञान सांगणाऱ्या हिंदुधर्माची महती ऐकून साऱ्यांच्या माना आदराने नतमस्तक झाल्या. भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेचा ध्वज अभिमानानं डोलू लागला.

१८९३ ते ९५ पयत स्वामीजी अमेरिकेत राहिले. तिथं त्यांची कितीतरी व्याख्यानं झाली, दौरे झाले, सत्कार झाले. या वास्तव्यात भगिनी निवेदिता-सारख्या निष्ठावंत शिष्या त्यांना लाभल्या. १८९६ मध्ये स्वामीजी भारतात परत आले. जग जिंकून आलेल्या या धर्मसम्राटाचे भारताने केवढ्या उत्साहाने स्वागत केले ! विवेकानंद अमेरिकेत असताना तेथील ऐश्वर्य, समृद्धी, नव्या पिढीतील उत्साह, कर्तृत्व गाजवण्याची उमेद पाहून आनंदित होत, भारून जात आणि तुलनेनं भारतांतील जनतेचं दारिद्र्य, अज्ञान, आळशीपणा, परावलंबीवृत्ती या दुर्गुणांचं स्मरण होऊन व्यथित होत ! भारतात जेव्हा ते पुनरपी प्रवास करू लागले, तेव्हा त्यांनी आपल्या प्रखरवाणीनं भारतीयांच्या दुर्गुणांवर जोराचे हल्ले चढवले. “ उठा आणि पराक्रम करा ! जन्माला आलाच आहात तर जनावरांप्रमाणे, क्षुद्र वृक्षवेलींप्रमाणे नाइलाजानं जगू नका. आत्म-विश्वास आणि विश्वास यांच्या सहाय्याने तुम्ही तुमचे जग निर्माण करा ! ” —असा स्फूर्तीचा महामंत्र त्यांनी भारतीयांना सांगितला. ते म्हणत, ‘ पोलादा-सारख्या खंबीर मनाचे निष्ठावान, प्रामाणिक आणि उत्साही असे शंभर तरुण मला मिळाले तर साऱ्या जगात मी क्रांती करून दाखवेन !

मित्रहो, आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून तुमच्या हे लक्षात आलेच असेल की विवेकानंदांचं व्यक्तिमत्त्व हे अतिशय भव्य असं होतं ! ते बुद्धिमान होते, स्वाभिमानी होते, आदर्श शिष्य होते. स्वधर्माबद्दल त्यांना अतिशय अभिमान वाटत होता. तशीच त्यांची दृष्टि समन्वयाची होती. सर्व चांगल्या गुणांचे, तत्त्वांचे ते पूजक होते. गोरगरिबांबद्दल त्यांच्या मनात अतिशय कळवळा होता आणि प्रत्येकाच्या कर्तृत्वाबद्दल आत्मविश्वास होता. व्यक्तीव्यक्तीच्या मनावरील अज्ञानाचं, दु:खाचं कश्मल काढून टाकून तू अमृताचा

पुत्र आहेस, हे त्यांनी प्रत्येकाच्या अंत:करणी ठसवलं! पौर्वात्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी उत्तम समन्वय घालून दिला. देव, धर्म, राष्ट्र, तत्त्वज्ञान या सर्व गोष्टीचं खरं स्वरूप स्वतः जाणून त्याच्या प्राप्तीचा मार्ग सर्वांना दाखवून दिला. जीवन जगताना, धर्माचरण करताना, ऐहिक आणि पारलौकिक, अभ्युदय आणि निःश्रेयस, श्रेय आणि प्रेय, साऱ्यांचा लाभ घडलाच पाहिजे, हे लोकांच्या ध्यानी आणून दिलं! विवेकानंदांचं हे व्यक्तिमत्त्व आणि कार्य सागरतीरावरील दीपस्तंभाप्रमाणं आहे. त्या प्रकाशाच्या रोखानं आपल्या जीवननौका हाकारल्यास आपण खात्रीनं यशस्वी होऊ, असा भरवसा मला वाटतो!...

२

# माझा आवडता विनोदकार : आचार्य अत्रे

*माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

‘ अधिकार तैसा करू उपदेश, ’ असं एक संतवचन आहे ! मला नेमकी आताच या संतवचनाची आठवण का झाली असावी, हे कदाचित तुम्हापैकी काहीजणांनी ओळखलं असेल. आम्हा विद्यार्थ्यांसमोर स्पर्धेसाठी जे चार विषय ठेवलेले आहेत, यापैकी ‘ भाषावार प्रांतरचना ’, ‘ काश्मीरचा प्रश्न ’ हे विषय खरोखरी असे आहेत की भल्यामल्या विचारवंतांचा या विषयाबाबत गोंधळ उडावा. अगदी त्या विषयाच्या अधिकारी-तज्ज्ञांनीसुद्धा त्याच विषयावर बोलायला तोंड उघडण्यापूर्वी आणखी दहादा विचार करावा अशी सद्यः-स्थिती आहे. अशा स्थितीत एस्. एस्. सी. च्या उंबरठ्यावर जेमतेम उभ्या राहिलेल्या शाळकरी पोरांनी या विषयांवर अधिकारवाणीनं बोलायचा आव कशाला आणावा ? त्यातूनही इतरांच्या सहाय्याच्या बांधल्या शिदोरीवर कदाचित मलाही थोडीशी पोपटपंची करता आली असती, पण विचार केला की आमच्या भाषणाचं भवितव्य ठरविणारी ही इथं परीक्षक मंडळी आहेत; ती खरोखरीच अतिशय व्यासंगी आणि विद्वान माणसं आहेत. तेव्हा त्यांच्यासमोर असल्या कच्च्या आणि उसन्या ज्ञानाचं प्रदर्शन करणं म्हणजे हिमालयावर जाऊन तिथं आइसफ्रूटचा कारखाना काढण्यासारखं हास्यास्पद ठरेल ते ! यासाठीच मी असं ठरवलं की ज्या विषयाशी आपल्या वाचनाच्या

आणि ऐकण्याच्या निमित्तानं संबंध आला, हे वाचन अगर श्रवण चालू असताना आपल्याला खूप आनंद झाला, आपण प्रसंगी पोट धरधरून हसलो, त्याच विषयावर स्वतःच्या प्रज्ञेनं बोलायचं. तुम्हा सुज्ञ श्रोत्यांच्या हे लक्षात आलंच असेल की मी 'माझा आवडता विनोदकार' या विषयावर बोलणार आहे !....

खरोखरच तसं पाहिलं तर मराठी काय आणि संस्कृतही काय – या दोन्ही भाषांत विनोदी वाङ्मयाला जेवढं मानाचं स्थान मिळायला हवं होतं, तितकं ते दुर्दैवानं मिळालेलं नाही. इंग्रजी साहित्यात आपण असं पाहतो की शेक्सपिअरच्या रांगेतच स्टिफन लिकॉकसारख्या विनोदी लेखकालाही स्थान दिलं जातं, पण आपल्या प्राचीन संस्कृत साहित्याकडं पाहिलं तर आपल्याला काय आढळून येतं ? आधी उत्तम विनोदी वाङ्मय हे जवळजवळ नाहीच आणि विदूषकाचा हात धरून जे विनोदी वाङ्मय लिहिलं गेलं आहे, त्याला वाङ्मय म्हणायचं का हा एक प्रश्नच ठरेल! मराठीमधल्या प्राचीन साहित्याचीही हीच अवस्था आहे. 'टवाळा आवडे विनोद !' असं सांगून रामदासांनी तर विनोदाला पार हद्दपार करून टाकलंय ! पण गेल्या अर्धशतकात काळाबरोबर आपली कल्पना पालटली. आचारविचार बदलले. साहित्यात नवे वारे खेळू लागले. जीवनाची मूल्येही बदलली. तुम्हा आम्हा सर्वांच्या जीवनात विनोदाला एक महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं ! कोल्हटकर, गडकरी आदि थोर विनोदी लेखकांनी विनोदाचे हे निर्झर मराठी साहित्यात निर्माण केले, पण त्याच्याहि पुढं जाऊन मी असं म्हणणार आहे की मराठी रसिकांच्या भाग्यानं या हास्यरसाचा एक प्रचंड धबधबा गेली दोन–अडीच तपं मराठी वाङ्मयात अखंडपणानं कोसळतो आहे. याच धबधब्याची शोभा आपल्याला पाहायची आहे. आणि मित्रहो, या हास्यरसाच्या प्रचंड धबधब्याचं नांव आहे आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ! (हशा) पाहा तुम्ही हसलात ! यावरूनच आचार्य अत्रे हे श्रेष्ठ विनोदकार आहेत हेच सिद्ध होत नाही काय ? मित्रहो, तुम्हा रसिकांच्या चेहऱ्यावरचा हा आनंद जसा मी आता पाहतो आहे, तसाच आचार्य अत्रे हे नाव उच्चारताच समोरच्या काही प्रौढ आणि सभ्य गृहस्थांच्या कपाळी पडलेल्या आठ्याही मी पाहिल्या. मला वाटतं त्यांच्या मनात विचार आला असावा, 'अत्रे कसले विनोदी लेखक ? त्यांचा विनोद म्हणजे शुद्ध टारगटपणा !' काही अंशी तुमची ही शंका मी

मान्यही करतो, कारण ते नाकारता येणार नाही. मागं एकदा ढमढेरे आडनावाचे गृहस्थ निवडणुकीला उभे राहिले होते. अत्र्यांनी त्यांना विरोध करायचा ठरवला होता. भरसभेत त्या गृहस्थांचा उल्लेख करून अत्रे म्हणाले... 'अहो ज्या आडनावात दोन ढ आणि एक मढं आहे, अशा माणसाला कशाला देता आपली मतं ?'– अर्थात हा टारगटपणा म्हणजे काही अत्र्यांच्या विनोदाचा चांगला नमुना नव्हे. पण असं पाहा की, अत्रे म्हणजे बोलून चालून धबधबा आहे ! तेव्हा त्यातून क्वचित ही असली घाण यायचीच ! पण एवढ्याकडं जर आपण थोडा कानाडोळा केलात तर मात्र हा सारा प्रवाह अगदी प्रसन्न, निर्मळ आणि प्रामुख्यानं तुम्हाला आनंद देणारा ठरेल यात तिळमात्र शंका नाही !

आपण विनोदी लेखक का आणि कसे झालो, याचं विवेचन करताना खुद्द अत्र्यांनीच असं म्हटलं आहे की, " सामाजिक कार्यकर्ता म्हणून मी जेव्हा काम करू लागलो, तेव्हा समाजातील अनेक सोंग नि ढोंगं आपल्या नजरेस आली. या साऱ्या बजबजपुरीवर प्रकाश टाकायला विनोदासारखं दुसरं प्रभावी शस्त्र नव्हतं आणि माझी प्रवृत्ती विनोदाचीच होती. . .माझ्या लहानपणी माझे वडील अतिशय विडया ओढीत. त्यांचं ते घाणेरडं व्यसन कुणाला आवडत नसे आणि त्यांना विडीशिवाय क्षणभरही करमत नसे. यावर मी शेवटचा उपाय म्हणून एक युक्ती शोधून काढली. एकदा वडिलांचा डोळा चुकवून मी त्यांची एक विडी पळवून आणली. ती अलगद उघडून तिच्यात एक फटाका घालून, होती तशीच वळून गुपचूप त्यांच्या बंडलामध्ये ठेवून दिली. त्याचा अपेक्षित स्फोट झालाच ! पण वडिलाचं ते व्यसन कायमचं सुटलं ! अगदी विनोदाची हीच दृष्टि माझ्या लेखनाला उपकारक ठरली. त्यामुळंच मी विनोदी लेखक झालो. ! "—आपल्या वडिलांच्याप्रमाणंच खरोखरीच अत्र्यांनी आजवर समाजामधल्या अनेक बडयाबडया धेंडांची अक्षरशः भंबेरी उडवलेली आहे !

महाराष्ट्रातल्या काही प्रसिद्ध व्यक्तींना एकेकाळी साष्टांग नमस्काराचं विलक्षण वेडच लागलं होतं ! आता शरीर निरोगी आणि सुदृढ होण्याच्या दृष्टीनं नमस्कार घालावेत हे कुणालाही पटेल, पण हरएक गोष्टीसाठी ऊठ की सूट घाल नमस्कार, हा जुलूमच ठरेल ! डोकं दुखतं ?–घाल नमस्कार ! नोकरी पाहिजे ? घाल नमस्कार ! मुलं होत नाहीत ?—घाल नमस्कार ! आणि मुलं नको

इतकी होतात ! तरी घाल नमस्कार ! ! .... अशा नमस्कारवेड्यांना वठणीवर आणण्यासाठी आचार्य अत्र्यांनी ' साष्टांग नमस्कार ' हे नाटक लिहिलं ! या नाटकात रावबहादूर शेषाद्री नावाचं एक पात्र आहे. हे गृहस्थ नमस्काराचे इतके वेडे की एकदा प्रवासात असताना भरल्या डब्यात उघडेबंब होऊन तिथं नमस्कार घालू लागतात ! अर्थात इतके सांगितल्यानंतर नमस्काराच्या एकांतिक वेडाची अत्र्यांनी कशी रेवडी उडवली असेल हे काही वेगळं सांगायला नको.

फासक्या अन् फुसक्या विषयावर कविता पाडणाऱ्या बुद्रक कवीची टिंगल करण्यासाठी याच नाटकात त्यांनी भद्रायु भाटगर रंगवलाय; तर स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी समाजहिताचा खून पाडणाऱ्या भाई टोळांची आणि ताई पोळांची रेवडी ' मी उभा आहे ' या नाटकात उडवली आहे. अशा तऱ्हेनं आपल्या नाटकांमधून असंख्य ' भ्रमाचे भोपळे ' अत्र्यांनी फडाफड फोडले आहेत आणि अगणित ढोंगी माणसांची टर उडवून त्यांना ' घराबाहेर ' हकललं आहे !

आपल्याला जाणवणाऱ्या सोंगांचं व्यंगांचं- प्रभावी विडंबन करणं हे काही सोपं काम नाही. त्यासाठीसुद्धा अव्वल दर्जाची प्रतिभा, रसिकता असावी लागते. या दोन्ही गुणांची देणगी अत्र्यांना लाभली आहे, म्हणूनच ते प्रभावी विडंबनकार झाले. ' डोळे हे जुलमी गडे रोखुनी मज पाहु नका '-या सुंदर ओळीबरहुकूम-' मंत्री हा जुलमी गडे यास मते देऊ नका, ' अशी ओळ त्यांना सुचते. केशवसुतांच्या ' दवाचे थेंब ' या कवितेचं ' पाहुणे ' ह्या कवितेत केलेलं विडंबन बहारदार आहे. मूळ कवितेत ' चंद्र आणि नक्षत्रे ती शोभली जेथ वा राती, ' अशी सुंदर ओळ आहे, तर अत्रे लिहतात, ' कावळे गिधाडे घारी बाळारे येति जिथुनि । तेथुनीच हे आले छळावया आम्हाते....''...

नाटकं, विडंबनगीतं याप्रमाणंच त्याच्या नैमित्तिक लिखाणामधला तसाच व्याख्यानामधला विनोदही मोठा खमंग आणि चुरचुरीत असतो. एक उदाहरण आठवलं म्हणून सांगतो. पं. जवाहरलाल नेहरूंचे मेव्हणे राजा हाथिसिंग हे एकदा कॉंग्रेसच्या तिकिटावर निवडणुकीला उभे राहिले होते. त्यांना पाडण्याचा त्यांच्या विरोधकांनी चंगच बांधला होता. अत्रे तेव्हा कॉंग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते बनले होते. त्यांनी त्या मतदारसंघात आपली

जाहीर सभा घेतली. अत्रे बोलायला उभे राहिले, तसे लोक ओरडू लागले, "अत्रेसाहेब, तुम्ही इतर काय वाटेल ते करायला सांगा, पण त्या हाथिसिंगाला मत द्यायला सांगू नका!" त्यावर समोरच्या अफाट जनसमुदायाकडं एकवार अत्र्यांनी पाहिलं आणि माईकवरून आवाज चढवून साऱ्या लोकांना सांगितले, "लोकहो, तुम्हा सर्वांना उद्देशून मला फक्त एकच प्रश्न विचारायचा आहे!–" त्या वाक्यासरशी सारी गडबड आपोआप शांत झाली आणि अत्र्यांनी खणखणीत आवाजात लोकांना विचारलं, "लोकहो, ज्या हाथिसिंगांना पं. जवाहरलाल नेहरूंनी आपली बहीण दिली, त्या हाथिसिंगांना तुम्ही साधं मत देऊं इच्छीत नाही?"– हशा आणि टाळ्यांचा वर्षाव या प्रश्नापाठोपाठ झाला! अत्र्यांनी ती सभा जिंकली!

मित्रहो, एक गोष्ट लक्षात घ्या की अत्र्यांच्या साऱ्यांच लिखाणाचं लक्ष समाजहित हे आहे. लोकांना हसवायचं, गदगदून हसवायचं! आणि हसवता हसवता, त्यांच्या चुका, त्यांचा मूर्खपणा त्यांच्या पदरी बांधायचा. प्रसंगी त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालायचं! हेच काम अत्र्यांना आपल्या प्रभावी लेखणीनं, वाणीनं करायचं असतं आणि त्याच्या जोडीला महाराष्ट्राचा अभिमान, गुणवंताबद्दल आदर, गोरगरिबांबद्दल कळवळा हे गुणही असल्यामुळं त्यांची लेखणी आणि वाणी साहित्यातल्या नवरसांतही एकेक अद्‌भुत चमत्कार करून दाखवते. महामहोपाध्याय पोतदार, साहित्यसम्राट केळकर आणि मराठी भाषेचे पाणिनी कृ. पा. कुलकर्णी अशी विद्वानमंडळीही अत्र्यांच्या विनोदावर खूष आहेत. तुम्ही आम्ही अत्र्यांच्या लेखणी-वाणीने-मोहीत होऊ, यात काय आश्चर्य! मला तर वाटते, आचार्य अत्र्यांच्यासारखा अव्वल दर्जाचा विनोदकार केवळ मराठी भाषेत नव्हे, जगाच्या पाठीवर झाला नसेल! असा झुंजार वृत्तीचा विनोदकार महाराष्ट्रात जन्माला आला, ही खरोखर महाराष्ट्राच्या भाग्याची गोष्ट नव्हे काय?--

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

३

# मृत्युंजय सावरकर

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !–*

**मुक्या मनाने उधळावे किती शब्दांचे बुडबुडे ।**
**तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ॥**

स्वातंत्र्यवीर सावरकर हे नाव उच्चारताच वरील काव्यपंक्ती आपोआप आठवतात, मस्तक नम्र होतं आणि हात जोडले जातात. मनोमन याची जाणीव होते की सावरकरांचं चरित्र म्हणजे भारताच्या इतिहासामधला एक अद्‌भुत चमत्कार आहे ! नव्हे चमत्कारातच साकार व्हायचं ठरवलं आणि सावरकरांच्याच रूपानं तो अवतीर्ण झाला ! कुणाही निधड्या छातीच्या माणसाची छाती विस्मयानं दडपून जावी, बृहस्पतीचीही वाचा पांगुळावी, महाकवीची प्रतिभा फिकी पडावी, थोर शाहिरांचीही स्फूर्ती माघारा वळावी.... असेच आश्चर्यानं थक्क करून सोडणारे कित्येक प्रसंग या मृत्युंजयी महावीरानं आपल्या हातांनी घडविले आहेत ! या महापुरुषांच्या जीवनचरित्राचं गुणगान मी माझ्या अल्पमतीप्रमाणं करणार आहे.

‘ क्रांतिकारकांचे मुकुटमणी ’ अशा सार्थ शब्दांनी सावरकरांचा उल्लेख केला जातो. क्रांती हाच त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. क्रांतीच्या धगधगत्या कुंडामधून त्यांचा पिंड तावून सुलाखून निघाला आहे.... १८५७ स्वातंत्र्य-समराची धग जनमनांत धुमसत होती. क्रांतिवीर वासुदेव बळवंतांच्या कार्याचे

स्फुल्लिंग लोकमानसांत अद्यापि चेतना निर्माण करीत होते.... अशाच काळात सावरकर जन्माला आले, वाढले. भारतीयांच्यावर अनन्वित जुलूम, अन्याय करणाऱ्या उन्मत्त इंग्रज अधिकाऱ्याला चाफेकरबंधूंनी यमसदनाला पाठवलं आणि त्यापायी स्वत: हसत हसत ते फाशी गेले. या घटनेचा सावरकरांच्या मनावर लहानपणीच फार मोठा परिणाम झाला आणि वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी देवीसमोर सुख, संसार, ऐश्वर्य, कीर्ती कशाकशाचीही अभिलाषा न ठेवता स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं—

**मारिता मारिता मरेतो झुंजेन**

अशी प्रतिज्ञा त्यांनी केली. या प्रतिज्ञेच्या पूर्तीसाठी आयुष्यभर सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून सर्वस्वाचा होम करून, अतुलनीय त्याग करून, नव्हे प्रत्यक्ष मृत्यूशीही झुंज देऊन प्रतिज्ञेतील शब्दन् शब्द त्यांनी खरा करून दाखविला !

या महापुरुषाच्या जीवनातील चार महत्त्वाची पर्वे आपण नीट लक्षात घेऊ या ! १८९८ ते १९११ हा पहिला कालखंड... याच काळात त्यांनी सशस्त्र क्रांतिकारकांच्या संघटना उभ्या केल्या. त्या संघटनांचे नेतृत्व केले. एकेका कृतीनी इंग्रजांच्या बलशाली सत्तेला प्रचंड धक्के दिले. १९११ ते १९२४ हा बंदिवासाचा दुसरा कालखंड. पण हा बंदिवास भोगताना, खडी फोडताना, चक्की पिसताना, घाणी ओढताना, अनेक शारीरिक व मानसिक आपदा भोगतानाही त्यांनी अजरामर काव्ये लिहिली ! १९२४ ते १९३७ हा तिसरा कालखंड. या काळात ते रत्नागिरीला स्थानबद्धतेत होते, पण सुभाषितकार म्हणतात त्याप्रमाणं– " केला जरि पोत बळेचि खाली, ज्वाळा तरी ते वरती उफाळे, " अशीच त्याची अवस्था होती. या काळात त्यांनी प्रचंड लेखन केलं. हिंदुसंघटनेचं देशव्यापी कार्य उभं केलं. तेजस्वी विचार–भाषणांनी देशाची अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न केला. १९३७ ते १९४६ हा चौथा कालखंड. रघुराजाच्या दिग्विजयाप्रमाणं त्यांनी या काळात अनेक दिग्विजय केले. ब्रिटिशांची सत्ता हुसकावून लावण्यासाठी, मुसलमानांच्या जातीय संघटना उस्कटून टाकण्यासाठी, कॉंग्रेसच्या पडखाऊ धोरणाबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करण्यासाठी, भारतीय जनतेनं आपला पराक्रमाचा, स्वाभिमानाचा इतिहास आठवून स्वसंस्कृतीला साजेल असे वर्तन करावे, यासाठी झंझावती दौरे काढले,

शेकडो भाषणं दिली. वृत्तपत्रांमधून हल्लेप्रतिहल्ले चढवले.... या साऱ्या कालखंडामध्ये सावरकर एखाद्या झुंजार महावीराप्रमाणं ठाकले. सारे राष्ट्र पथभ्रष्ट, संभ्रमी, हताश झाले असताना या महापुरुषानेच स्वातंत्र्याचा महामंत्र जपला. देशाभिमानाचा वन्ही चेतविला, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढ्याचे रणशिंग फुंकले. परकीय सत्तेवर, पारतंत्र्यधार्जिण्या, लांगुलचालन करू पाहणाऱ्या, लाचारी पत्करू पाहणाऱ्या वृत्तीवर वज्राघात केला. स्वतः अनंत यातना सहन केल्या. दुःखांना पायदळी चुरडले आणि मृत्यूलाही आव्हान देऊन त्याच्याशी साक्षात द्वंद्व खेळून त्याची फटफजिती केली! ‘ मरणोन्मुख शय्येवर ’ असूनही ते गर्जना करीत होते—

**ये मृत्यो ये, यावयाप्रति निघालाचि असशिल जरि, ये तरी सुखे —**

वयाच्या पस्तिसाव्या वर्षीच आपण ऋषिऋण, पितृऋण, देवऋण फेडलं असल्याची कृतार्थता ते अनुभवीत होते. ध्येयाच्या ध्रुवताऱ्यावर दृष्टी ठेवून. तुफानी वादळामधून आपल्या जीवननौकेने प्रवास केला असल्याचा आत्मविश्वास त्यांना वाटत होता. या उदंड व उत्कट आत्मविश्वासामुळेच ते मृत्यूला उद्देशून म्हणतात——मृत्यूनं अवश्य यावं, पण येताना त्यानं रोगाचं क्रूर आणि त्रासदायक सैन्य मात्र बरोबर आणू नये. सर्व वीरांनाही जिंकणाऱ्या त्या वीर विजेत्यानं आपणासमोर आकस्मिकरीत्या उभं राहावं! त्याच्याशी जहाल, ज्वालाग्रही झुंज द्यायला त्यांची केव्हाही तयारी होती ! ही तयारीही त्यांनी बुद्धिपुरस्सर केलेली होती. आपल्या जीवनक्रमाबद्दल ते स्वतःच सांगतात

**की घेतले न व्रत हे आम्ही अंधतेने**
**लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने-**
**जे दिव्यदाहक म्हणुनि असावयाचे**
**बुद्ध्याच वाण धरिले करि हे सतीचे ॥**

राजकारण, समाजकारण, धर्मकारण, साहित्य, शिक्षण, सर्व आघाड्यांवर वावरत असताना सावरकर या एकाच व्रतानं वावरत होते. क्रांतिमंडळाची कामे करताना, परदेशी कपड्यांची होळी करताना, विलायतेमधून पिस्तुले पाठवताना, मोरिया बोटीतून उडी टाकताना, नेहरू-गांधींच्या भोंगळ विचारसरणीवर आग पाखडताना ...पावलोपावली त्यांची त्यांना या दिव्यदाहक व्रतांचे चटके बसले, पण

'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय आणि विरोधाल तर विरोध मोडून काढू"–– या पराक्रमी बाण्यानं ते झुंजत राहिले.

अनादि मी अनंत मी अवध्य मी भला–असा स्वपराक्रमाचा, कर्तृत्वाचा डिंडिम आसेतुहिमाचल दुमदुमवीत ते गर्जत राहिले...

मित्रहो, या थोर महापुरुषाची तुलनाच दुसऱ्या कोणाशी करता येणार नाही !

आकाशाहुन विशाल भासे याचे व्यक्तित्व
कर्पुरसे तो जाळीं अपुले अवघे कर्तृत्व ।
चिरंजीव हा हौतात्म्याचा विजयी अभिमान
इतिहासाविण कुणी करावा याचा सन्मान ॥

हे कविवर्य माडगूळकरांचेच शब्द सार्थ नाहीत काय ?

सावरकरांचं काव्य, निबंध, आत्मचरित्र, नाटक...सारं सारं साहित्य हे मराठी भाषेचं भूषण आहे. त्यांचं वक्तृत्व ज्यांनी ऐकलं, ते खरोखरी धन्य होत ! त्यांचं आता पर्यंत सांगितलेलं कर्तृत्व ज्यांनी पाहिलं, त्या कर्तृत्वात जे अंशतः सहभागी झाले, त्यांच्या भाग्याला तर पारावार नाही !.......

पण राहून राहून एक विचार मनात येतो आहे, तो हा की या थोर कर्तृत्वाचा खरोखरीच आपण काही उपयोग करून घेतला का ? सावरकरांनी निरपेक्ष बुद्धीनं साऱ्या गोष्टी केल्या हे खरंच ! पण म्हणून कृतज्ञता तरी आपण व्यक्त करायला नको काय ? निदान स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरी या थोर वीराच्या अतुलनीय त्यागाचं श्रेय त्याच्या पदरी आपण होऊन द्यायला नको काय ?... एखादी वीरोचित पदवी, काही अल्पसा तरी सरकारी तनखा....

पण छे ! छे ! ही कल्पनाच किती दरिद्री आहे. जिथं तमासगीर आणि नटनट्या उभ्या राहिल्या, त्याच रांगेत या महापुरुषाची वर्णी ? तुम्ही हे कुठे ऐकलं आहे काय ? की कावळ्याबगळ्यांनी राजहंसाचा सन्मान केला आहे ! असं कुठं कधी पाहिलं आहे काय ? कुत्र्या-कोल्ह्यांनी, 'बैलांनी' वनराज सिंहशार्दूलांचा गौरव केला आहे ?...आजच्या युगातल्या ब्रिटनिकांनी या युगपुरुषाचा काय सन्मान करावा !...

सावरकरांचा सन्मान करेल एक मृत्यूच ! एखाद्या झुंजार वीराला, पराक्रमी योद्ध्याला साजेल असं वीरमरण सावकरांना यावं. त्या मृत्यूशी झुंज देताना

ते जो अखेरचा श्वास या जगात सोडतील, त्यातून स्वातंत्र्याची गाणी निर्माण होतील, अखेरची दृष्टी फेकतील त्यातून स्वाभिमानाचे स्फुल्लिंग फुलतील, अखेरचे शब्द उच्चारतील त्यातून पराक्रमाच्या घोषणा निर्माण होतील !... सारं राष्ट्र चैतन्यानं रसरसून उठेल. एक चमत्कार घडेल....या भयानेच कदाचित तो मृत्यू आज ऐशी वर्षे होऊन गेली, स्वतःचा जीव सांभाळीत लपून बसला असेल...आणि म्हणूनच या मृत्युंजयी महावीराला आदराची प्रणमांजली अर्पून मी आपले भाषण संपवितो !

४

# थोर समाजसेविका रमाबाई रानडे

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

दिनांक सव्वीस एप्रिल एकोणीसशे चोवीस या दिवशी पुणे येथील सेवा सेवासदनच्या आवारात एक विधवा स्त्री मरण पावली ! ही वार्ता हा हा म्हणता साऱ्या पुणे शहरात पसरली आणि या विधवेचं अंत्यदर्शन घेण्यासाठी स्त्रियांचे थवेच्या थवे तिथे लोटू लागले. दर्शनासाठी आलेल्या स्त्रियांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. काहीजण कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केवळ नमस्कार करीत होत्या. काहीजण दीर्घ उसासे टाकून त्या थोर विधवेच्या अतुलनीय कर्तृत्वाचा विचार करीत होत्या. तिच कर्तृत्व, धडाडी, दूरदर्शीपणा अशा विविध गुणांना आठवून मनोमनी तिला धन्यवाद देत होत्या. असंख्य दुर्दैवी आणि उपेक्षित स्त्रियांना तर आपली जिवाभावाची सखी गेल्याचं, आपुलकी, वात्सल्य देऊन काळजी वाहणारी माताच गेल्याचं दुःख होत होतं....हजाराहून अधिक स्त्रीपुरुष प्रेतयात्रेत सामील झाले. त्यांत कुलीन होते, सुशिक्षित होते, अशिक्षित होते, लहान-थोर सारे होते. एखाद्या सुवासिनीचं हे प्रेत असतं तर कदाचित हे सारं ठीक होतं, पण एका विधवेच्या अंत्ययात्रेला एवढी गर्दी ? जिचं नुसतं दर्शन घडलं तर अशुभाची पाल मनात चुकचुकावी, जी सामोरी आली असता पाठ फिरवून माघारी चालू लागावं....

पण ही विधवा म्हणजे महाराष्ट्रीय हिंदू समाजातील एक मोठा चमत्कार होता! त्या स्त्रीचं नांव होतं – रमाबाई रानडे!'

बंधुभगिनींनो, 'थोर समाजसेविका--रमाबाई रानडे!' या विषयावर मी बोलणार आहे हे तुम्हा सुज्ञांच्या ध्यानी आलं असेल.

पेशवाईमध्ये पराक्रम गाजवून नावलौकिकास चढलेल्या कुर्लीकर घराण्यात रमाबाईंचा जन्म २५ जानेवारी १८६२ रोजी झाला. जुन्या परंपरा, संस्कृती, धर्म यांचाच अधिक प्रभाव असलेलं घराणं! गृहशिक्षण, धार्मिक कृत्यं आणि संसारगाडा यशस्वीरीतीनं चालविण्यासाठी आवश्यक असेल तेवढंच मार्गदर्शन,—एवढ्या गोष्टी रमाबाईंनी बालवयातच कुर्लेकर घराण्यात संपादन केल्या आणि वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी त्यांचा विवाह माधवराव रानडे यांच्याशी झाला. माधवराव रानडे म्हणजे बृहस्पतीच्या योग्यतेचे थोर विद्वान होते. पदवीधरांचे मुकुटमणी, अशा सार्थ शब्दांनी त्यांचा गौरव केला जात असे! जेव्हा महाराष्ट्र म्हणजे थंड पडलेला मातीचा गोळा अशी अवस्था झाली होती, तेव्हा त्या महाराष्ट्राला चेतना देण्याचं काम सर्वप्रथम न्या. रानडे यांनीच केलं, असा गौरव लो. टिळकांनीही केला होता. स्त्री-शिक्षणविषयक सुधारणा, बालविवाहाचा निषेध, विधवाविवाहाचा पुरस्कार... अशा अनेक सामाजिक चळवळींना त्यांचा पाठिंबा होता. कित्येक महत्त्वाच्या चळवळींचे ते स्वतः सूत्रधार होते—अशा या असामान्य कर्तृत्वाच्या, बुद्धिमत्तेच्या थोर व्यक्तीच्या जीवनाशी साथ करण्याचं भाग्य रमाबाईंना सुदैवानं लाभलं! ......पण गंमत अशी होती की माधवराव आणि रमाबाई यांच्यावयात फार मोठं अंतर होतं! लग्नानंतर जेव्हा रमाबाई नव्या घरी प्रवेश करत्या झाल्या, तेव्हा माधवरावांनी त्यांना मुळाक्षरं गिरविण्यास सांगितली! लिहा-वाचायला सांगण्यास सुरवात केली. जुन्या परंपरेत वाढलेल्या रानडे कुटुंबीय मंडळींनाही हा केवढा अनर्थ वाटला! भ्रष्टाकार भासला! साहजिकच अपमान, निंदा, छळ, सासुरवास, या साऱ्या गोष्टींना आरंभ झाला, पण रमाबाई मोठ्या धीराच्या. त्यांनी या साऱ्या गोष्टींना तोंड दिलं. महत्प्रयासानं शिक्षण घेतलं. मराठी—इंग्रजी दोन्ही भाषा त्यांना लिहिता-वाचता येऊ लागल्या. ज्योतीनं ज्योत पेटवावी तसाच चमत्कार घडून आला. महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनात शतकानुशतकं भरून राहिलेला अंधःकार नाहीसा करण्यासाठी

ठाणे. स्थळप्रत. निबंध ... १६०३

एक तेजस्वी दीपिका रानडेकुळात सौजन्यानं आणि कर्तृत्वानं वावरू लागली ! ......

नाशिकला गेल्यानंतर लोकवादींच्यासारख्या पुरोगामी कुटुंबियांशी त्यांचा परिचय झाला आणि हळदीकुंकुवाच्या समारंभानिमित्त सर्व जातीजमातील, विविध थरांतील असंख्य स्त्रियांना जमवून त्यांना साध्वी स्त्रियांची चरित्रं वाचून दाखविणं, पुराणांतरीच्या कथा सांगणं इत्यादी कामं रमाबाई आस्थेनं व हौसेनं करू लागल्या. पुढे माधवराव रानड्यांची जिथं बदली होईल, त्या त्या ठिकाणी स्वतःचं अध्ययन चालू ठेवून इतरांना अल्पस्वल्प अध्यापनाचं कामही करण्यास त्यांनी प्रारंभ केला. पंडिता रमाबाई या नावाच्या थोरं विदुषी त्यावेळीं पुण्यात अशीच सार्वजनिक थोर कामं करीत असत. सभासंमेलनातून भाग घेत. स्त्रियांच्या विविध सुधारणांचा त्या हिरीरीनं पुरस्कार करीत. त्यांच्याशी रमाबाई रानड्यांचा परिचय झाला. त्यांनी उत्तेजन दिलं. मार्गदर्शन केलं. रमाबाई रानडयांची महत्त्वाकांक्षा अधिक वाढली. हर्डकर्डबाईकडून इंग्रजी शिक्षणाचे धडे त्या घेऊ लागल्या. अशारीतीनं त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसित होऊ लागलं !

सन १८८४ मध्ये मुलींच्यासाठी स्वतंत्र हायस्कूल स्थापन व्हावं म्हणून हिराबागेच्या टाऊन हॉलमध्ये एक सभा घेण्यात आली होती. डॉ. भांडारकर, रावबहादूर रानडे यांच्यासारखे नामवंत विचारपंडित, अनेक थोर इंग्रज स्त्रीपुरुष या सभेला हजर होते. सुधारणाप्रिय नागरिकांची संख्या तर प्रचंड होती. या सभेत मुलींच्या स्वतंत्र हायस्कूल–मागणीचं निवेदन इंग्रजीमधून रमाबाईनं सादर केलं ! या घटनेनं केवढा अनर्थ माजला ! सर्वत्र चर्चेला हाच एक विषय सुरू झाला ! रानडे कुटुंबीय मंडळीं विलक्षण चिडली, संतापली ! तर सुधारक, पुरोगामी विचाराचे लोक रमाबाईच्या या धाडसाचं मुक्तकंठानं कौतुक करू लागले. त्यांच्या या परिश्रमाचं धडधडीत चीज झालं. त्याच वर्षी सप्टेंबर महिन्यात ‘ हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स ’ स्थापन झाले. स्वतः रमाबाई रानडे या हायस्कूलमध्ये शिकवू लागल्या !

१८८६ मध्ये रानडयांची कलकत्त्याला बदली झाली. रमाबाई कलककत्त्याला गेल्या. तिथं त्यांनी बंगाली भाषा, संस्कृती, समाज, सुधारणा यांचा बारकाईनं अभ्यास केला. प्रवासात व घरी फावल्या वेळात इंग्रजी–मराठी पुस्तकांचं त्या

वाचन करीत. पतीशी चर्चा करीत. प्रसंगी वादविवाद करून आपलं स्वतंत्र मत देण्याइतपत आता त्यांची प्रगति झाली होती. १८९२ मध्ये रमाबाईंच्या खऱ्या कर्तृत्वास प्रारंभ झाला. त्यांनी " सेवासदन " या संस्थेची स्थापना केली. स्वतः त्या व्यवस्थापक म्हणून काम करू लागल्या. स्त्रियांच्या कलाकौशल्य-प्रदर्शनापासून तो ' हिंदू लेडीज सोशल क्लब ' स्थापन करण्यापर्यंत अनेक कामात त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. प्रत्येक महत्त्वाची जबाबदारी त्या कर्तव्यदक्षतेनं, तत्परतेनं, काळजीपूर्वक यशस्वी करीत असत. स्वतः अग्रभागी राहून इतर स्त्रियांना प्रेरणा देत असत !

दुर्दैवानं १९०१ मध्ये माधवराव रानडे मरण पावले. संसाररथाचं एक चाक कोलमडून पडलं, पण या आघातानं रमाबाई खचल्या नाहीत, हताश झाल्या नाहीत. कर्तव्यपराङ्मुख बनल्या नाहीत. आपल्या पतीकडून, त्यांच्याच आशीर्वादानं घेतलेलं समाजसेवेचं व्रत मोठ्या निष्ठेनं त्यांनी पुढं चालू ठेवलं ! १९०४ मध्ये भारतीय महिला परिषदेच्या त्या अध्यक्ष झाल्या. १९०७ मध्ये सुरत काँग्रेसनंतर भरलेल्या स्त्री-परिषदेच्याही अध्यक्ष झाल्या. १९०८ मध्ये मुंबईला सेवासदन संस्थेची स्थापना केली. दुष्काळपीडितांना मदत करण्यापासून तो विद्यार्थिनींना नर्सिंग कोर्स देण्यापर्यंत किती तरी उपक्रम त्यांनीच सुरू केले.

त्यांच्या या समाजसेवेचा गौरव म्हणून सरकारने त्यांना ' केसर ई हिंद ' ही पदवी बहाल केली. मुंबई-पुण्यामध्ये त्याप्रीत्यर्थ त्यांच्या अभिनंदनाच्या टोलेजंग सभा झाल्या. खुद्द महात्मा गांधींनी त्यांचा गौरव केला. हिमालयाच्या पर्वतरांगांमधून एकाहून एक उत्तुंग अशी शिखरं दृष्टीस पडतात ना ?— अगदी तद्वत असंख्य कर्तृत्वाचं शिखरं रमाबाईंनी स्वकष्टानी उभी केली आहेत. शंभर वर्षांपूर्वी एका स्त्रीनं स्त्रियांच्याच प्रगतीसाठी, सुधारणेसाठी, केलेले हे परिश्रम पाहिले की आश्चर्य वाटतं, आदरानं मस्तक नमतं. ज्या काळात स्त्रियांना शिक्षण देणं, त्यांनी समाजात पुढाकार घेऊन पुरुषांच्या बरोबरीनं वावरणं, या गोष्टी निंदेच्या, उपहासाच्या मानल्या जात होत्या, त्या काळातच परोपकार बुद्धीनं, आत्मोद्धाराबरोबरच सर्व स्त्रीसमाजाचा उद्धार करण्याच्या भूमिकेनं रमाबाईंनी जे हे महान कार्य केलं, त्यासाठी तनमनधन चंदनाप्रमाणं झिजवलं, यातच त्यांचं लोकोत्तर व्यक्तिमत्त्वच दिसून येतं ! कुशाग्र बुद्धिमत्ता, सहनशीलता, अंगीकृत कार्याबद्दलची तळमळ, त्यासाठी

अपार कष्ट करण्याची तयारी या गुणांमुळंच त्यांनी हा कार्याचा प्रचंड व्याप उभा केला. अनेक निराधार स्त्रियांना त्यांनी आसरा दिला. अंधःकारात पिढ्या न् पिढ्या खितपत पडणाऱ्या स्त्रियांना प्रकाश दिला. अंगी कर्तृत्व असूनही रूढीबंधनांनी पिचून जाणाऱ्या स्त्रियांना नवनवीन कार्यक्षेत्रं उपलब्ध करून दिली. स्त्रियांना माणूस म्हणून पुरुषांच्याबरोबरीनं जगण्याचा हक्क आहे, अधिकार आहे, योग्यता आहे, हे स्त्रियांच्या आणि समाजाच्याही ध्यानी आणून दिलं ! यासाठी तात्यासाहेब केळकर आपल्या अग्रलेखात त्यांचा गौरव करताना म्हणतात– " रमाबाईंच्या ऋणातून महाराष्ट्रीय स्त्रीसमाज कधीही मुक्त होऊ शकणार नाही. सेवासदन हे अविश्रांत श्रमाचं, दक्षतेचं आणि स्त्रियांविषयीच्या कळकळींचं चालतं बोलतं स्मारक आहे ! " अशा त्या थोर समाजसेविकेला अनंत प्रणाम ! !

५

# माझा आवडता कथाकार

*माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !--*

आज या वक्तृत्वस्पर्धेमध्ये 'माझा आवडता कथाकार' या विषयावर मी बोलणार आहे.

नक्षत्रतारकांनी सारं आकाश खचून गेलं असलं तरी आपलं लक्ष एखादा शुक्राचा ताराच वेधून घेतो. अनेकविध—गगनचुंबी शिखरांनी सारे पर्वत नटले असले तरी हिमालयाची बरोबरी कोणीच करू शकत नाही. चित्रविचित्र रंगाकाराचे असंख्य पक्षी निसर्गसृष्टीत विहार करीत असले तरी आपला भव्य पिसारा पसरून नृत्य करणाऱ्या मोराची सलगी कोणताही पक्षी करू शकणार नाही. अगदी त्याप्रमाणंच मराठी कथेच्या प्रांगणात कै. हरिभाऊ आपट्यां-च्यापासून अनेक लहानथोर कथाकार आपआपल्या वैभवानं, कीर्तीनं आजवर चमकत असले तरी माझे मते रणजित देसायांच्याइतका श्रेष्ठ कथाकार अद्यापि झालाच नाही.

मित्रहो, रणजित देसाई माझे आवडते कथाकार आहेत. केवळ एवढ्या-साठी त्यांचा हा गुणगौरव मी अतिशयोक्तीनं करतो आहे, असं कृपा करून समजू नका !

१९४७ सालची गोष्ट आहे. 'प्रसाद' मासिकानं कथास्पर्धा विशेषकासाठी नवोदित लेखकांकडून कथा मागविल्या होत्या. गुणानुक्रमाने पहिल्या ठरांणाऱ्या

कथेला भरघोस पारितोषिक दिलं जाणार होतं. य. गो. जोश्यांच्यासारखे मार्मिक, चोखंदळ आणि अव्वल दर्जाचे कथाकार स्वतः परीक्षण करणार होते. स्पर्धेसाठी शेकडो कथा आलेल्या होत्या. अशा या अटीतटीच्या स्पर्धेत रणजित देसाई नावाच्या एका नवोदित कथाकारानं पहिला क्रमांक पटकावला. त्या यशस्वी कथेचं नाव होतं 'भैरव.' जोशीबुवांच्या या निर्णयाचं कौतुक साऱ्या महाराष्ट्रानं एकमुखानं केलं. स्तुतिसुमनांचा आणि अभिनंदनाचा वर्षाव या नव्या कथाकारावर झाला. फडके, खांडेकर व त्यानंतरच्या गोखले, गाडगीळ यांच्या मराठी लघुकथेनं एका नव्या युगात पदार्पण केलं. या नव्या युगाच्या मुजऱ्याचे मानकरी रणजित देसाई ठरले!

गेल्या तेरा चौदा वर्षांत जवळजवळ तीन साडेतीनशे कथा रणजित देसायांनी लिहिल्या. रूपमहाल, मधुमती, जाण, कणव हे त्यांचे कथासंग्रह एकाहून एक सरस ठरले आणि लोकप्रियतेचं एकेक शिखर आक्रमीत निघालेल्या या कथासम्राटाच्या मस्तकावर 'स्वामी' कादंबरीनं तर मानाचा मुकुट चढविला!

रणजित देसाई हे नाव उच्चारताच रसिक वाचकांच्या नजरेसमोर भैरव, रूपमहाल, चै अगदचै, आबाजी पाटील, रसिकराज शौनक, ताजमहाल, चांदीरा, मधुमती, वेडात दौडले सात, कौन भ्रम मूडले हस्त.... यासारख्या कितीतरी कथा येतात. खरं सांगायचं तर यांमधल्या कोणत्या कथेचं सौंदर्य तुम्हांला सांगावं? कोणत्या कथेचं रसग्रहण करावं? या संभ्रमात मी पडलो आहे.

नेसरी आणि कानडवाडीच्या परिसरात बहिलोल खानाला शह लावून बसलेला, छत्रपतींच्या एका वाक्यानं अवमानित होऊन आपादमस्तक पेटलेला तो प्रतापराव गुर्जर माझ्या नजरेसमोर सर्वप्रथम येतो. अवघ्या सहा साथीदारांसह शत्रूसेनेवर तुटून पडलेल्या त्या पराक्रमी वीराची मी कथा वाचली, तेव्हा अभिमानानं रोमांचून गेलो. वाटलं त्या सहा साथीदारांत आपणही एकजण आहोत आणि प्रतापरावांचा तो भीमपराक्रम आपण पाहात आहोत, अगदी समक्ष अनुभवीत आहोत.... तेवढ्यात एक उंचीपुरी व्यक्ती संथ पावलं टाकीत दारातून आत प्रवेश करते. लांबसडक नाक, खुरटी दाढी, मानेवर रुळणारे केस, एक गूढरम्य वातावरण बरोबर घेऊन ती व्यक्ती अनिमिष नेत्रांनी इकडं तिकडं पाहात असते. वाऱ्याच्या झुळकेनं त्याच्या अंगावरील

पायघोळ झगा फडफडतो, पायांतील चढावांवरील जरीची नक्षी क्षणभर लखलखून जाते–तो असतो इसा! ताजमहालची दर्दभरी कहाणी मला तो ऐकवतो. त्याच्या या निवेदनानं मी भारावून मंत्रमुग्धच होतो. तर कधी कधी प्रेम ही काय अजीब चीज आहे, याची यत्किंचितही कल्पना नसताना मधुमती, रूपमती, बकुल, चांदीरा, गुलशन या कथानायिका आपल्या अंतरीच्या व्यथा कथन करून जातात. त्यांच्या दर्दभरी कहाण्या ऐकून हृदयाला चटका लागतो. डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागतात, पण जाताजाता आपल्या नाजूक हातांनी माझ्या गालांवरून वाहणारी आसवं त्या अलगद पुसून जातात! आपल्या खानदानी कुळाला बट्टा लावणाऱ्या मुलाला, स्वतःच्या हातांनी कड्यावरून ढकलून देणारे आबाजी पाटील, शिवबांनी दिलेली मानाची कट्यार घेऊन येतात, तर केव्हा केव्हा जिवा नावाच्या चित्यावर पोराप्रमाणं प्रेम करणारा आणि त्या चित्याची राणीच्या बागेतील केविलवाणी अवस्था न पाहून त्याला विष खायला घालणारा व स्वत:चा देह ट्रकखाली झोकून देणारा वेडा नजरेसमोरून हलत नाही? मालकाच्या इशाऱ्याबरोबर सर्व शक्ती पणाला लावून वजनाची भरलेली गाडी कर कर ओढीत नेऊन विजय संपादणारा आणि पाठीवर चाबकाचा फटका बसताच बेभान होऊन समोरच्या मालकालाच शिंगावर घेऊन धावत सुटणारा तो भैरव असा नजरेसमोर उभा राहतो; तर दहा–पाच हरिणींच्या कळपात जंगलचा राजा होऊन गळयातील चांदीचा खुळखुळा वाजवीत दिमाखानं हिंडणारा तो चितळ नंदा मी कधी विसरूच शकत नाही.

मित्रहो— रणजित देसायांची ही कथासृष्टी अशी अद्‌भुतरम्य आहे. वास्तवापेक्षा तिला इतिहास अधिक आवडतो. संगीत आणि शृंगार यात ती न्हाऊन निघते. कलेसाठी, प्रेमासाठी आसुसलेली वेडी मनं जीवन स्वखुषीनं उद्‌ध्वस्त करून घेतात. स्वाभिमानानं पेटलेला सरदार असो, प्रेमानं विव्हल झालेली प्रेयसी असो, खानदान जिवापाड जपणारा जुन्या जमान्याचा अवशेष असो, साऱ्यांच्या भावनांचा आविष्कार देसाई इतक्या प्रभावीपणानं आणि कलात्मकतेनं करू शकतात की वाचक विस्मयचकित व्हावा. कधी आग्रा, कधी चितोड, कुठे काश्मीर तर कुठे गोवा, किंवा एखादं घनदाट जंगल अगर जुना पडका किल्ला यांच्या पार्श्वभूमीवर आपली कथा उभी करताना रणजित देसाई विशेष रंगतात. त्या त्या निसर्गस्थळापासून वाचकाला स्वत:बरोबर

हिंडवून आणतात. तोडी, भूप, ठुमरी, मल्हार अशा विविध राग-चिजांचा ते अशा कलात्मकतेनं उपयोग करतात की वाचकांनी सहजस्फूर्तीनं त्या जागी बहोत खूब ! अच्छा ! वाहवा ! अशीच दाद द्यावी. कथा काळजाला भिडताच भाव आपोआप फुलावेत, मस्तक धुंद होऊन जावं आणि आगळ्या वातावरणात विहार करून आल्याचं समाधान मनसोक्त अनुभवावं. कमावलेली प्रभावी भाषाशैली, चटकदार आणि आकर्षक प्रसंग, घटनांची जुळणी, भावभावनांची उत्कटता, राजवैभव, खानदानी दिमाख आणि मस्त बेहोषी आणणारं वातावरण— ही सारी सारी खास रणजित देसायांचीच वैशिष्ट्यं आहेत. त्यामुळंच लहान–थोर, नवोदित, जाणकार, टीकाकार आणि चोखंदळदेखील रणजित देसायांच्या कथा आवडीनं वाचतात.

आजही गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, जी. ए. कुलकर्णी ही नवकथेच्या प्रांतातली मातबर मंडळी जोमानं लेखन करीत आहेत. संग्रहामागून संग्रह प्रसिद्ध करीत राहिली आहेत. त्यांच्याही मागून येणारी अनेक नवकथाकार मंडळी आपले पृथगात्म वैशिष्ट्य जाणवून देण्याचा धाडसी प्रयत्न करीत राहिले आहेत, पण आकाशगंगेच्या पट्ट्यात चांदण्या चमचम करीत असाव्यात, क्षणभर विलक्षण तेजानं प्रकाशमान व्हाव्यात आणि पुन्हा लुप्त व्हाव्यात अशीच बहुतेकांची अवस्था आहे आणि म्हणूनच रणजित देसायांना एक कळकळीची विनंती करावीशी वाटते—

साहेब, मराठी कथासृष्टीची अवस्था आज अस्ताचलास चाललेल्या पेशवाईसारखी होत चालली आहे. अनेक मानाचे मातबर महालकरी विझत चालले आहेत. हातातील प्रभावी शस्त्रं बाजूला ठेवून 'गेला तो जमाना,' असा निराशेचा सूर काहीजण काढीत आहेत. नव्याजुन्यात मोठेपणाबद्दल भोंगळ स्पर्धा चालल्या असून, कित्येकजण परस्परांना पाण्यात पाहात आहेत, तर अशोक शहाण्यांसारखे मूर्ख राघोभरारी पुण्याईच्या कळसांनाही लाथा मारीत सुटले आहेत. अशावेळी या मराठी कथासृष्टीचे आपण माधवराव आहात—स्वामी आहात स्वामी !– सारी रसिक मंडळी आपल्यावर रमेप्रमाणं उत्कट प्रेम करीत आहेत, कौतुकाची निरांजनं ओवाळीत आहेत. खूप पराक्रम करा ! खूप मोठे व्हा ! खूप लिहा...

६

# महर्षी अण्णासाहेब कर्वे

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

दिनांक नऊ नोव्हेंबर एकोणीसशे बासष्ट रोजी भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांची प्राणज्योती मालवली. अवघ्या दोन-तीन तासांत ही वार्ता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वाऱ्यासारखी पसरली. या बातमीनं साऱ्या महाराष्ट्रावर दुःखाची कृष्णछाया पसरली. स्त्रियांच्या उद्धारासाठीं जन्मभर निष्ठेने राबणारा एक थोर समाजसेवक आज आपल्यामधून हरपला. अंगीकृत कार्यासाठी चंदनाप्रमाणे झिजणारा थोर महात्मा हरपला. असंख्य दलित, पतित स्त्रियांचा कैवारी गेला.... अशा आशयाचे उद्‌गार प्रत्येकाच्या मुखातून उमटले. भारावलेल्या अंतःकरणांनी देशभक्तांनी, समाजसेवकांनी, शिक्षणतज्ज्ञांनी, सामान्य-असामान्य सर्वासर्वांनी त्याला श्रद्धांजली अर्पण केली !

म. अण्णासाहेब कर्व्यांचं हे निधन अकाली, अकल्पित अथवा आकस्मिक असं मुळीच नव्हतं. एखादं फूल वेलीवर उमलावं, त्यानं आपल्या सुगंधानं दाही दिशा भरून टाकाव्यात आणि अखेरी पूर्ण विकासासाठीच त्याच्या पाकळ्याही गळून पडाव्यात; किंवा एखाद्या वृक्षावर फळ यावं, ते रससमृद्ध व्हावं आणि झाडापासून विलग व्हावं हे निसर्गनियमाला धरूनच आहे. आकाशात प्रभातसमयी उदयाला आलेला सूर्य दिवसभर प्रकाशमान होत मार्गक्रमणा करीत करीत पश्चिम क्षितिजावर येऊन थांबावा, आरक्त होऊन

क्षितिजाखाली लुप्त व्हावा, तद्वतच म. अण्णासाहेब कर्वे यांच्या जीवनाची अखेर झाली. जीवनाच्या परिपूर्तीसाठी, अंतिम पूर्णतेसाठी त्यांचे प्राण पंचत्वात विलीन झाले. नित्यनियमाप्रमाणे पहाटे उठल्यानंतर ते आपल्या चिरंजीवांना व स्नुषेला उद्देशून त्या दिवशी म्हणाले.... "मला आज तिकडे जायचं आहे, तिकडं जायचं आहे!"— मनानं जीवनसागराच्या पैलतीरावर ते कधीच येऊन उभे राहिले होते.... त्या दूतांना त्यांनी शांतपणं पाहिलं असेल! आणि जीर्णशीर्ण झालेली ही कुडी सोडून अधिक सुंदर होण्यासाठी हसत हसत ते त्यांनाच सामोरे गेले असतील! मृत्यूनंतरहि त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा कायम होती. शांतपणानं, समाधानानं झोप घेणाऱ्या एखाद्या योग्याप्रमाणं ते दिसत होते.

एकशेचार वर्षांचे उदंड आयुष्य महर्षी कर्व्यांना लाभलं होतं. नियतीनं त्यांच्यावर अक्षरशः कृपाछत्र धरलं होतं. या प्रदीर्घ आयुष्यामधला पाऊणशे वर्षांचा कालखंड त्यांनी समाजसेवेसाठीच खर्चला. नियतीलाही समाधान वाटावं एवढं थोर आणि अलौकिक कर्तृत्व त्यांनी करून दाखविलं.

अठरा एप्रिल अठराशे अठावन्न रोजी कोकणामधल्या 'शेरवली' या गावी अण्णांचा जन्म झाला. 'मुरूड' येथे प्राथमिक शिक्षण झालं आणि माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण दापोली व रत्नागिरी येथे झालं. इ. स. १८८४ मध्ये मुंबई विद्यापीठाची बी. ए. ही पदवी त्यांनी मिळविली. शिक्षणापायी अनंत हालअपेष्टा त्यांनीं सहन केल्या. सहाव्या इयत्तेच्या परीक्षेसाठी कर्दे, चिपळूण, पाटण, सातारा अशी पायपीट अवघ्या तीन दिवसांत करावी लागली. हातांनी स्वयंपाक करावा, खर्च वाचविण्यासाठीं मैलच्या मैल पायीच चालत जावं, अंगावर एखादा दुसराच कपडा–तोही सतरा ठिकाणी फाटून अठरा विश्वाचं दारिद्र्य लोकांना दाखविणारा, पुस्तकं असतील तर कागद नाहीत, कधी कंदील असेल, तर तेल नाही, अशा असंख्य त्रासांमधूनच त्यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं व त्यानंतर न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यासारख्या नामवंत शिक्षणसंस्थांतून उत्तम अध्यापक म्हणूनही काम केलं

अठराशे त्र्याण्णवपासून त्यांच्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ झाला. श्रीमती गोदूबाई जोशी यांच्याशी त्यांनी पुनर्विवाह केला. या घटनेनं अक्षरशः

जिकडं तिकडं हाहाकार उठला. सनातनी लोकांनी, धर्ममार्तंडांनी, रूढीपूजकांनी त्यांचा नानाविध मार्गांनी छळ केला. आप्तेष्टांनी बहिष्कार टाकला. भाऊबंदांनी वाळीत टाकलं, गावामधल्या टोळभैरवांनी कुचाळकी आणि निंदा यांचा वर्षाव केला. अण्णांचं आपल्या आईवर निरतिशय प्रेम आणि तसाच मुरुड गावावरही केवढा लोभ, पण त्याच गावात दिवसाढवळ्या उजळमाथ्यानं हिंडणं त्यांना अशक्य झालं आणि जन्मदात्या आईबरोबर लांब व पडवीच्या टोकाशी उभं राहून एखाद्या शूद्राप्रमाणे संभाषण –तेही चोरून मारून, अंधार असताना करण्याची पाळी आली. पण ही सारी उपेक्षा, निंदा, अपमान आणि छळ त्यांनी एखाद्या संताच्या वृत्तीनं शांतपणानं सोसला. स्त्रीजीवनाची उन्नती व जागृती हे अंगीकृत कार्य त्यांनी अधिक जोमानं, निष्ठेनं चालू केलं. त्यासाठी अहोरात्र परिश्रम केले. कष्ट सोसले. हिंगणे अनाथ बालिकाश्रम, महिला विद्यापीठ, निष्काम कार्य संघ, विधवाविवाहोत्तेजक मंडळ, समता संघ, भारतीय महिला विद्यापीठ अशा विविध संस्था स्थापन केल्या.

या संस्थांचं कार्य ते स्वतः आणि त्यांची पत्नी बाया तनमनधन सर्वस्व खर्चून करीत असत, पण निंदकांनी कधी एक दिवसही त्यांना स्वस्थतेचा लाभू दिला नाही. आश्रमातील स्त्रियांना अण्णा व त्यांचे सहकारी लुबाडतात, मारतात, इतकेच नव्हे तर अनैतिक मार्गाला लावतात, असे भयंकर आरोप जाहीररीत्या त्यांच्यावर केले गेले. इतकेच नव्हे तर काही वेळा कर्त्यांच्यावर खटलेही भरण्यात आले. आपल्या आत्मचरित्रात अण्णांनी असल्या किती तरी आठवणी सांगितल्या आहेत. त्या वाचताना आजही आश्चर्यानं अंगावर शहारे उभे राहतात. आणि आपला सारा हिंदू समाज त्यावेळी किती मूर्ख, अडाणी, अप्रगत विचाराचा होता, याची विदारक जाणीव होते व मस्तक बधीर होऊन जातं! आपल्या कामाचं स्वरूप आणि महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी अण्णांनी भारतभर दौरे काढले. शेकडो व्याख्यानं दिली. याचनेची हातामध्ये झोळी घेऊन सर्वत्र पैशासाठी हिंडले. अमेरिका, अफ्रिका, जपान, युरोप, अशा परदेशांतही याच कामगिरीसाठी ते जाऊन आले. या कामात मान, वैभव, कीर्तीची अपेक्षा नव्हतीच; उलट अपमान, निंदा, द्वेश, टीका या अग्निदिव्यामधून त्यांना जावं लागलं, पण एखाद्या स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने हा सारा छळ सहन केला व एखाद्या संताच्या वृत्तीनं समाजाची अखंड सेवा केली.

अण्णासाहेब कर्व्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना हे ध्यानी येतं, की कर्व्यांचं भाग्य खरोखरीच थोर होतं ! ज्ञानेश्वरापासून तो आंबेडकरांपर्यंतच्या समाजसेवकांना जे भाग्य लाभलं नाही, ते कर्व्यांना लाभलं. लोकमान्यता, राज्यमान्यता, विद्वान्मान्यता त्यांना याची देही याची डोळा लाभली. पुणे विद्यापीठ, महिला विद्यापीठांनी त्यांना 'एल्. एल्. डी' ही बहुमानाची पदवी दिली. पुणे नगरपालिकेत मानपत्र देऊन गौरव केला, तर भारत सरकारनं 'पद्मभूषण' व 'भारतरत्न' या पदव्या देऊन त्यांच्या देशसेवेबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. पाऊणशे वर्षं निष्ठेने केलेल्या देशसेवेचं चीज झालं. देशामधल्या सामान्य नागरिकापासून तो पंतप्रधान राष्ट्राध्यक्षांपर्यंत सर्वासर्वांनी त्यांच्या मोठेपणास मानवंदना दिली. अण्णांच्या आयुष्याचा उत्तरार्ध अतिशय सुखाचा, समाधानाचा तसाच वैभवाचाही ठरला !

अण्णासाहेबांच्या मनात महाराष्ट्राबद्दल जाज्वल्य अभिमान होता. चौपाटीवर पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्कारसमारंभात 'याची देही याची डोळा मराठी भाषेचं स्वतंत्र राज्य स्थापन झालेलं मला पाहायला मिळो !' ही आपली अखेरची इच्छा आपल्या भाषणात त्यांनी व्यक्त केली ! जमलेल्या लक्षावधी श्रोत्यांनी त्यांच्या या आकांक्षेला गगनभेदी टाळ्यांच्या कडकडाटांनी साथ दिली. त्या क्षणी या समाजसेवकाच्या अंगी सुप्त असलेला तेजस्वी राष्ट्रभक्त प्रकट झाला होता ! आपल्या एकाच वाक्यानं सारा महाराष्ट्र पुन्हा जिंकला होता !

म. अण्णासाहेब कर्व्यांचं व्यक्तिमत्त्व हे अनेक थोर गुणांचा समन्वय झालेलं दुर्मिळ व्यक्तिमत्त्व होतं. ते ध्येयवादी होते, निष्ठावंत होते, चारित्र्यसंपन्न होते, सतत परिश्रम करणारे होते, कर्तृत्वसंपन्न होते, प्रसिद्धीपराङ्मुख होते, साधुवृत्तीचे होते, संत मनाचे होते. अशा विविध गुणांच्या जोरावरच त्यांनी विरोधकांना जिंकून आपले कार्य यशस्वी करून दाखवले. ध्येयपूर्तीचे, स्वप्नपूर्तीचे, अपेक्षासाफल्याचे सोनियाचे दिवस अखेरी पाहू शकले.

अण्णांच्या मृत्यूनंतर अगणित अभागी कन्यांना आपला धर्मपिता हरवल्याचं दुःख झालं. अनाथ महिलांचा एकमेव आधार नाहीसा झाला. म. फुले, आगरकरांच्या थोर वारसदाराला महाराष्ट्र मुकला. महर्षी अण्णासाहेब

कर्वे यांचा अधिकार खरोखरीच फार मोठा होता. साऱ्या राष्ट्रानं आदरानं त्यांच्या पायावर लोटांगण घालावं, अशी ती वयोवृद्ध, तपोवृद्ध मूर्ती होती. आकाशात हात उभारून साऱ्या राष्ट्राला शुभाशीर्वाद देण्याची योग्यता आणि सामर्थ्य त्यांचे ठिकाणी होतं. त्यांच्या आशीर्वादाला, सहवासाला, दर्शनालाही महाराष्ट्र यापुढं मुकला याचं नितांत दुःख नव्या पिढीला होतं आहे.

भारावलेल्या अंतःकरणाने त्यांना ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून मी माझे भाषण संपवितो !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
विः ..................
अनुक्रम ..................
क्रमांक .................. नों: दि: ..................

७

# पं. जवाहरलाल नेहरू

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

सत्तावीस मे एकोणीसशे चौसष्ट रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या दुःखद निधनाची वार्ता अचानकपणे साऱ्या देशभर पसरली. अनेकांची अंतःकरणे विदीर्ण करीत, लक्षावधी लोकांच्या डोळ्यांतून अश्रू उभे करीत, कोट्यवधी लोकांच्या मुखांतून शोकग्रस्त आणि आश्चर्याचे उद्‌गार उमटवीत ती वार्ता साऱ्या देशभर पसरली. साऱ्या विश्वाला प्रकाश देणारा प्रतापचंड सूर्य माध्यानीच मावळावा आणि अंधाराच्या आवरणाखाली आकस्मिकरीत्या सारे जग लुप्त व्हावे, असा धक्का जगातल्या साऱ्या राष्ट्रांना बसला. देशोदेशींचे राष्ट्रध्वज खाली उतरवले गेले. शोकसंदेशाच्या सरीवर सरी भारतमातेचा दुःखदाह शमविण्यासाठी कोसळू लागल्या. भारतातील चाळीस कोटी जनतेचे चैतन्यच जणू एकाएकी लुप्त झाले. त्यांच्या जीवनाची प्रेरणाच खचली. त्यांच्या जीवन-नौकेचा कर्णधार गेला. मार्गदर्शक हरपला. आनंदात, दुःखात, आपत्कालात, वैभवात अंतरंगी रमणारा एक सुहृद एकाएकी साऱ्यांना सोडून, न सांगता, न बोलता, निरोपही न घेता निघून गेला......

ती मनोहारी मूर्ती आठवताच नेत्रांत अश्रू तरळतात. ते विलोभनीय कर्तृत्व आठवताच मस्तक आदरानं विनम्र होतं. तो अतुलनीय त्याग ध्यानी येताच हात आपोआप जोडले जातात !......

काश्मिरी गुलाबांचं सौंदर्य, कौल घराण्याची परंपरा, नेहरू कुलाचे वैभव, वडिलांचे कर्तृत्व आणि मातेची ऋजुता यांचा समन्वय साधून, वारसा घेऊन जवाहरलालांचा जन्म झाला होता. ऐश्वर्य पायाशी लोळण घेत होतं, सुख-समृद्धीच्या ऋद्धिसिद्धी दासीप्रमाणं हात जोडून उभ्या होत्या. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य शिक्षणाचे वारे इच्छेप्रमाणे घरादारांमधून वाहात होते. जवाहरलाल मनात आणते तर एखाद्या राजपुत्राप्रमाणं आयुष्यभर सुखोपभोगाचा आस्वाद घेत राहू शकले असते, पण हॅरो विद्यालयात आणि केंब्रिज विद्यापीठात शिक्षण घेऊन बॅरिस्टर झालेल्या भारतमातेच्या या सुपुत्रानं वैयक्तिक सुखदु:खांकडे पाठ फिरविली. म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या स्वातंत्र्यलढ्यात कर्तव्य म्हणून उडी घेतली. १९१० पासून एखाद्या निष्ठावंत स्वयंसेवकाप्रमाणं ते म. गांधींच्या बरोबर हिंडत होते. १९२१ सालापासून त्यांच्या कर्तृत्वाला खरा बहर आला. आपल्या लेखणी, वाणी, कृतीनं स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पेटविलेलं रणकुंड १९४२-४६ पर्यंत सतत धगधगत ठेवण्यात ते ऋत्विजाप्रमाणे अग्रभागी होते. अ भा. काँग्रेसच्या चिटणीसपदाची, अध्यक्षपदाची धुरा त्यांनी जोखमीनं वाहिली. देशोदेशी भारताचं प्रतिनिधित्व केलं. तुरुंगवास भोगले, पण स्वातंत्र्याचा महामंत्र सामान्य जनतेच्या अंत:करणापर्यंत पोहोचवण्याचे व्रत कधी सोडलं नाही !

एकोणीसशे सत्तेचाळीस साली भारत देश स्वतंत्र झाला. त्या वेळीं पंतप्रधानकीची, मानाची, जबाबदारीची माला एकमुखानं जवाहरलालजींच्या कंठी घालण्यात आली. एक नव्हे, दोन नव्हे, सतत सतरा वर्षे ! खरोखरीच भारतीय जनतेच्या अंत:करणातील सिंहासनावर आरूढ झालेले ते अनभिषिक्त सम्राट होते. त्या सिंहासनावर आरूढ होऊन ते उच्चरवानं साऱ्यांना सांगू लागले – " यापुढं संघर्ष नको – सहकार्य हवे, स्वत्वांचा उच्छेद नको – रसग्रहण हवे, भेदाभेद नको – सुखसंवाद हवा, हेवेदावे नकोत – शांतता हवी ! " – सत्य अहिंसा या श्रेष्ठ जीवनमूल्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी, मानवता आणि बंधुतेच्या प्रसारासाठी, देशादेशांत ऐक्य आणि समझोते प्रस्थापित करण्यासाठी पंडितजी अहोरात्र श्रमले, तळमळले, खपले. बर्मा, थायलंड, इंडोनेशिया, चीन, जपान, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया, इटली, इजिप्त, आयर्लंड, फ्रान्स, इंग्लंड, इस्रायल, कॅनडा, युरोप,

अमेरिका, रशिया, किती किती देशांची नावे सांगावीत? जागतिक शांततेसाठी, दीनदलितांच्या उद्धारासाठी, पददलितांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, पारतंत्र्याची जुलमी जोखडं झुगारुन देण्यासाठी, अभाग्यांचे अश्रू पुसण्यासाठी आणि महायुद्धाच्या भयंकर वणव्यामधून साऱ्या जगाला वाचविण्यासाठी क्षणोक्षणी ते धावत गेले.

केवळ लढाया जिंकणारे, साम्राज्यविस्तार करणारे, तत्त्वज्ञान सांगणारे, साहित्यकला – विज्ञानादि एकेका शाखेत श्रेष्ठत्व संपादन करणारे महापुरुष आजवर जगाच्या इतिहासात असंख्यात होऊन गेले असतील, पण साऱ्या जगाची चिंता वाहणारा, सर्व गोरगरिबांच्या, रावरंकांच्या, तत्त्वज्ञानी-मुत्सद्द्यांच्या साहित्यिक-कलावंतांच्या, आबालवृद्धांच्या अंतःकरणावर स्नेहाचे अमृतसिंचन करणारा जवाहरलाल हा एकच एक महापुरुष होय! असा भाग्यविधाता जगाच्या इतिहासात आजवर झाला नाही. पुढे होणे हे केवळ असंभवनीय!!...

जगाच्या इतिहासाचे सिंहावलोकन करताना, मानवाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचा ते वारंवार धिक्कार करताना आढळतात, तर प्रखर बुद्धिवादाचा आणि विज्ञानातील सामर्थ्याचा गौरवही मुक्तकंठानं करताना आढळतात. मात्र हे आपलं सामर्थ्य आणि बुद्धिवैभव कर्तृत्व आणि सारे प्रयत्न अखेरी मानवजातीच्या कल्याणासाठीच उपयोगात आणले पाहिजेत, असा आग्रहही वारंवार करताना ते आढळतात. एवढ्यासाठीच ते आयसेन हावर क्रुश्चेव्ह, केनडी, मावो त्से तुंग इ. परस्परविरोधी विचारवंतांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत होते. स्वकीयांचा रोष पत्करूनही एकांडेपणानं, श्रद्धेनं, निष्ठेनं, अविश्रांत झगडत होते. प्रयत्न करीत होते. केवळ जगत्कल्याणा-साठी! मानवतेच्या उद्धारासाठी!!

खरोखरीच पंडितजी म्हणजे विसाव्या शतकातील नवचैतन्याची लाट होते. विश्वशांततेची ध्वजा होते. नव्या युगातील धर्म होते. मानवतेचं एक सुंदर स्वप्न होते, पण निर्घृण काळानं, आपल्या असुरी शक्तीनं ही चैतन्याची लाट विस्कटून टाकली. आपल्या राक्षसी हातानं ही शांततेची ध्वजा पाडून टाकली. आपल्या कराळ मुखामधून विषारी फुंकर मारुन मानवतेचं ते सुंदर स्वप्न विरवून टाकलं ....

The Woods are lovely dark and deep.
But I have promises to keep,
And miles to go before I sleep
And miles to go before I sleep……

या रॉबर्ट-फ्रॉस्टच्या ओळी दाही दिशांतून अस्फुट स्वरात ऐकू येतात. गंगेच्या लाटांतून प्रतिध्वनीत होतात, भारतमातेच्या कणाकणांतून हुंकार देताना जाणवतात...

पंडितजी आपल्यामधून खरोखरीच गेले का? नाही! मुळींच नाही! किनाऱ्यावर उभ्या असलेल्या दिपस्तंभाप्रमाणं ते आजही अवकाशात उभे असतील. अदृश्य शरीरानं, रूपानं! तुम्हा आम्हा सर्वांना प्रेरणा देत, मार्ग दाखवीत! आणि म्हणूनच मला असं म्हणावंसं वाटतं, पंडितजी अजरामर झाले! भारतमय झाले! नव्हे विश्वमय झाले! त्यांच्या पवित्र स्मृतींना त्रिवार वंदन करून मी माझं भाषण संपवितो!

८

# मराठी रंगभूमीचे भवितव्य

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !* —

प्रत्येक देशाच्या संस्कृतीच्या इतिहासात त्या देशाच्या रंगभूमीला आणि नाट्यवाङ्मयाला फार मोलाचं स्थान असतं. एक वेळ आम्ही आमचं सारं साम्राज्य हातचं घालवू, पण आमच्या शेक्सपिअरला कदापीही गमावणार नाही, असं प्रत्येक इंग्लिश रसिक मोठ्या अभिमानाने सांगत असतो. याचं कारण काय, तर याचं कारण इतकंच की, त्या राष्ट्रातल्या सुशिक्षित लोकांना संस्कृतीच्या जीवनातलं रंगभूमीचं महत्त्व बरोबर समजलं आहे.... आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीबाबत बोलायचं झालं तर आपल्यालाही असंच म्हणावं लागेल की—मराठी रंगभूमीनं महाराष्ट्राच्या संस्कृतीची जडण, घडण, जोपासना याबाबतीत फार मोलाचं कार्य केलं आहे आणि म्हणूनच स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेल्या इतर कोणत्याही विषयांपेक्षा ' मराठी रंगभूमीचे भवितव्य ' हाच विषय मला सांस्कृतिकदृष्ट्या अधिक महत्त्वाचा वाटला. दुसरी गोष्ट अशी की हिंदूंचे पुण्यक्षेत्र जशी काशी अगर मुसलमानांचे मक्का, तद्वत मराठी नाट्यकलेचे उपासक आणि भक्त यांच्या दृष्टीने सांगली हे महान पुण्यक्षेत्रच आहे. गंगेच्या उगमस्थानाप्रमाणं मराठी नाट्यकलेचा उगम सांगलीलाच झाला आणि देवल–खाडिलकरांसारखे नाट्यमहर्षी सांगलीलाच निर्माण झाले. अगदी एवढ्यासाठीच एक

सांगलीकर नागरिक म्हणून मराठी रंगभूमीच्या भवितव्यासंबंधी काळजी वाटावी हे स्वाभाविक नव्हे काय ?

मित्रहो–मराठी रंगभूमीच्या उद्याच्या भवितव्यासंबंधी विचार करण्यापूर्वी प्रथम आपण तिचा दिव्य असा भूतकाळ डोळ्यांसमोर आणला पाहिजे. तो काळ आपल्या नजरेसमोर उभा राहिला म्हणजे एक दिव्य, अलौकिक अशी यक्षसृष्टीच आपण पाहात आहोत की काय, असा संभ्रम निर्माण झाल्याखेरीज राहात नाही ! मी सांगतो असं एक दृश्य तुम्ही तुमच्या नजरेसमोर उभं करण्याचा प्रयत्न करा. ... ऐन दिमाखात तळपणाऱ्या किर्लोस्कर नाट्यगृहात पुण्यामधल्या जाणत्या रसिक प्रेक्षकांची चिक्कार गर्दी जमली आहे. गडद डाळिंबी रंगाचा जाड मखमलीचा पडदा साऱ्यांच्या नजरेसमोरून मंदपणानं झुलतो आहे. झगझगीत प्रकाशाच्या रोषणाईनं त्या पडद्यावरील उंची जरीकिनारी पट्टे चम् चम् चम् चमकताहेत. पडद्याखालीच ऑर्गनच्या भरदार सुराशी तबल्या-डग्ग्याचे खडे बोल मोठी मोहक जुळवाजुळव करीत आहेत. इतक्यात पडद्यामागं तिसरी घंटा घणघणते आणि नजरेसमोरील तो मखमलीचा पडदा असा बरोबर मधे दुभंगून करकरत करकरत दोन्ही कोपऱ्यांत दुमडून बसतो आहे. रंगभूमीवरील लखलखणाऱ्या देखाव्यानं प्रेक्षकांचे डोळे दिपून जातात. नांदीच्या गोड आणि भरघोस सुरांनी कान भारलेले असतात. धुपाच्या वासानं मन प्रसन्न होऊन गेलेलं असतं आणि तेवढ्यात दादा, ते आले ना ? हे अमृतालाही लाजविणारे मधुर शब्द आणि त्यापाठोपाठ आप्सरांच्याशी स्पर्धा करणारं बालगंधर्वांचं असामान्य लावण्य जणू स्वर्गातूनच उतरल्याप्रमाणं आपल्यासमोर येतं. असीम आनंदाची एक उत्कट लहर साऱ्या नाट्यगृहभर पसरते आणि या आनंदाच्या धुंदीत प्रेक्षकांच्या चित्तवृत्ती इतक्या बेहोष होऊन जातात की बालगंधर्वांनी सर्वांगाला फासलेल्या उंची अत्तरांची दरवळ साऱ्या थिएटरभर पसरून गेल्याची जाणीवही कुणाला होत नाही. प्रवेशामागून प्रवेश, अंकामागून अंक रंगत रंगत जातात खटकेबाज संवाद, दर्जेदार अभिनय, कर्णमधुर संगीत पाहता, ऐकता रात्र संपून दिवसाचे दूत पूर्वक्षितिजावर केव्हा येतात, याची दखलही प्रेक्षकांना राहात नसे !.......

पण मित्रहो, रोमांचकारी दृश्यावर मी मुद्दामच इथं पडदा टाकणार

आहे. मराठी रंगभूमीचा पूर्वकाल किती भव्य, दिव्य होता याची एक छोटीशी झलक मी तुम्हांला दाखवली. याचा अर्थ असा मुळीच नव्हे की हा सारा बाहेरचा थाटमाट म्हणजे मराठी रंगभूमीचं सारं वैभव होतं. हा सारा साज-शृंगार तर मराठी रंगभूमीवर रुजू होताच, पण त्याहीपेक्षा अधिक मौल्यवान, अधिक तेजस्वी अशीही काही सजावट रंगभूमीच्या जामदारखान्यात रुजू होती. आणि ही दौलत कोणती? तर मोरबा वाघुलीकर, बाळकोबा नाटेकर, गणपतराव जोशी, केशवराव दाते, गणपतराव बोडस, बालगंधर्व ही होय! आणि त्यांच्या पुढं जाऊन सांगायचं झालं तर किर्लोस्कर, खाडिलकर, देवल, गडकरी इ. बृहस्पतीच्या तोडीचे विद्वान, प्रतिभासंपन्न नाटककार आणि सौभद्र, कीचकवध, शारदा, एकच प्याला यांसारखी थोर नाटकं ही रंगभूमीची खरीखुरी दौलत होती! पण रंगभूमीच्या जीवननाट्यामधला हा भाग्यशाली अंक संपला आणि आज आपल्यासमोर 'एकच प्याला' मधल्या फाटक्या वस्त्रानिशी जात्यावर दळायला बसलेल्या सिंधूप्रमाणं कंगाल आणि केविलवाणी स्थिती झालेल्या अवस्थेमधील मराठी रंगभूमी आहे. तिची ही स्थिती किती केविलवाणी झाली आहे, याची तुम्हाला कल्पना यावी म्हणून एक छोटीशी गोष्ट सांगतो. एका नाटक कंपनीचा मुक्काम फिरत फिरत एका गावी आला. काही ऐतिहासिक आणि पौराणिक नाटकं झाल्यानंतर त्यांनी एके दिवशी आपला हातखंडा सामाजिक नाटकाचा प्रयोग जाहीर केला, पण गंमत अशी झाली की त्या नाटकात नायकाचं काम करणारा नट धावत पळत त्या दिवशी मालकाकडे आला. एक दीर्घ उसासा टाकून मालकाला तो म्हणाला, "मालक, आज सामाजिक नाटक जाहीर केलंय आपण?'

मालक म्हणाले, "होय"!

"मग आज चांगले भट्टीचे कपडे आणले पाहिजेत आणि आधी मला दाढी करून यायला पाहिजे. मला नायकाचं काम आहे आजच्या नाटकात, तेव्हा एक दोन आणे द्याल तर ऽऽऽ...."

"अरे मग असं करा, आत्ताच तो सामाजिक नाटकाचा बोर्ड लावलाय ना बाहेर, तो काढून टाका आणि ते कालचंच ऐतिहासिक नाटक खास लोकाग्रहास्तव म्हणून जाहीर करा. त्या कालच्याच नाटकात तुम्हाला दाढीवाल्या पठाणाचंच काम आहे ना? म्हणजे तुमच्या या दाढीचा चांगला उपयोगही झाला...."

" अहो पण ऽऽ....

" खरं सांगू का, तुम्हाला दाढीसाठी द्यायलासुद्धा पैसे नाहीत माझ्याकडं !! "

मित्रहो— परवा परवापर्यंत मराठी रंगभूमी कोणत्या अवस्थेत जगत होती, याची पूर्ण कल्पना तुम्हाला आली असेल ! आणि त्यापाठोपाठ मराठी रंगभूमीला ही अवनतावस्था का प्राप्त झाली असावी ? असा प्रश्नही उभा राहिला असेल ! या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. ती उत्तरं आधी पाहू – सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर असं म्हणतात की, ' मराठी रंगभूमीला सध्याची जी दुःस्थिती प्राप्त झाली आहे, तिची माझ्या मताप्रमाणं जी अनेक कारणं आहेत, त्यांपैकी पहिलं कारण असं – " या रंगभूमीला चांगल्या चांगल्या नाटकांचा तुटवडा, कुशल नटनटींचा अभाव, त्यामुळे सध्याची रंगभूमी अतिशय निस्तेज वाटते. नाट्यगृहे नाहीत म्हणून नाटकमंडळ्या नाहीत, नाटकमंडळ्या नाहीत, म्हणून नाटककार नाहीत आणि नाटककार नाहीत म्हणून पूर्वीसारखी प्रभावी नाटकं रंगभूमीवर येत नाहीत. असं हे विचित्र दुष्ट चक्र आहे ! " तर मामा वरेरकर सांगतात, " अहो, परिणामकारक नाटकांचा तुटवडा मुळीच नाही, पण ती तितक्या प्रभावीपणं बसविणारा नटवर्ग आहे कुठे ? " चिंतामणराव कोल्हटकर म्हणतात, " नटवर्गाचा तुटवडा मुळीच नाही हो. तो मी लागेल तेवढा देतो, पण जनतेकडूनच आमची गळचेपी केली जात आहे ! " मराठी रंगभूमी कधी ध्येयवादाचं प्रेरित झालीच नाही, म्हणून तिची अशी दशा झाली, हे एका टीकाकाराचं मत. तर असा निष्कर्ष काढणं म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे, असा त्यावर आचार्य अत्र्यांचा टोला ! कोणी सांगतं सिनेमाच्या आक्रमणामुळं रंगभूमी ही अवस्था प्राप्त झाली, तर काही महाभाग म्हणतात, " अहो, मराठी रंगभूमी मेलीच, तिचा पुनरुद्धार कसला करता ? " मित्रहो, ही सारी कारणं एका अर्थी खरी आहेत आणि एका अर्थी खोटीही आहेत, पण एक गोष्ट निर्विवाद सत्य आहे ती ही की, मराठी रंगभूमी कधी मेलेली नाही आणि मरणारही नाही ! कारण नाट्य ही एक जिवंत कला आहे. आपल्या दैनंदिन जीवनाशी ती निगडीत आहे. आपली सुखदुःखं, हर्षखेद त्यावर आधारलेली आहेत. या बाबतीत विचार करताना प्रा. फडके यांनी काहीसा स्वतंत्र विचार केला. ते म्हणतात, " मराठी रंगभूमीचे मारेकरी प्रामुख्यानं दोन आहेत. त्यांपैकी

क्रमांक एकचे मारेकरी म्हणजे नाट्यगृहाचे जुने मालक. बोलके चित्रपट आल्यावर या मालकांना नव्या धंद्यातला फक्त पैसा दिसू लागला आणि सामान्य जनतेच्या नाट्यप्रेमाची यत्किंचितही पर्वा न करता खुशाल त्यांनी नाट्यगृहाची चित्रपटगृहं करून टाकली! एवढं प्रख्यात कोल्हापूरचं पॅलेस थिएटर, पण कोण दैना त्या नाट्यगृहाची! क्रमांक दोनचे मारेकरी म्हणून जर कुणाला खेचावं लागणार असेल तर सामान्य जनता आणि आपलं सरकारही. निरनिराळ्या नाट्यमहोत्सवांमध्ये ज्याचं कोडकौतुक करते आहे, ते सारे धूर्त, लबाड, स्वार्थसाधू नट, नटवर्य, नटश्रेष्ठ हेच होत! मित्रहो-- रंगभूमी-पेक्षा चित्रपटाच्या व्यवसायात पैसा अधिक मिळतो, कमी श्रमात प्रसिद्ध भरपूर मिळते हे पाहताच, झाडून सारे रंगभूमीशी बेइमानी करून चित्रपट क्षेत्राकडं धाव घेऊ लागले, पण तिथं नवीन मुखवटा येताच जुन्याचा भाव जातो, असं पाहिल्याबरोबर पुन्हा नाक मुठीत धरून ते जुन्या व्यवसायाकडंच वळताहेत आणि मोठेपणाचा, कळकळीचा आव आणून रंगभूमीच्या पुनरुद्धाराच्या गप्पा ते सांगू लागले आहेत. जी गोष्ट नटश्रेष्ठांची तीच नाटककारांची! चित्रपटांच्या कथा लिहिण्यात अधिक पैसा मिळतो, हे पाहताच नाटककारांनीही रंगभूमीशी इमान आणि निष्ठा ठेवण्याऐवजी त्यांनीही साऱ्यांबरोबर पळ काढला आणि ते केवळ कथा, पटकथा, संवाद लिहून थांबले नाहीत, तर स्वतः दिग्दर्शक बनले, चित्रपटसंस्था काढल्या! तेव्हा आपल्याला हे मान्य करावं लागेल की, मराठी रंगभूमीच्या अवनतीला दुसरी-तिसरी कोणतीही कारणं नाहीत, तर नाट्यगृहांचे जुने मालक, उत्तमोत्तम पदव्यांच्या आवरणाखाली दडलेले ते नटश्रेष्ठ आणि रंगभूमीशी बेइमान झालेले नाटककार या सर्वांनी मराठी रंगभूमीची ही अवनतावस्था करून टाकली.

मित्रहो, मराठी रंगभूमीचा आपल्याला खराखुरा उद्धार करायचा असेल, तर तिला प्रथम या बेइमानी लोकांच्या तावडीतून सोडवली पाहिजे. आचार्य अत्र्यांसारख्या राजकारण आणि चित्रपटांत आज रमलेल्या साहित्यिकाला, बाबूराव, आजची मराठी रंगभूमी अतिशय कंगालावस्थेमध्ये घराबाहेर पडते आहे, तेव्हा जग काय म्हणेल? याचा विचार करा असा स्पष्ट जाब विचारला पाहिजे. मामा वरेरकरांना सांगितलं पाहिजे की मामा, तुमची लेखणी रहस्य-

कथा लिहायला जन्माला आलेली नाही, ती रंगभूमीच्या वैभवशाली मंदिरावर 'सोन्याचा कळस' चढविण्यासाठी जन्मलेली आहे. केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, बाबूराव पेंढारकर आदि नटश्रेष्ठांना हे कळलं पाहिजे की आपण खरोखरीच रंगभूमीवर सम्राट आहोत. प्रसिद्धी आणि पैसा यासाठी रुपेरी बाजारात आपण उभं राहणं केव्हाही योग्य ठरणार नाही! प्रामुख्यानं सरकारनं रंगभूमीच्या पुनरुद्धारासाठी प्रयत्न केले पाहिजेत. उत्तम थिएटरं बांधली पाहिजेत, ती माफक भाड्यानं दिली पाहिजेत. नट, नाटककारांचा गौरव-विद्वान, शास्त्रज्ञ, पंडितांबरोबर सरकारदरबारी झाला पाहिजे. शिक्षणक्रमात नाट्यकलेला स्थान मिळालं पाहिजे. जुनी परंपरा टिकवणारे नवीन नट सातत्याने तयार झाले पाहिजेत. त्यांच्या कलागुणांच्या आविष्कारासाठी, समाजाच्या नवनवीन अपेक्षा पुऱ्या करण्यासाठी उत्तमोत्तम नाटककारही अवतरले पाहिजेत. मला हे मान्य आहे की एकसमयावच्छेदेकरून या गोष्टी घडायला फार अवधी लागेल. खूप पैसा लागेल. खूप परिश्रमही घ्यावे लागतील. पण हे सारं घडलं तर?— मराठी रंगभूमीचा उज्ज्वल भविष्यकाल खात्रीनं दूर नाही! कारण मराठी माणसाला राजकारण-तत्त्वज्ञानाबरोबरच जर दुसरी कोणती एकच गोष्ट आवडत असेल, तर ती नाटक हीच होय. नाटकात तो बेहोष होतो. आनंदित होतो. आपल्या साऱ्या व्यथा तो तिथं विसरून जातो. नाटक मराठी माणसांच्या रोमरोमांत भिनलेले आहे आणि म्हणूनच मराठी रंगभूमीचा भविष्यकाल मोठा उज्ज्वल आहे, अशी आशा मला वाटते. कारण— पूर्व दिव्य ज्याचे त्यांना रम्य भाविकाळ हे त्रिकालाबाधीत सत्य आहे!

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४००७६ वि: निबंध
क्रमांक ९६०३ नों वि: २८।१।५५

१

# वृत्तपत्रांचं कार्य

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

स्पर्धा समितीनं दिलेल्या एकूण आठ विषयांपैकी आज मी तुमच्यासमोर 'वृत्तपत्रांचं कार्य' हा विषय माडणार आहे. काही निश्चित असा विचार करून मी इतर विषय बाजूस सारले आणि हाच विषय भाषणासाठी निवडलेला आहे.

भवभूती सांगतो त्याप्रमाणं काळ अनंत आणि पृथ्वी अफाट आहे. तेव्हा आपल्या समाजात पुन्हा कधीना कधी तरी नाट्याचार्य खाडिलकर, कर्मवीर भाऊराव पाटील असे थोर पुरुष खात्रीनं निर्माण होतील. उद्याच्या काळात नवभारताच्या निर्मितीमधला स्त्रियांचा वाटा स्त्रिया जरूर उचलतील. आपल्या मराठी भाषेला उज्ज्वल भविष्यकाल जरूर लाभेल आणि आदर्श खेडीहि उभी राहतील आणि नव्या परिस्थितीस अनुरूप असे गणेशोत्सवाचे स्वरूप बदलेलही ! या साऱ्या गोष्टी कालौघात आपोआप घडतील. काही हेतुपुरस्सर कराव्या लागतील— पण या सर्व गोष्टींची जाणीवपूर्वक दखलगिरी घेतील ती वृत्तपत्रेच. प्रसंगी बऱ्यावाईट गोष्टींचं खंडनमंडन करून त्यांना योग्य ते वळण देण्याची जबाबदारीही त्या काळात वृत्तपत्रकारांनाच करावी लागणार आहे. एखादा शिल्पकार मूर्ती घडवू शकतो, त्याप्रमाणंच एखादा थोर वृत्तपत्रकारही साऱ्या समाजाचं स्वरूप बदलू शकतो, त्या समाजात चैतन्य निर्माण करू शकतो, ध्येयवाद आणि आशावाद निर्मू शकतो. राष्ट्राच्या जडणघडणीत

वृत्तपत्रकारांचा फार मोठा वाटा असतो. हे ओळखूनच 'वृत्तपत्रांचं कार्य' हाच विषय मी तुमच्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

या विषयाचा मूलगामी विचार करू जाता पहिलाच प्रश्न उपस्थित होतो तो हा की वृत्तपत्र ही संस्थाच मुळीं कशी अस्तित्वात आली असावी? का निर्माण झाली असावी? या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर आपल्याला मिळालं की बऱ्याच अंशी वृत्तंपत्राचं कार्य कोणतं, तेही कळल्याप्रमाणं होईल.

मनुष्यप्राणी हा इतर प्राणिमात्राहून वेगळा म्हणून ओळखला जातो तो त्याच्या बुद्धिमत्तेमुळं! अविरत ज्ञानलालसा असणं, जिज्ञासा जागृत असणं हेच बुद्धी असल्याचं लक्षण आहे. केवळ यासाठीच मनुष्य आपल्या पंचेंद्रियाच्या सहाय्याने हरएक गोष्टीचा आस्वाद घेऊ इच्छितो. सभोवारचं जीवन आणि विश्व जाणून घेण्यासाठी धडपडतो आहे.

नसत्या गोष्टीची मुद्दाम चौकशी करणं ही तर माणसाची सहज प्रवृत्ती आहे. हिमालयावर चढताना कोणत्या परिस्थितीला शेरपाला तोंड द्यावं लागलं, इंग्लिश खाडी पोहून जाणाऱ्या एखाद्या जलतरणपटूने कसकसा विक्रम केला, हे कोणी सांगेल तर आपल्याला हवं असतं, दोन शेजार-शेजारच्या राष्ट्रांत तंटेबखेडे निर्माण झाले तर त्या तंट्याबखेड्याचं स्वरूप नेमकं कळलं तर आपल्याला ते हवं असतं. पक्षोपपक्षात मतभेद निर्माण होऊन परस्पर ते एकमेकांवर हल्ले–प्रतिहल्ले चढवू लागले म्हणजे आपणाला पटलेली बाजू आपण दुसऱ्यालाही पटवून देण्याचा प्रयत्न करू लागतो. सांगलीत राहून मॉस्कोमध्ये काय चाललं आहे, न्यूयार्कला कोणत्या हालचाली घडताहेत, पेकिंगची परिस्थिती कशी काय आहे – या साऱ्या गोष्टी थोड्या वेळात अल्प खर्चात सहजासहजी उपलब्ध झाल्या तर खात्रीनं आपण त्या ऐकू, वाचू, समजून घेऊ.

मित्रहो, नेमकी ही जिज्ञासा पूर्ण करण्यासाठीच वृत्तपत्राचा जन्म झाला. म्हणूनच असं म्हटलंही जातं की भरपूर वार्ता पुरवितं ते वृत्तपत्र. ताज्या, महत्त्वाच्या अनेक वृत्तांचा पुरवठा करणं हे वृत्तपत्रांचं आद्यकर्तव्य!

पण गंमत आहे की कोणत्याही ठिकाणच्या कसल्याही बातम्या कळून आपलं काही समाधान होत नाही. त्या बातम्यांत विशेष काही तरी असलेच

पाहिजे, शिवाय त्या शक्य तितक्या सत्य असल्या पाहिजेत. 'न्यूजपेपर्स हॅण्ड बुक' या पुस्तकाच्या लेखकानं असं आग्रहानं सांगितलं आहे की "हाती आलेल्या वार्तामधून एखाद्या जवाहिऱ्याच्या चोखंदळपणानं महत्त्वाची वार्ता दक्षतेनं निवडली पाहिजे. वार्ता संपूर्ण सत्य असेलतरच द्यावी. मग वार्ता व्यक्तीसंबंधी असो, पक्षासंबधी असो अगर राष्ट्रासंबंधी असो." यावरून सत्याला वृत्तपत्रव्यवसायात किती महत्त्व असते, हे तुमच्या ध्यानी येईल.

पण आपल्याच स्वभावाचा आणखीन असा एक विशेष आहे—एखादी वार्ता जशीच्या तशी कळली तरी आपलं तितकंसं समाधान होत नाही. ' जनरल थिमय्यांनी राजीनामा दिला, " " आयसन हावर भारताला भेट देणार, " " पाकिस्तानमध्ये लोकशाहीपद्धतीनं निवडणुका घेतल्या जाणार"–अशा बातम्यांनी आपल्या मनाला फारसं समाधान होत नाही, तर त्याहून अधिक काही गोष्टी त्याचवेळी आपल्याला समजाव्यात अशीही आपली इच्छा असते. थिमय्यांचं म्हणणं काय होतं, मेनन याची भूमिका काय होती ? त्यांत बरोबर भूमिका कोणाची होती ? थिमय्यांच्यावर अन्याय झाला का ? हे जाणून घेण्यासाठी आपण उत्सुक असतो. आयसन हावर भारतात येण्यानं आंतरराष्ट्रीय राजकारणात काही महत्त्वाची उलथापालथ होण्याची शक्यता आहे का, याचाही साहजिकच आपण विचार करू लागतो. काही अंदाज बांधू लागतो. मुख्य वार्तेबरोबरच उलटसुलट विचारांची वादळं आपल्याला पाह्यला मिळाली, ऐकायला मिळाली, तर त्यात केवढा आनंद भरलेला असतो ! आणि म्हणूनच आनंदाबरोबरच आपल्या विचारांना चालना देणं हीही अपेक्षा आपण वृत्तपत्राकडून करू शकतो.

तेव्हा केवळ वार्ता देणं एवढंच वृत्तपत्रांचे काम नव्हे, तर त्या सत्य स्वरूपात मांडणं, त्यांतील महत्त्वाच्या वार्तांबद्दल उलटसुलट काही चर्चा करणं, मतं मांडणं ही देखील वृत्तपत्राचीच कामं ठरली. कित्येकवेळा संपादकीय मंडळाव्यतिरिक्त समाजातील विद्वान मंडळी यात भाग घेतात. मुलाखती देतात, व्याख्यानं देतात, लेख लिहितात आणि समाजाला जागृत करून विचारही करायला प्रवृत्त करतात. एवढ्याचसाठी आगरकर आग्रहानं सांगत—लोकमताची जागृती करणं हेच वृत्तपत्राचं खरं कार्य आहे ! तर लोकमान्य टिळक सांगतात, ' जुलमी किंवा अनियंत्रित राज्यपद्धतीत सरकारवर प्रखर टीका करून जनमतांचा उद्‌घोष करणं हे वृत्तपत्राचं कामच आहे ! ' इंग्रजी

साहित्यात केवळ एवढ्यासाठी चौथी शक्ती, म्हणून वृत्तपत्रीय लेखनाचस गौरव केला जातो.

याच भूमिकेमधून वृत्तपत्रं गेल्या शंभर–दीडशे वर्षांत काम करू लागली. फ्रान्स–अमेरिकेत झालेल्या राज्यक्रांतीमध्ये वृत्तपत्रकारांचा केवढा वाटा आहे, हे इतिहास–अभ्यासकांना माहिती असेलच. विचारस्वातंत्र्य व लेखन-स्वातंत्र्यासाठीदेखील केवढ्या चळवळी उभ्या राहिल्या, लढे झाले आणि अखेरी लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला लेखन व विचारस्वातंत्र असल्यास ते वृत्तपत्रांनाही देणे आवश्यक ठरले. त्यामुळे आजकाल हरेएक समाज, पक्ष, पंथ, धर्म, विशिष्ट विचारसरणीची अनेक वृत्तपत्रं निघू लागली आहेत. त्यांतील प्रत्येकास स्वमताचेच अधिक महत्त्व वाटत असल्याने आग्रह दूराग्रहही निर्माण होऊ लागले व त्यातून वादविवाद, टीका–प्रतिटीका, हल्ले–प्रतिहल्ले सुरू झाले. इतरांच्या भानगडी बाहेर काढण्यापासून तो एखाद्यास बदनाम करून समाजा-मधून उठवण्याचेही प्रयत्न होऊ लागले.

नेमक्या याच ठिकाणी वृत्तपत्रचालकांनी व संपादकादि जबाबदार व्यक्तींनी काही पथ्ये पाळली पाहिजेत असं वाटू लागतं ! काय नि कसं बोलू नये हे ज्याला कळतं तो खरा वक्ता, काय लिहू नये हे ज्याला कळतं तोच खरा लेखक, अगदी तसंच कोणते विचार समाजासमोर ठेवू नयेत हे ज्याला समजतं, तोच खरा संपादक असं म्हटलं पाहिजे. भडक पद्धतीनं आणि उथळ विचारांनी भरलेले लेखन लोकांना आवडतं, त्याना ते मानवतं, एवढंच नव्हे तर त्यांची मनं क्षुब्ध होतात व मस्तकही बधीर होऊ शकतं. भावनेच्या आहारी सामान्य माणसं फार लवकर जाऊ शकतात. दंगेधोपे, जाळपोळ, लूटमार, निदर्शने यांसारख्या गोष्टीदेखील त्यातून निर्माण होऊ शकतात. मात्र अशा वृत्तपत्रांना प्रतिष्ठा कधीच लाभत नाही. सुज्ञ तर त्यापासून चार हात दूर राहतात. शिवाय अशा प्रकारामधून समाजहित अगर राष्ट्रहित मुळीच साधलं जात नाही. लोकशाहीच्या काळात विविध मतांच्या, विचारांच्या वृत्तपत्रांची गरज आहे हे निःसंशय ! पण विचारप्रतिपादनाने सामान्य-जनांचा बुद्धिभेद होता कामा नये. समाज विचाराआधारे सुसंघटित होऊन सन्मार्गाला लागला पाहिजे. सत्य, न्याय, शांतता आदि श्रेष्ठ जीवनमूल्यांच्या उपासनेसाठी तो सिद्ध झाला पाहिजे. त्या दृष्टीनं वृत्तपत्रांना मशालीची उपमा

दिली जाते, ती अतिशय समर्पक आहे. मशाल अंधेराचा नाश करून टाकते. तिच्या प्रकाशात निबिड अरण्यामधून प्रवासी वाटचाल करू शकतो आणि त्याच मशालीमधून निघणाऱ्या ज्वालेचा उपयोग इतरांची घरे पेटवून राखरांगोळी करण्यासाठीही करता येतो.

या साऱ्या विवेचनाचा अर्थ असा आहे की वृत्तपत्रकारांनी समाजालाही विचारवंत बनवलं पाहिजे, मार्गदर्शन केलं पाहिजे. पण ध्यानात घ्या की इतरांना विचार तोच सांगू शकतो की जो स्वत: पूर्ण विचारी आहे, विवेकी आहे. मार्गदर्शन तोच करू शकतो, ज्याला पुढचा मार्ग निश्चित माहिती आहे. केशवसुतांनी एका कवितेत म्हटल्याप्रमाणं 'दिक्कालातुन आरपार असुची दृष्टि पहाया शके –' असाच संपादकही असला पाहिजे. भूतकाळ हाताशी धरून वर्तमानाची सुस्पष्ट जाणीव करून घेऊन भविष्यकालातही त्याची दृष्टी दूरवर पोहोचली पाहिजे. तोच वृत्तपत्रकार समाज अगर राष्ट्राचं खरंखुरं हित करू शकेल. यासाठीच वृत्तपत्रकाराजवळ काही निष्ठा आणि श्रद्धा हव्यात. दरमहा मिळणाऱ्या पगारासाठी त्यानं आपली बुद्धिमत्ता विकता कामा नये अगर तात्पुरत्या प्रसिद्धीसाठी, कीर्ती वा मोठेपणासाठी विचारांची गल्लत करता कामा नये, अज्ञसमाजाची आपण दिशाभूल केल्यास ते फार मोठे पाप ठरेल. त्यासारखा कृतघ्नपणा दुसरा कोणताही असणार नाही, याची जाणीव त्याला असली पाहिजे. या दृष्टीनं बड्या भांडवलदारांचे हस्तक बनणं, विशिष्ट पक्षाचे दास होणं, काही ठराविक व्यक्तीची तळी उचलणं आणि या साऱ्या मोबदल्यात जनहिताची होळी पेटवून स्वार्थाची पोळी भाजणं म्हणजे वृत्तपत्राच्या पवित्र व्यवसायाला काळिमा फासणं आहे, हे ध्यानी घ्यायला हवं!

मराठी वृत्तपत्रकारांची परंपरा तर केवढी भव्य आणि तेजस्वी आहे. एक पाय तुरुंगात ठेवूनच आम्ही लेखणी हाती घेतो, असं सांगणारे चिपळूणकर; "विचारकलहाला एवढे का भिता?" असा जाब विचारणारे आगरकर; आपल्या लेखणी–वाणीनं केसरीप्रमाणं गर्जना करणारे लोकमान्य टिळक अशा थोरा–मोठ्यांचे आपण वारसदार आहोत. हा वारसा आपण जबाबदारीनं सांभाळला पाहिजे. नव्या युगातील लोकशाही–जीवनाचा, मूल्यांचा उद्‌घोष केला पाहिजे. एवढं सांगून मी माझं भाषण पूर्ण करतो.

१०

# चित्रपट असे असावेत !

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

रशियाचे गांधीजी म्हणून टॉलस्टायचा मोठया आदरानं उल्लेख केला जातो. 'कला म्हणजे काय' या नावाचा त्यानं एक प्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथामध्ये तो एके ठिकाणी म्हणतो की 'कोणत्याही राष्ट्राचं भवितव्य मला विचारा. मी ते अचूक सांगू शकेन! पण तत्पूर्वी त्या राष्ट्रातल्या तरुणांच्या तोंडी कोणती गाणी गुणगुणली जातात, तेवढं मला सांगा.' मित्रहो! महाकवी टॉलस्टायच्या या कसोटीवर कोणी भारताचं भवितव्य ठरवू पाहील तर केवढा अनर्थ ओढवेल? तुम्हा आम्हा तरुणांच्या तोंडी नव्हे तर प्रौढांच्या आणि वृद्धांच्या तोंडी कोणती गाणी गुणगुणली जातात याचा स्वतःशीच थोडासा विचार करा! आपणाला हे मान्य करावंच लागेल की ती बरीचशी गाणी गाजलेल्या चित्रपटांतली असतात. ती विरहाची असतात. शृंगाराची असतात, छचोर असतात. या गाण्यासंबंधी आणि त्या चित्रपटासंबंधी बरी-वाईट चर्चा तर नेहमी चाललेली असते. आज मी तुमच्यासमोर 'चित्रपट कसे असावेत,' याच विषयावर बोलणार आहे.

आजच्या युगातला कोणताही मनुष्य असो, मजूर-कामगार असो, वकील-डॉक्टर असो अगर प्रध्यापक-संशोधक असो; चित्रपट पाहात नाही असा क्वचितच आढळेल! आठवड्या-पंधरा दिवसाला, निदान दोनचार महिन्यांनी

का होईना, प्रत्येकजण एखादा तरी चित्रपट पाहतोच, कारण करमणूक ही आजकाल प्रत्येकाला हवी असते. आजच नव्हे अगदी प्राचीनकाळापासून मनुष्यप्राणी हा करमणुकीचा भोक्ता आहे. कोणी नृत्याचा, चित्रकलेचा, शिल्पाचा, गायनाचा शौकी असेल! या साऱ्या कलांचा जन्मच मुळी करमणुकीच्या जबरदस्त आवश्यकते-मधून झाला आहे. महाराष्ट्राच्या जीवनात भारूड, ललित, कीर्तनं, नाटक, मूकचित्रपट अशी स्थित्यंतरं या करमणुकीच्या प्रकारात होत होत आज जिकडं तिकडं चित्रपटांचा जमाना सुरू झाला आहे. शहरात असणाऱ्या सरकारी कचेऱ्या अथवा बँकांचे पत्ते एखादवेळी माणसाला माहीत असणार नाहीत, पण कुठल्या थिएटरला कोणता सिनेमा लागला आहे, त्यात कुणीकुणी कामं केली आहेत, कथा कोणाची, दिग्दर्शक कोण, सारं सारं बहुतेक सर्वांना माहीत असतं! महागाई झाली, महागाई झाली, म्हणून प्रत्येकजण ओरड करतो, इतर खर्चात काटकसर करतो, पण चित्रपट पाहायचं वेड काही लोकांच्या डोक्यातून जात नाही. परिस्थिती कशीही असो, सदासर्वदा चित्रपट-गृहं प्रेक्षकांनी भरलेली असतात! याहीपुढं जाऊन मला असं म्हणायचं आहे, चित्रपट कसलाही असो, ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, कौटुंबिक किंवा तुफान हाणामारीचा स्टंटपट, आठवडेच्या आठवडे तो चालतो. लोक पैसे देतात. अडीच–तीन तास करमणूक करून घेतात. लोकांच्या या वृत्तीचा फायदा घेऊन चित्रपट–निर्माते केवळ करमणुकीकडे वृत्ति ठेवून चित्रपट काढतात आणि लाखो रुपये कमावतात! या साऱ्या गोष्टीचं खरंखुरं कारण काय आहे माहीत आहे? कृपया ते कारण आधी पक्कं लक्षात ठेवा आणि मग उलटसुलट मतांचा परामर्श घ्या. त्याचं कारण हे आहे की आजच्या प्रत्येक माणसाला भरपूर करमणूकच हवी असते, मनरंजन हवं असतं! त्यासाठी तो वाटेल ते पाहायला, ऐकायला तयार झाला आहे!

लोकांच्या या वृत्तीवर आणि चित्रपट–निर्मात्यांच्या स्वार्थावर टीका करण्यासाठी खांडेकर एकदा आपली आठवण तावातावानं सांगत होते; " एका चित्रपट-निर्मात्यानं मला पत्र पाठवलं होतं. त्यात चार नृत्यं, सहा गाणी, आठ प्रेमप्रसंग असलेली कोणतीही चित्रपटकथा लिहून द्या, असा आग्रह धरला होता!" ही गोष्ट चित्रपटाच्या संदर्भात भाऊसाहेब अनेकवार सांगतात आणि चित्रपट–निर्माते निव्वळ गल्लाभरू झाले आहेत, त्यांना ध्येयवाद माहीत

नाही, उदात्त नीतिमूल्यांची चाड नाही, समाजाला जागृत करण्याची इच्छा नाही. गेले ते प्रभात, हंस कंपनीचे दिवस ! ते मा. विनायक, ते कलामहर्षि बाबूराव पेंटर इ. इ. टीका करीत राहतात. कदाचित भाऊसाहेबांचं सारं म्हणणं खरं आहे असं मानू या क्षणभर, पण त्या चित्रपट–निर्मात्याचा आग्रह त्याहून फार महत्त्वाचा आहे! त्यानं ते पत्र ‘ वि. स. खांडेकरांना ’ लिहलं होतं हेही तुम्हा-आम्हांला विसरता येणार नाही ! लघुकथा असो, रूपककथा असो, कादंबरी असो अगर नाटक असो, ज्यात भाऊसाहेबांनी उपदेशामागून उपदेशाचे डोस पाजले नाहीत, असं एक पानभरसुद्धा त्यांचं साहित्य सापडणार नाही ! चित्रपटातही भाऊसाहेबांचा तो उपदेशमारा नको–केवळ एवढ्यासाठीच त्या चित्रपट–निर्मात्यांनी भाऊसाहेबांजवळ वरील मागणीचा आग्रह धरला असावा ! आणि आपलं म्हणणं त्यानं किती कौशल्यानं सांगितलं ? त्याबद्दल त्याचं कौतुकच करावं असं निदान मला तरी वाटतं !....

याच विषयावर काल आणि आज काही विद्यार्थी बोलले. त्यात प्रत्येकजण तावातावानं हे सांगत होता की चित्रपटद्वारा राजकारणाचा प्रचार केला पाहिजे. समाजकारण लोकांना समजावून दिलं पाहिजे. श्रेष्ठ नैतिक मूल्यांवर समाजाच्या अढळ श्रद्धा बसवल्या पाहिजेत. सत्य, अहिंसा, परोपकार, मानवता इत्यादी गोष्टींचा प्रभावीपणानं मांडल्या पाहिजेत ! या सर्वांना मला असा प्रश्न विचारायचा आहे, बाबांनो, नृत्य, गायन, चित्र, साहित्य इत्यादी कलांच्या मागं या हेतू, अपेक्षाची भुतावळ कशासाठी सोडता आहात ? तुम्ही सांगता त्या गोष्टी आल्या तरच ती कला श्रेष्ठ असा जुलूम कशासाठी ? कृपा करून एक गोष्ट लक्षात घ्या. प्रत्येक कला स्वतंत्र आहे, स्वयंभू आहे. तिचा हेतू आणि मर्यादा ठरलेल्या आहेत. कलेच्या प्रांतात नसती उठाठेव करणारे तुम्ही कोण ? ‘ मनोरंजन ’ करणं हाच सर्व ललितकलांचा आद्य हेतू आहे हे तुम्हाला ठाऊक आहे काय ?

माझ्या मते चित्रपट हीदेखील एक ललितकलाच आहे; नव्हे चित्र, शिल्प, नृत्य, गायन इ. सर्व कलांचा समन्वय साधलेली ती एक श्रेष्ठ ललितकला आहे आणि म्हणूनच ‘ मनोरंजन ’ करणं एवढाच तिचा हेतू आहे ! याचा अर्थ कसलाही उत्तान, छचोर, शृंगारिक चित्रपट चांगला असं मला बिलकुल म्हणायचं नाही. माझा आग्रह आहे तो चित्रपटाच्या मूळ

स्वरूपाबद्दलचा- तो प्रथम मनरंजन करणारा असलाच पाहिजे! हे मनरंजन आधी साधून मग ध्येयवाद, नीतिमूल्यांची पूजा अगर तत्त्वज्ञान. राजकारणाचा प्रसार कोणी करणार असेल तर खुशाल करो, पण त्या चित्रपटाचं श्रेष्ठपण किंवा मूल्यमापन तो आधी मनरंजन किती करू शकतो, यावर अवलंबून आहे, हे विसरू नका! कारण कोणत्याही चित्रपटाची तीच एकच एक कसोटी आहे, असं माझं प्रामाणिक मत आहे.

माझ्या मित्रांनी आपल्या भाषणांमधून 'श्यामची आई,' 'तुफान और दिया' इत्यादी चित्रपटांची उदाहरणं दिली. ते दोन्ही चित्रपट उत्तम आहेत. त्यांच्याप्रमाणं ते मलाही आवडले, पण माझ्यातरी मनात त्यातला कसलाही उपदेश ठसू शकला नाही. माझ्या लक्षात राहिला आहे तो त्या चित्रपटामधील गुणी कलावंताचा अभिनय. त्यांनी दाखवलेल्या भावनांचा प्रभावी संघर्ष, ते रम्य वनश्रीचे देखावे, कर्णमधुर संगीत आणि ते कलात्मक दिग्दर्शन! रुपया-दीड रुपया खर्चून आपल्या मनाची उत्तम करमणूक झाली या समाधानात मी त्यावेळी थिएटरबाहेर आलो आणि आजही मला तेच समाधान वाटता आहे!

परवा पुण्याला म्हणे एक विद्यार्थी फावल्या वेळात हमालीचा धंद करताना आढळला! त्याच्या मित्रांनी त्याला विचारलं, तुला हा धंदा करायला कुणी सुचवलं? त्यावर त्या मुलानं उत्तर दिलं म्हणे- तुफान और दिया हा चित्रपट पाहून आपण होऊनच हा व्यवसाय निवडला! वृत्तपत्रांच्या चौकटीत छापून आलेली बातमी खरोखरी सत्य होती का? हा प्रश्न आपण बाजूला ठेवू, पण ती उत्तम जाहिरात होती यात शंका नाही! त्या बातमीचा उल्लेख करून कोणी तरी म्हणालं, "पाहा, चित्रपटाचा प्रेक्षकांच्या मनावर केवढा परिणाम होतो तो!"—हा परिणाम झाला असंही आपण क्षणभर आपल्या मित्रांच्या समाधानासाठी मान्य करू. पण माझा प्रश्न असा आहे, खरोखरीच हा परिणाम कशामुळे झाला? त्या साधूनं मुलासमोर तीन तास नुसतं. प्रयत्नांती परमेश्वर,' 'आराम हराम है,' 'यत्न तो देव जाणावा' अशा विषयावर जोरजोरात प्रवचन केलं असतं तर झाला असता काय? या नुसत्या उपदेशापेक्षा त्या चित्रपटात खात्रीनं अधिक चांगलं कितीतरी आहे आणि त्या चांगल्या-साठीच आपण तीन तीन तास तो चित्रपट पाहत असतो हे लक्षात घ्या!

'शेजारी' हा चित्रपट पाहून किती शेजाऱ्याशेजाऱ्यात सलोखे प्रस्थापित झाले हो? 'दहेज' चित्रपट पाहून किती वधूवरांच्या जीवनातील किंवा कुटुंबांतील हुंड्यामुळं होणारे मानापमान कमी झाले हो? 'छत्रपती शिवाजी' आणि 'वासुदेव बळवंत' हे चित्रपट पाहून किती शिवाजी आणि तानाजी निर्माण झाले? चित्रपटामधून मांडलेल्या विचार-तत्त्वज्ञानाला खरोखरच फारशी किंमत असत नाही. कोणी महत्त्व देत नाही. त्यामुळंच चित्रपटगृहामधून बाहेर पडणारा प्रेक्षक बाहेर पडतो तो त्यातल्या गीत-नृत्यांच्या धुंदीत एखादी आवडलेली ओळ ओठी घोळवीत किंवा राजकपूरचा अभिनय चांगला झाला आहे की नरगीसचा? असलेच विचार करीत!

मित्रांनो, तुम्हाला तत्त्वज्ञानाचा प्रसार व्हावा असं वाटत असेल, तर खुशाल वेद-उपनिषदांचा अभ्यास करीत बसा. राजकारणाची चर्चा करायची असेल तर मार्क्सवाद श्रेष्ठ की गांधीवाद श्रेष्ठ असल्या वादविवादासाठी परस्परांवर डोकी घासा. इतरत्र तुमचे सगळे उद्योग चाललेच आहेत की! पुन्हा चित्रपटाच्या क्षेत्रात कशाला कडमडता? चित्रपट हा चित्रपट, नाटक हे नाटक, गायन हे गायन आणि नृत्य हे नृत्यच राहू द्या की!...

यावर तुमच्यापैकी कोणी मला विचारेल, अहो, मग टॉलस्टायच्या त्या प्रश्नाला तुम्ही काय उत्तर देणार? मी म्हणेन, होय टॉलस्टायमहाशय, आमच्या राष्ट्रातल्या तरुणांच्या तोंडी नाट्य-सिनेमामधली विरहाची, शृंगाराची, आनंदाचीच विविध गीतं खेळवली जात आहेत, पण केवळ तेवढ्यावरून तुम्ही आमच्या देशाचं भवितव्य सांगू पाहाल तर ते तुमचं भविष्य साफ चुकीचं ठरणार आहे! कारण त्या गीतांवर आमच्या पंचवार्षिक योजना उभारलेल्या नाहीत. त्या गीतांवर आमचं संशोधन अवलंबून नाही. त्या गीतांच्या सुरातालावर आमचं सैन्य पावलं टाकीत नाही, त्या गीतांच्या आधारानं आमची शेती पिकत नाही, की कारखाने उभारलेले आढळणार नाहीत! हे सर्व प्रश्न सोडविण्याचे, यशस्वी करण्याचे अनेक मार्ग आमच्याजवळ आहेत! आणि एवढ्याचसाठी मी आग्रहानं म्हणतो, केवळ मनरंजन करणारेच चित्रपट आम्हाला आज हवे आहेत. कारण तीच आमची गरज आहे!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १४३९३

११

# आधी सुधारणा कोणाची ?–व्यक्ती की समाज?

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

भारतानं आपली राज्यघटना तयार केली आणि भारत हे राष्ट्र प्रजासत्ताक असल्याचं जेव्हा जाहीर केलं, त्यावेळीं सरकारनं फार मोठा समारंभ साजरा केला होता. त्या निमित्तानं निरनिराळया राष्ट्रांचे संदेश आले होते. त्यामध्ये एका परकीय मुत्सद्द्यानं पाठविलेला संदेश अतिशय मार्मिक होता. त्याने आपल्या संदेशात लिहिले होते की–'भारतानं एक आदर्श अशी घटना तयार केली व तिला सर्वांनी मान्यता दिली, याबद्दल खरोखर अंतःकरणपूर्वक धन्यवाद! पण एक गोष्ट सर्वांनीच लक्षात घ्यायला हवी, ती ही की केवळ आदर्श घटना तयार करून भागत नाही तर ती घटना राबविणारी माणसं आणि त्या राष्ट्रातील समाज हाही तितकाच श्रेष्ठ बनायला हवा. भारतीय जनता तशी बनेल किंवा बनावी अशी सदिच्छा मी व्यक्त करतो!' या संदेशाची मला या संदर्भात आठवण झाली. कारण सुधारणा कोणाची–व्यक्ती की समाज? या विषयावर मला बोलायचं आहे आणि हा संदेश आठवला तो यासाठी की मला असं वाटतं की हा संदेश लिहिताना त्या मुत्सद्द्याच्या मनात कदाचित असा विचार आला असेल, कदाचित तो मनाशी असं म्हणाला की, भारतीयांनो 'सत्यमेव जयते,' 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' यांसारखी

उत्तमोत्तम ध्येयं डोळ्यासमोर ठेवून जरी ही घटना तयार केली असली तरी आजवरचा त्यांचा स्वभाव आणि इतिहास ध्यानात घेता ते ध्येयाप्रत कितपत जाऊन पोहोचतील याबद्दल शंकाच आहे! आणि खरोखरच जर त्यानं ही शंका घेऊन हा संदेश धाडला असेल, तर आपल्या दुर्दैवानं ही त्याची शंका रास्त ठरली आहे असंच आपल्याला म्हणावं लागेल!

आपल्या भोवतालच्या परिस्थितीकडं डोळसपणानं नजर टाकली की आपल्याला काय आढळतं? राजकारण असो, समाजकारण असो, साहित्य असो, शिक्षण असो, आपल्या जीवनाच्या हरएक क्षेत्रात अनीतीचा, बेजबाबदारपणाचा भ्रष्टाकार माजला आहे. सर्वच क्षेत्रांत स्वार्थाचा अन् अनर्थाचा बुजबुजाट झाला आहे. जे तोंडानं बाह्यात्कारी सत्य-अहिंसेचा उद्घोष करतात, तीच माणसं असत्यानं नि हिंसेनं हरघडी वागताना आढळतात. जी माणसं साधनशुचितेचा आणि मनपरिवर्तनाचा जप जपतात, तीच माणसं राजरोसपणानं कुमार्गाचा आणि धाकदपटशाहीचा मार्ग अवलंबताना दिसतात. जी माणसं बाह्यात्कारी साधु-संतांच्या अणि पुढाऱ्यांच्या वेशात वावरतात, त्यांच्याच आश्रयाला खुनी दरोडेखोर आलेले आढळतात. याचाच अर्थ असा आहे, की अनेक वर्षांच्या गुलामगिरीमुळं आपल्या वाट्याला आलेलं अपार दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता, यांच्या जोडीला या भ्रष्टाचाराचा आणि अनीतीचा रोगही देशव्यापी प्रमाणामध्ये फैलावतो आहे. ही प्राप्त परिस्थिती खरोखरीच भयानक आहे. या परिस्थितीची जाणीव मी प्रथमच करून दिली. त्याचं कारण याच परिस्थितीमुळं आधी कोण सुधारणार, व्यक्ती की समाज ह्या प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालं आहे. डॉ. राधाकृष्णन एकदोन वर्षांपूर्वी एका भाषणात म्हणाले होते, की आमच्या या कठीण परिस्थितीची जाणीव जर आमच्या पुढाऱ्यांना, राज्यकर्त्यांना व संपूर्ण समाजाला झाली नाही तर एवढ्या सायासानं मिळालेल्या स्वातंत्र्याचा झालेला दुःखद अंत पाहण्याची पाळी आपल्यावर येईल.

हा अंत पाहण्याचा दुःखद प्रसंग आपल्यावर येऊ नये, एवढ्याचसाठी आता काहीतरी परिवर्तन घडणे आवश्यक व इष्ट आहे. ही आपली अधोगती आता थांबली पाहिजे. या प्रवाहाला कुठेतरी भक्कम बांध घालून त्याला नवीन मार्ग दाखवला पाहिजे. प्रत्येक व्यक्ती व समाज बदलला पाहिजे, पण ही

सुधारणा व्हायची कशी, करायची कुणी अन् कोणत्या मार्गानं हा प्रश्न आहे.

वस्तुत: हा प्रश्न वाटतो तसा नाही ! या प्रश्नाला इतकं महत्त्व का आलं ते मी तुम्हाला सांगितलं, पण हा प्रश्न अगदी जुना – मनुष्यप्राणी समाजात राहू लागल्यापासूनचा, विशेषेकरून राष्ट्र आणि देश यांच्या सीमा पाहून ती बंधनं स्वीकारून राहू लागला, तेव्हापासूनचा आहे. समाजशास्त्रदृष्ट्या व मानसशास्त्रदृष्ट्या पाहिलं असता या प्रश्नाचं रहस्य असं आहे, की व्यक्ती ही सामाजिक परिस्थितीची गुलाम असते की व्यक्तीला परिस्थितीवर मात करून स्वत:ची सुधारणा करून घेता येते ? व्यक्ती जर परिस्थितीने बनत असेल तर आपणाला समाज बदलला पाहिजे, म्हणजे व्यक्ती आपोआप बदलेल. या उलट व्यक्तीला जर प्रतिकूल परिस्थितीतही बदल घडवून आणता येईल. ते शक्य असेल तर आपणापैकी प्रत्येकानं आधी सुधारणा घडवून आणली पाहिजे, म्हणजे समाज आपोआप बदलेल. आता या दोन परस्पर-विरोधी अशा विचारातील कोणता विचार हा बरोबर, शास्त्रशुद्ध आणि व्यवहार्य आहे, हेच आपणाला पाहावयाचे आहे !

त्यापैकी दुसऱ्या विचारसरणीचा आशय असा, की समाजातील प्रत्येक व्यक्तीचे विचार बदलले व आचरण सुधारले म्हणजे समाज आपोआप सुधारेल. ही विचारसरणी मांडताना एकाने समाजाला तळ्याशी व त्यातील नागरिकांना पाण्याच्या थेंबांची उपमा देऊन असे म्हटले होते, की हा प्रत्येक थेंब जर निर्मिति-क्षम, प्रामाणिक व समाजहितदक्ष बनेल, तर समाजाच्या उद्धाराचे चक्र अफाट वेगाने फिरेल. ही विचारसरणी वरवर पाहता अगदी सुसंगत वाटते. हा सुधारेल, तो सुधारेल, ती सुधारेल– मग सारा समाज सुधारेल, हे अंकगणितदृष्ट्या ठीक आहे, पण प्रत्यक्ष जीवनात याला स्वप्नाळू व अव्यवहार्य ध्येयवादाखेरीज दुसरे नावच देता येत नाही ! महाकवी गटे एकदा असंच म्हणाला होता, की प्रत्येकानं स्वत:च अंगण स्वच्छ केल्यास सारा गाव आपोआप स्वच्छ होईल. ही कल्पना कविकल्पना म्हणून हृदयंगम खात्रीनं आहे, पण व्यवहार्य आहे का ? कारण तसं असतं तर नगरपालिका-कॉर्पोरेशन या संस्थाच अस्तित्वात आल्या नसत्या. तीच गोष्ट समाजरचनेची आणि शासनसंस्थेची आहे.

याचा अर्थ असा होतो, की गणिताच्या बेरजेनं समाज तयार होत नाही;

तर समाजात विविध वृत्तीचे, स्वभावाचे, जातीचे लोक एकत्र आलेले असतात; त्यांच्या भावभावना निरनिराळ्या असतात; इच्छा व कार्यही परस्परविरोधी असतात. म्हणूनच असं म्हणणं भाग आहे, की व्यक्ती हा समाजाचा पाया असला तरी निव्वळ व्यक्ती सुधारून चालणार नाही, तर सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत सामाजिक परिवर्तनाखेरीज व्यक्तीमध्ये मूलभूत परिवर्तन घडणार नाही.

भोवतालच्या समाजात जर चारित्र्यसंपन्नता, नीतिमत्ता, त्याग, ध्येयनिष्ठा या गुणांचे प्राबल्य असेल, तर समाजातील माणसेसुद्धा थोडीशी पापभीरू बनतात व समाजाचे प्रगतिपर घटक बनतात. उलट सभोवताली जर अन्याय, अनर्थ, स्वार्थसाधुवृत्ती यांचा सुळसुळाट झाला, तर ती सामान्य माणसेही प्रवाहाबरोबर वाहत जातात आणि परिस्थिती अधिकच गढूळ करतात. म्हणून सामान्य माणसे जर सुधारावयाची असतील, तर ती ज्या परिस्थितीचा व वातावरणाचा भाग असतील, ती परिस्थिती व ते वातावरणच निर्मळ, पवित्र व प्रगतिपर होईल, असं करणं योग्य व इष्ट आहे. असं घडेल तरच आमूलाग्र परिवर्तन घडून येईल...पण ही बाजूदेखील मघाशी मी ज्या कसोटीवर 'व्यक्ती सुधारली पाहिजे,' ही बाजू उडवून लावली, त्याच कसोटीनं उडवून लावता येईल. आधी सारा समाज सुधारेल, मग प्रत्येक व्यक्ती सुधारेल, हे म्हणणंसुद्धा कितपत बरोबर आहे? साऱ्या आकाशाची घडी करून मी माझ्या खिशात घालेन व नंतर मला हवा तसा एकेक तारा घेऊन मी त्याचा अभ्यास करेन, असं म्हणण्यासारखंच हे आहे! आधी समाजसुधारणा—हाही मार्ग वाटतो तितका व्यवहार्य नाही!

मग कोणी असं विचारील, की हाही मार्ग व्यवहार्य नाही म्हणता आणि तोही मार्ग व्यवहार्य नाही म्हणता, मग व्यवहार्य मार्ग आहे तरी कोणता? पण मला असं सांगायचं आहे, की ज्या तळमळीनं तुम्ही हा प्रश्न मला विचारीत आहा, त्या प्रश्नातच माझं बरचसं उत्तर तुम्ही दिलं आहे! आता विचार करा, व्यक्ती आणि समाज एकमेकांना पूरक आहेत की मारक आहेत? खात्रीने पूरक आहेत. उलट परस्परांशिवाय दोघांनाही खऱ्या अर्थानं अस्तित्व नाही. म्हणूनच मला असं सांगायचं आहे, की आधी कोण हा प्रश्नच भ्रममूलक आहे. जर एकाला सुधारताना दुसऱ्याकडे दुर्लक्ष करणार

असाल, तर हा विचार अदूरदर्शीपणाचा ठरेल ? सुधारणा ही जर तुम्हाला अत्यावश्यक वाटत असेल आणि त्या सुधारणेनं जर तुम्हाला काही ध्येयं गाठायची असतील, जीवनमूल्यं मिळवावयाची असतील, तर व्यक्ती, समाज, शासनकर्ते सर्वांनीच एका पोटतिडिकेनं स्वतःची सुधारणा करायला हवी. ती एकाच वेळी आणि परस्परांच्या सहाय्यानं करायला हवी. तरच ‘ सत्यमेव जयते ’ आणि ‘ बहुजनहिताय बहुजनसुखाय ’सारखी डोंगराएवढी ध्येयं साध्य होतील, अन्यथा नाही !...

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८००४६ वि: निबंध
क्रमांक १६०३ नों: दि: २५.११.६५

१२

# महाराष्ट्र : आजचा आणि उद्याचा

*माननीय परीक्षक,*
*आणि मित्राहो!--*

आपल्या थोर संस्कृतीचा, परंपरेचा इतिहास आणि कर्तृत्वाचा जेव्हा जेव्हा गौरव करण्याची संधी मिळेल, तेव्हा तेव्हा तो गौरव खुल्या दिलानं करावा. आपण केलेल्या वाटचालीचं काळजीपूर्वक सिंहावलोकन करावं, गुणदोषां-बद्दल स्पष्ट विवेचन करावं, चांगल्या गोष्टीची पूजा करावी आणि वाईट गोष्टीचा धिक्कार करावा, नव्या भविष्यकालासाठी आवश्यक त्या प्रेरणा घेऊन वाटचाल करावी, हा आपल्या विकासाचा एकमेव मार्ग आहे.

अगदी याच भूमिकेमधून, "महाराष्ट्र : आजचा आणि उद्याचा" हा विषय मी तुमच्यासमोर मांडणार आहे. कृपा करून अवधान द्या एवढी विनवणी....

दीडशे वर्षांच्या परकीयांच्या गुलामगिरीच्या जोखडामधून भारत १९४७ मध्ये मुक्त झाला आणि नव्या उत्साहानं, उमेदीनं विशिष्ट ध्येयं नजरेसमोर ठेवून भारताने आपल्या वाटचालीस प्रारंभ केला. भाषावर प्रांतरचना करू असं आश्वासन काँग्रेसनेत्यांनी वारंवार दिलं होतं. अशा प्रांतरचनेमुळं समाजाचा विकास होईल, राज्यकारभार सुधारेल हा सान्यांचा विश्वास होता. त्याप्रमाणं भारतभर भाषिक राज्यं निर्माण झाली, परंतु सुदैवाने वा दुर्दैवानं महाराष्ट्रावर दिल्लीपतींनी घोर अन्याय केला. या अन्यायाविरुद्ध महाराष्ट्रानं प्रचंड लढा

दिला आणि आपलं न्याय्य मागणं १ मे १९६० रोजी मंजूर करून घेतलं. या घटनांचा आढावा मी अशासाठी मांडतो आहे, की हा अन्यायही काहीसा सुदैवाचाच ठरला असा मी म्हणतो आहे. त्याचं कारण असं, की या लढ्यामध्ये महाराष्ट्राची खरीखुरी अस्मिता पुन: एकदा प्रकट झाली! डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे या अस्मितेचा गौरव करताना म्हणतात, "प्रस्थापित राज्यसत्तेच्या अन्यायाविरुद्ध, जुलमाविरुद्ध प्राणपणानं लढा देणं आणि त्यात विजयी होणं ही आम्हा मराठ्यांची अस्मिता आहे."

१९६० सालीं प्रकट झालेल्या या अस्मितेचं खरंखुरं स्वरूपही आपण ओळखलं पाहिजे. त्याखेरीज उद्याच्या महाराष्ट्रासंबंधीचे विचार आपणास मांडता येणार नाहीत. स्वभाषेच्या राज्यस्थापनेसाठी महाराष्ट्राला द्यावा लागलेला लढा हा त्याच्या जीवनामधला, इतिहासामधला फार महत्त्वाचा लढा होता. त्या 'सोनियाच्या' दिवसासाठी महाराष्ट्रामधील साडेतीन कोटी जनता जातधर्म, पंथपक्ष, गरिबी, श्रीमंती, सारे सारे भेद विसरून एकत्र आली होती. एकदिलानं एकजुटीनं झुंजत होती. देशभक्त, कार्यकर्ते, लेखक, वक्ते, मुत्सद्दी सारेसारेजण आपले कर्तृत्व पणाला लावून हा संग्राम पेटवू पाहत होते. या साऱ्यांच्या अपूर्व कर्तृत्वामधून नवीन महाराष्ट्रराज्य निर्माण झाले आहे.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते॥

अशी मुद्रा घेऊन महाराष्ट्र राज्य भारताच्या नकाशात दिमाखानं अवतीर्ण झाले ! पूर्वी देवगिरीच्या यादवांच्या काळीं जो मुलूख मराठी होता तो एकत्र, आला. महानुभावी महींद्र व्यासांनी सांगितलेल्या महाराष्ट्र सीमा एकछत्राखाली आल्या. नव्या पिढीसाठी कर्तृत्वाचे एक नवे दालन उघडे झाले. बुद्धिवान, कर्तबगार, विचारवंत स्त्री–पुरुषांना सद्यःस्थितीचे आव्हान देत एक नवीन पर्व महाराष्ट्रीयांच्या जीवनात सुरू झाले.

आपण हे ध्यानी घेतलंच पाहिजे, की या नव्या पर्वाच्या पाठीशी मराठी साधुसंतांची एक उज्ज्वल परंपरा उभी आहे. मुक्तेश्वर–ज्ञानेश्वरापासून विनोबाजीपर्यंतच्या थोर संतांनी समतेचा, बंधुभावाचा, सेवेचा संदेश आपल्याला वारंवार दिला आहे. छत्रपती शिवाजी, संभाजी, बाजीराव, माधवराव यांसारख्या बहादर शूरांच्या वीरगाथा आम्हाला सदैव स्फूर्ती देणार आहेत.

चिपळूणकर, टिळक, आगरकरांपासून तो आचार्य अत्र्यांच्यापर्यंतच्या ध्येयवादी पत्रकारांनी समाजजागृतीचा नंदादीप अखंड तेवत ठेवलेला आहे. महात्मा फुल्यांच्यापासून कर्मवीर भाऊराव पाटलांपर्यंतच्या समाजसेवकांचा आशीर्वाद आपल्या मस्तकी आहे. भांडारकर, राजवाडे, केतकर यांच्यासारख्या विद्वद्वर्यांची प्रतिष्ठा आपल्या हाताशी आहे. अशा किती गोष्टींचा गौरव करून सांगावा ?... हा सारा वारसा सांभाळून, जोपासून पुढे जाण्याची जिम्मेदारी आपल्यावर आहे आणि याचीच जाणीव ठेवून त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, " आमच्या महाराष्ट्रीय परंपरेत जे जे पवित्र आणि उज्ज्वल असेल, ते ते भारताच्या उत्थापनासाठी आम्ही देणार आहोत. " परमेश्वराजवळ त्यांनी मनापासून प्रार्थना केली— दैवा, आम्हांला अशी दानत दे, अशी शक्ती दे, की महाराष्ट्रराज्य जनतेचे राज्य होईल. ते राज्य लोककल्याणासाठी झटेल आणि भारताच्या नकाशावरील ताऱ्यांत एका नव्या तेजस्वी ताऱ्याची भर टाकील !

मानीय यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्याचा प्रारंभ खरोखरीच वैभवशाली आणि संस्मरणीय असा झाला. यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत सर्वांत महत्त्वाची कोणती गोष्ट केली असेल, तर विरोधकांच्या विरोधामधील कटुतेचा काटा त्यांनी हलक्या हाताने काढून टाकला. कधी गोड बोलून, कधी आश्वासने देऊन, कधी सलोख्यासाठी तडजोड करून, कधी सहकार्यासाठी आवाहन करून तर कधी प्रसंग पडताच रौद्रावतार धारण करून—महाराष्ट्राच्या विकासाच्या आड येणाऱ्या अनेक गोष्टी त्यांनी नेस्तनाबूत करून टाकल्या. लहानथोरांचा भलेपणा मिळवला. आबालवृद्धांना यशवंतरावांच्या कर्तबगारीबद्दल मोठा आत्मविश्वास निर्माण झाला.

नव्यानं उभं राहू पाहणाऱ्या महाराष्ट्रासमोर अनेक प्रश्न होते. ग्रामीण विकासाचे, औद्योगीकरणाचे, शेतीविकासाचे, कामगारांचे, शिक्षणाचे असे किती तरी प्रश्न वर्षानुवर्षे पडून राहिले होते. कोकण—रत्नागिरीच्या विकासाचा, विदर्भ महाराष्ट्राच्या एकजुटीचा, नव्या नेतृत्वाचा—अशाही अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची गुंतागुंत त्यांत झालेली होती...या सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीस चांगली चालना मिळू लागली ...पण एवढ्यात चीनचे भयानक संकट साऱ्या भारतावर आले आणि पूर्वीच दिलेल्या आश्वासनाला जागण्यासाठी - हिमालयाच्या

संरक्षणार्थ महाराष्ट्राचा हा सह्याद्री छातीचा कोट करून उभा राहिला. संरक्षण-मंत्री म्हणून यशवंतरावांची झालेली निवड, अल्पावधीतच त्यांनी दिल्लीच्या राजकीय वर्तुळात मिळवलेला विश्वास, दाखवलेली कर्तबगारी व इतरांवर पाडलेली छाप या साऱ्या गोष्टींनी महाराष्ट्राच्या मुकुटात मनाचे शिरपेच चढवले गेले आहेत!! ...

पण मित्रहो, माफ करा, वेळीच सावधगिरी घेतली पाहिजे म्हणून बोलतो – यशवंतरावांच्या पश्चात महाराष्ट्राच्या अपयशाला लगेच प्रारंभही झाला. कन्नमवारजींची एकच वर्षाची कारकीर्द!... तीसंबंधी काय बोलावं? आचार्य अत्र्यांनी परखड शब्दांत त्यांचा घेतलेला परामर्श सर्वस्वी अनाठायी होता, असं कोणता सुज्ञ म्हणेल? ना कामगारांचे संप थांबले, ना टॅक्सीवाल्यांचे समझोते झाले, ना शिक्षणाला योग्य दिशा मिळाली! जनतेच्या पैशाची एवढी अनिवार उधळपट्टी केवळ मंत्र्यांच्या दौऱ्यापायी क्वचितच कोणत्या राज्यात झाली असेल! नुसती उद्‌घाटनं, सत्कार-सभारंभ, निरर्थक भाषणांची आतषबाजी यातच सारं वर्ष निघून गेलं! यशवंतरावांनी आश्वासन दिलं होतं, की या राज्यात पहिल्यांदा गुणांची पूजा केली जाईल. ते आश्वासन तर त्यांचे अनुयायी विसरलेच, पण पानशेतप्रकरणी दिलेला न्यायनिवाडाही हवा तसा खाडाखोड करून प्रसिद्ध केला गेला. पाकिस्तानी हेराबद्दल मराठ्याने प्रसिद्ध केलेल्या वार्तेबद्दल वृत्तपत्रांवरच खटले भरले गेले. वशिले-बाजी, लाचलुचपत, दडपशाही यांनी बहुतेक सरकारी अधिकाऱ्यांचे हात बरबटून गेल्याचे आढळताहेत.

या साऱ्यांचा अपरिहार्य परिणाम व्हायचा तोच झाला. राष्ट्रद्रोही पक्षोपपक्षांनी आपली डोकी वर काढली. राजकारणाचे आखाडे बनून एकमेकांना चीत करण्याचे मनसुबे प्रत्येकजण रचू लागला. या महाराष्ट्राला मार्गदर्शन करणारे प्रभावी विचारी नेतृत्व नाही, हीच उद्याच्या महाराष्ट्रातील फार मोठी समस्या ठरणार आहे!

आज बहुजन समाज जागा होतो आहे. घटनेने त्याला महत्त्वाचे हक्क लाभलेले आहेत. फार मोठी सुप्त शक्ती त्यांच्या अंगी आहे, पण सामर्थ्याचा उपयोग तो कोणासाठी आणि कशासाठी करतो आहे, याची जाणीव झाली, की हृदय विदीर्ण होतं. दीन, दुबळ्या, गरीब आणि सरळमार्गी, सज्जन माणसाला

खेडेगावांत राहणं, जीवन कंठणं अशक्य झालं आहे. कुठे कुणाचं बिनसेल, मन दुखावेल, मर्जी मोडेल याला काही भरवसाच राहिला नाही. दिवसाढवळ्या खून आणि मारामाऱ्या करणं म्हणजे या बलदंड लोकांना काही वाटतच नाही ! गेल्या आठवड्यात आलेल्या बातम्यांची मोजदाद करा, आपल्याच जिल्ह्यात आठ दिवसांत तेरा खून पडले आहेत !...

शहरी आणि ग्रामीण जीवनात पडत चाललेली तफावत हा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे असं मला वाटतं. कारखाने, उद्योगधंदे, सुखसोयी आणि सुधारणा यांमुळं बराच समाज शहरात एकत्र येऊ पाहतो आहे, स्थायिक होऊ पाहतो आहे. जागा, आरोग्य, सुखसोयींचे प्रश्न प्रत्येक शहरात वाढत आहेत. शिक्षणासाठी वा उद्योगधंद्यासाठी खेडेगावांमधून हुशार आणि कर्तबगारवर्ग आज शहराकडे धाव घेतो आहे. तो शहरातच राहतो आहे. त्यामुळं खेडी आहेत तशीच राहून संस्कारशून्य बनत चालली आहेत. खेडेगावच्या प्रत्येक व्यक्तीला शहरातील सुखसोयींची व चैनीची ओढ निर्माण झाली आहे. मोठमोठ्या शहरांतील उद्योगधंदे, कारखाने, शाळा, महाविद्यालये यामुळे पाश्चात्त्य संस्कृतीशी आपला झपाट्याने परिचय होतो आहे आणि या पाश्चात्त्य संस्कृतीच्या झगमगाटाने आपण इतके भुलून, बावरून गेलो आहोत, की बुद्धिवादी आणि सुधारक अशा सोज्ज्वळ नावाखाली आपण आपली मतं आणि बुद्धी, आचार-विचार किंबहुना सर्वच दैनंदिन जीवन पाश्चात्त्य पद्धतीने बनवू लागलो आहोत. या संस्कृती-आक्रमणाच्या लाटा अशाच येत राहिल्या, तर खरा महाराष्ट्रीय अगर खरा भारतीय म्हणून कोणत्या प्रकारे आपण ओळखले जाऊ, हेच कळत नाहीसे होते. विज्ञान, साहित्य, कला, संशोधन साऱ्या साऱ्या बाबतीत आपण पाश्चात्त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकीत जाणार असू, तर असं नाइलाजानं म्हणावं लागेल, की इंग्रजांची राजकीय गुलामगिरी संपली, पण मानसिक, बौद्धिक गुलामगिरी अजून संपलेली नाही.

आज निर्माण होणारी नवी पिढी ही कर्तव्यशून्य, बेजबाबदार व अकार्यक्षम आहे, हेही नाकारता येणार नाही. कशाचीच जाणीव अगर तळमळ नव्या पिढीत निर्माण झालेली नाही. नुसत्या शब्दांच्या आतषबाजीनं आणि ध्येयवादाच्या बाष्कळ बडबडीनं समाज उभा राहू शकत नाही, हे वेळीच ओळखलं पाहिजे. नुसती आश्वासनं देणं म्हणजे विविध समस्या सोडवणं

नव्हे... एवढ्याचसाठी यशवंतराव चव्हाणांचीच वाक्यं मला साऱ्या महाराष्ट्रासमोर एका वेगळ्याच संदर्भात विचारावीशी वाटतात.

"एक नवी शक्ती उभी करण्याचे तुम्हा–आम्हाला इतिहासाचे आव्हान आहे ! महान परंपरा पाठीशी असणारा हा महाराष्ट्र यापुढे अडून बसणार आहे का ? " – या प्रश्नाचं उत्तर फार जागृततेनं, कर्तव्य आणि जबाबदारी ओळखून आपण दिलं पाहिजे ! नमस्ते !

## १३

# नवकथेचे स्वरूप

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो!—*

"वाङ्मय म्हणजे काय ते कृपा करून आपण सांगाल काय?" असा प्रश्न एका बड्या साहित्यिकास त्याच्या एका वाचकाने विचारला. तो प्रश्न ऐकताच तो साहित्यिक सहजगत्या म्हणाला, 'हो, हो!"—पण लगेच विचार करून तो म्हणाला–"पण ऽऽ हे सांगता आलं असतं तर किती बरं झालं असतं?" आजकाल नवकथा किंवा नवकाव्य यासंबंधी काही बोलावयाचे अगर लिहावयाचे झाले तर नेमका हाच विचार मधूनमधून डोकावत असतो की, 'हे सांगता आलं असतं, तर किती बरं झालं असतं!'

आजची नवकथा म्हणजे सामान्यतः गेल्या दीड तपात लिहिली गेलेली, त्यातसुद्धा 'सत्यकथा,' 'अभिरुचि' इ. मासिकांनी व प्रा. रा. भि. जोशी व प्रा. वा. ल. कुलकर्णी या टीकाकारांनी पुरस्कारलेली व गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले व पु. भा. भावे (हे 'आज' स्वतःला 'नवकथाकार' मानीत नाहीत), व्यंकटेश माडगूळकर इत्यादी प्रमुख लेखकांनी समृद्ध केलेली जी कथा, ती नवकथा असे आपण समजतो. या साऱ्यांच्या कथांचे स्वरूप स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न मला करावयाचा आहे, पण हे नवकथाचे आजचे स्वरूप पाहण्यापूर्वी मराठी लघुकथेच्या ज्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर

आजची कथा उभी आहे, ती सारी पार्श्वभूमी म्हणजेच तिचा इतिहास थोडक्यात का होईना, पण पाहणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच आजची कथा ही नेमक्या कोणत्या गुणांनी जुन्या कथेपेक्षा वेगळी आहे, हे कळावयास सोपे जाईल.

मराठी लघुकथेच्या या इतिहासाकडे जरी ओझरती नजर टाकली, तरी असे आढळून येते की मराठी लघुकथा ही टप्प्याटप्प्याने प्रगत अवस्थेलाच पोहोचली आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या ' भाषांतरित ' कथेमधून ती हरिभाऊ आपट्यांच्या काळात ' पाल्हाळिक गोष्ट ' बनली. वि. सी. गुर्जरांच्या कालखंडात ती ' साधी-सोपी व रसाळ ' कथा झाली, तर दिवाकरकृष्णांनी तिला भावकथेचे स्वरूप दिले. प्रा. ना. सी फडक्यांनी तंत्रमंत्राचे साज चढवून तिला कलात्मक व बांधेसूद बनविले. वि. स. खांडेकरांनी नाना विषयांमधून व विविध थरांमधून तिचा ' विस्तार ' केला व य. गो. जोशी यांनी तत्कालीन तंत्रमंत्राच्या व बोधवादाच्या बंधनातून तिला मुक्त केले. यानंतर नवकथेचा जन्म झाला...मराठी लघुकथेचा सुमारे १८५० ते १९४०-४५ पर्यंतचा स्थूलमानाने घेतलेला आढावा आहे. या आढाव्याच्या आधाराने मला असे म्हणावयाचे आहे, की आजचे तिला प्राप्त झालेले ' नवकथे'चे स्वरूप म्हणजे तिचा झालेला फार मोठा विकास आहे!

नवकथेची सुरवात आपण १९४३-४४ च्या दरम्यान मानतो. फडके-खांडेकरांच्या आसपास व सान्निध्यात साने गुरुजी, अनन्त काणेकर, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे ही मंडळी आपले कथालेखन करीत होती. या साऱ्यांच्या कथांचे अंतरंग आणि बहिरंग ही दोन्ही पाहिली म्हणजे असे वाटते, की या मंडळींनाही तथाकथित तंत्रमंत्राची विफलता पटली होती आणि हे लेखक आपआपल्यापरीने जीवनाकडे धाव घेण्याचा प्रयत्न करीत होते. वर सांगितलेल्या परंपरेचा आणि या समकालीनांचा वारसा घेऊन गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर ही नवीन पिढी उदयास आली, पण हा कालखंडच असा होता की या पिढीने केवळ जुना वारसाच पुढे चालवावा हे त्यांना स्वभावतः अशक्य होते. दुसऱ्या महायुद्धानंतर सारे जगच हादरले गेले. नव्या जीवनाचे, नव्या जाणिवांचे धक्के या कला-वंतांच्या मनाला एवढे जबरदस्त बसत होते, की त्यांचा विचार करणे हे त्या

साहित्यिकांना क्रमप्राप्त होते. साहजिक जीवनाकडे व साहित्याकडे पाहण्याचा या लोकांचा दृष्टिकोन बदलला. ही दृष्टी अधिक गंभीर झाली. ती सत्यसंशोधनाकडे वळली. वाङ्मय म्हणजे एक करमणूक किंवा फावल्या वेळात करायचा उद्योग नसून ' साहित्य ही एक साधना आहे ' ही दृष्टी आली !

याच नव्या दृष्टीमधून, नव्या जाणिवेमधून नवकथा व नवकाव्य यांचा जन्म झाला आहे. जुन्या कथेशी ताडून बघता तिचे रूप बदलले, तिचा आकार बदलला, तिचे लक्षण बदलले व प्रयोजनहि बदलले. थोडक्यात असे म्हणता येईल, की ती अधिक सकस, जिवंत, रसरशीत बनली. तिचा मनःकल्प आणि कायाकल्प झाला. तिचे स्वरूप समजावून घेताना आपणाला नेमक्या याच गोष्टीचा विचार करावयाचा आहे.

आजच्या नवकथेसंबधी विचार करीत असताना पुष्कळदा असे वाटते की एखाद्या अंधाऱ्या खोलीत उन्हाची एक तिरीप येत असावी, तिच्यात वातावरणाची एक पट्टीच्या पट्टी आणि त्या पट्टीच्या पायथ्याशी असणारा इवलासा भूप्रदेश एकदम प्रकाशमान झालेला आपल्याला दिसतो ना ? आजची कथा ही अशीच आजच्या जीवनावर पडणारी तिरीप आहे. तिच्यात जीवनाचा एक भाग-इवलासा भाग व त्याच्याभोवतीचा भाग-वातावरण एकदम प्रकाशमान करण्याची शक्ती या कथेत असते. जीवनाच्या जेवढ्या भागावरती ही कथा आपले लक्ष केंद्रित करत असते, त्या भागाचे निर्भेळ सत्य, त्यात दडलेले रहस्य व जीवनाच्या दृष्टीने त्यात सामावलेला अर्थ या सर्व गोष्टी आजची कथा व्यक्त करू पाहते. जीवनाचा तो भाग वरवर पाहता तुम्हाआम्हाला कदाचित क्षुद्रही वाटेल, पण कथेच्या प्रकाशाचा झोत त्या वस्तूवर पडू लागला, की तीच वस्तू हळूहळू आकार धारण करू लागते. तिला एक विशिष्ट अर्थ येऊ पाहतो, प्राप्त होऊ लागतो. त्यामुळे आजची कथा विविध रूपांनी व विविध मार्गांनी जीवनाचे दर्शन घेण्याचा प्रयत्न करताना आढळते.

हे तिचे विविध स्वरूप व विविध मार्ग यांचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात येते ती ही, की आजची कथा ही मनोवेधक किंवा आकर्षक कथानकासाठी खोळंबून राहिलेली नाही. वाचकांच्या आनंदात भर घालणे अगर त्यांचे दुःख कमी करणे हा तिचा हेतू नाही, तर जीवनातील कोणत्याही भागात, अनुभवात, प्रसंगात दडून राहिलेले नाट्य व्यक्त करणे, हे तिचे उद्दिष्ट आहे. हे नाट्य

व्यक्त करताना स्वतःला सुबकच आकार घेण्याची खटपट, तंत्रमंत्राची डागडुजी ती करत बसत नाही; तर ती स्वतःच एखाद्या स्वतंत्र कलेप्रमाणे स्वतःचेच असे एक धारण करून जन्म पावते, आपले उद्दिष्ट साध्य करते व विरून जाते. जमिनीमधून सहजगत्या वर येणाऱ्या गवताच्या पात्यामध्ये जी एकतऱ्हेची अनपेक्षितता, अपरिहार्यता व सहजता आढळते, तीच अनपेक्षितता, सहजता व अपरिहार्यता आजच्या कथेत आढळते.

यावर साहजिकच असा प्रश्न उद्भवला, की आजची ही कथा जर कथानकासाठी खोळंबून राहिलेली नाही तर मग ती आधारलेली असते तरी कशावर? श्री. पु. भा. भावे ( स्वतःला नवकथाकार मानीत होते तेव्हा ! ) या प्रश्नाला उत्तर देताना असे सांगतात की " कोणतीही चटकदार घटना, प्रसंग अथवा दृश्य, कोणतीही मानसिक चमत्कृती अगर वैशिष्ट्य, कोणतेही द्वंद्व, मानवी अगर नैसर्गिक, भावविश्वाचा एखादा तुकडा, मनाची, जनाची अगर सृष्टीची एखादी तळपती लकेर, धुंदकारलेल्या वातावरणाची धुंदी, निर्जिवातील उदास जडता अथवा मुंग्याप्रमाणे हृदय खाणाऱ्या एखाद्या समस्येचा दंश—अशांपैकी कोणत्या ना कोणत्या विषयावर आजची कथा आपली नजर केंद्रित करीत असते. " ती नजर कधी भेदक असेल, कधी मिस्किल असेल, कधी स्निग्ध असेल, कधी उपहासगर्भ असेल, तर कधी कधी ती काव्यात्मकही असेल. ती नजर नेमकी अशीच असते असे खात्रीने सांगता येणार नाही. पण एवढे खरे, की ती नजर जशी असेल तशीच ती कथा आपला रंग, रूप, आकार धारण करीत असते. त्यामुळे दोन गुणांचा तिच्यामध्ये समावेश होतो. एक तर ती अर्थगर्भ बनते आणि तसेच जीवन-दर्शन घडवण्याचे तिचे सामर्थ्य त्यामुळे वाढते. ही तिची विविधता हीसुद्धा तिचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

आजच्या कथाकारांचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. आजचा कथाकार हा वेगवेगळ्या भाववृत्तींमधून जीवनाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करीत असतो. अनुभवाच्या विविध पातळींवर तो एकाच वेळीं भ्रमण करीत असतो. त्याला अनामिक भावस्थितीचे दर्शन घ्यावयाचे असते आणि मानवी मनाचे पापुद्रे न्याहाळायचे असतात. त्यामुळेच लेखनात कित्येकदा चिंतन अगर मनोविश्लेषण अपरिहार्यपणे येते ! वास्तवतेचे आकर्षण हेसुद्धा आजच्या कथेचे उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. मग हे वास्तवदर्शन अंतर्मनाचे असो किंवा चर्मचक्षूंना, इंद्रिय-

संवेदनांना जाणवणारे असो. वास्तवता हेसुद्धा एक वाङ्मयीन मूल्य मानून आजचा कथाकार ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो.

गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर इत्यादी प्रमुख कथाकारांच्या कथांचे स्वरूप हे वरीलप्रमाणे आहे. काही कथा चर्चेसाठी घेऊन वरील विवेचन अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करू या! गंगाधर गाडगीळांची 'काजवा' या नावाची एक कथा आहे. या कथानायकाची आई मरते, या घटनेने त्याला जे दु:ख होते, ज्या आठवणी येतात, त्याला जे काही बरे-वाईट विचार सुचतात, त्या साऱ्यांची कलात्मक गुंफण करून गाडगीळांनी ही कथा लिहिली आहे, पण या कथेचे रहस्य हे आहे, की 'त्याची आई मेली आहे' असे अथवा त्या धर्तीचे वाक्य सबंध कथेत गाडगीळांनी कुठेही लिहिलेले नाही! आणि तरीही त्या नायकाच्या मनस्थितीचे वर्णन त्यांनी इतके प्रभावी केले आहे, की वाचकाला अखेरीस आपोआप उमगते, की 'अरे! या कथानायकाची आई मेली आहे!' पु. भा. भाव्यांची 'पत्र' नावाची एक कथा आहे. "माझेच विचार जणू तुम्ही लिहिता-- असे लिहून कळविणाऱ्या तरुणीच्या पत्राला उत्तर पाठवावे की न पाठवावे? तिची ओळख करून घ्यावी की न घ्यावी?" या वा-न-वा स्थितीचे वर्णन हेच त्या कथेचे स्वरूप आहे. त्यांच्या 'मुक्ती,' 'ध्यास' या कथा अशाच विकारविचारांची विलसिते आहेत. अरविंद गोखले यांची 'आश्चर्य' या नावाची गाजलेली कथा आहे. या कथेत केवळ भूतकाळावर कुतूहलाने भाष्य केले आहे! भाव्यांची 'सीमेपार,' गाडगीळांची 'तलावातील चांदणं,' 'बिन चेहेऱ्याची संध्याकाळ,' 'भिनलेलं विश्व,' गोखल्यांची 'मंजुळा' अशांसारख्या कथा अशाच विविध स्वरूपाच्या आहेत.

नवकथांची ही विविध आणि विशाल स्वरूपे पाहिल्यानंतर आणखी एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. ती म्हणजे नवकथेवर घेतले जाणारे आक्षेप!

आजच्या कथेवर घेतला जाणारा पहिला आक्षेप हा आहे, की नवकथा ही दुर्बोध असते. किंबहुना हे लेखक ती मुद्दाम दुर्बोध करून लिहितात, अशीहि तक्रार केली जाते. पण या तक्रारीत थोडीशी गफलत आहे. ती अशी की लेखकाला आधी काहीतरी सांगायचे असते आणि मग ते तो नटवून, सजवून आणि सोपे वा अवघड करून सांगतो; अशी समजूत या तक्रार करणाऱ्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
६७
अनुक्रम २००२८ दि: १-९-९४

मंडळींची असावी असे वाटते. आशय आणि अभिव्यक्ती ही अलग-अलग, स्वतंत्र करता येतात, अशी या लोकांची समजूत असावी; पण खऱ्या कलेत असे कधीही होत नाही, तर लेखकाला काही तरी जाणवत असते, अंतरंगात स्फुरत असते आणि ते प्रतीत व्हावे– आपल्यालाच– एवढ्याचसाठी तो त्याला शब्दरूप देण्याचा प्रयत्न करीत असतो. हा प्रयत्न करीत असता त्याला कधी शब्दांचे योग्य सहाय्य लाभते, कधी लाभत नाही; आविष्काराचा योग्य मार्ग सापडतो, कधी सापडत नाही. त्यामुळे या लिखाणात अपरिहार्यपणे दुर्बोधता अवतरते.

दुसरा आक्षेप घेतला जातो तो अश्लीलतेचा किंवा विकृतीचा. कित्येकदा हा आक्षेप योग्यही वाटतो. तथापि प्रामाणिकपणाने मानवी मनाचे संशोधन केले तर असे आढळते, की मानवी मन जितके सुष्ट आहे, तितकेच ते दुष्टही आहे. ते जितके पवित्र आहे, तितकेच ते अपवित्रहि आहे आणि आजची कथा कोणताही विषय त्याज्य मानीत नाही. सुष्ट, दुष्ट, श्लील, अश्लील, पवित्र, उदात्त – ज्या ज्यावर ती आपली नजर केंद्रित करेल, ते ते ती सत्यस्वरूपात वाचकांपुढे मांडते. यासाठी अश्लीलतेला बिचकून जाऊ नये. मात्र अश्लील तेच लिहिणार व रंगवणार असा अट्टाहास असू नये, हाही विचार खरा आहे.

या कथाकारांचे लेखनक्षेत्र फार मर्यादित व संकुचित आढळते. या आक्षेपाचा विचारही वरील सर्व विवेचनाच्या पार्श्वभूमीवरच करायला हवा. अस्सल जीवन-दर्शन हेच लेखकाचे साध्य असेल, तर त्या लेखकाच्या जीवनाच्या मर्यादा त्याच्या लिखाणाला पडणार, हे साहजिकच आहे. म्हणून गाडगीळ–गोखले–भावे ही मंडळी शहरी जीवनाचे चित्रण करताना आढळतात, तर माडगूळकर–मिरासदार–शंकर पाटील ही मंडळी खेडेगावांतील जीवनाचे चित्रण करताना आढळतात.

नवकथांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा मी हा एक अल्पसा प्रयत्न केला आहे. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही, की आजची कथा ही अद्यापि प्रयोगावस्थेत आहे. निर्दोष व सर्वांगपरिपूर्ण बनण्याचा तिचा प्रयत्न चालला आहे. हा प्रयत्न चांगला, प्रामाणिक आहे. त्यामुळेच ही कथा आज ना उद्या आपले उद्दिष्ट साध्य करू शकेल असे वाटते. आजची कथा वाचकाकडून

एकाच गोष्टीची अपेक्षा करते आहे, ती म्हणजे सहानुभूतीची ! वाचकानेही आपला दर्जा थोडा वाढवला पाहिजे, सुधारला पाहिजे. म्हणूनच बेटस आपल्या 'मॉडर्न शॉर्ट स्टोरीज' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत असे म्हणतो की–

" Modern short story is like kissing; it requires Co-operation from both sides. "

१४

# विद्यार्थी आणि राजकारण

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेल्या तीनचार विषयांपैकी आम्हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं अधिक जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा असा ‘ विद्यार्थी आणि राजकारण ’ हा विषय आज तुमच्यासमोर मांडणार आहे. निदान आजच्या विशिष्ट कालखंडात तरी आम्हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करताना अपरिहार्यपणे या विषयाचा आपल्याला विचार करावा लागतो.

तसं पाहिलं तर गेल्या तीनचार पिढ्यांमधून या एका विषयावर अनेकदा खासगी अगर जाहीररीत्या चर्चा झालेल्या आहेत, वादविवाद रंगलेले आहेत. प्रत्येक नव्या पिढीला जुने अनुभवी, ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध लोक–‘ या राजकारणाच्या जंजाळापासून चार हात दूर राहा ! ’ असा सावधानतेचा इशारा देत आहेत ! विद्यार्थ्यांनी राजकारणापासून अलिप्त राहावं, विद्यार्जन करणं हे त्यांचं आद्य कर्तव्य आहे, तेव्हा ज्ञानसंपन्न बनणं, चारित्र्यसंवर्धन करणं हीच विद्यार्थ्यांची खरीखुरी कर्तव्यं आहेत, असं वारंवार बजावलं जात असे. जात असे कशाला, आताच या विषयावर भाषण केलेल्या विद्यार्थ्यानं अकाली वृद्धपणाचा आव आणून हा बहुमोल उपदेश आपल्याला ऐकवलाच ! क्वचित काहीजण अशा तडजोडीला तयार होतात, की विद्यार्थ्यानं फार फार तर

सभोवतालच्या राजकीय, सामाजिक परिस्थितीचा तटस्थतेनं अभ्यास करावा.— चर्चा करावी, मतं ठरवावीत. मार्गदर्शन घ्यावं पण प्रत्यक्ष राजकारण कधी खेळू नये! असा आग्रह धरणाऱ्या व्यक्तींच्या मनामध्ये असणारा सद्हेतू आपण ध्यानी घेतला पाहिजे. कित्येकदा घडतं ते असं, की विद्यार्थी राजकारणात भाग घेऊं लागला, की त्याचं विद्यार्जनाकडचं लक्ष हळूहळू नाहीसं व्हायला लागतं. स्वतःच्या, घरच्या जबाबदाऱ्या तो पार पाडू शकत नाही. त्याच्या आयुष्याची दिशा बदलते. वारंवार भाषणं देणारा, सभासंमेलनं गाजवणारा, अधिवेशनं उधळून लावणारा, किंवा सदैव संपमोर्चे घडवून आणण्याच्या नादात दंग असणारा एक समाजातला उपद्रवी प्राणी म्हणजे राजकारणी माणूस हा समज आपल्याकडे आता जवळजवळ पक्का झालेला आहे!

जुन्या अनुभवी लोकांचा हा समज दृढ व्हावा त्याला तशी कारणंही आहेत. साधारणपणानं १८८५-९० पासून १९४२-४७ पर्यंत आपल्या देशात जे राजकारण घडलं; त्याचं बरंचसं स्वरूप हे लढाऊ होतं. परकीय सत्तेचं आव्हान स्वीकारून 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' – अशा बाण्यानं ही तरुण मंडळी राजकारणाच्या आखाड्यात उतरत होती. जीवनाचं, संसाराचं, कर्तृत्वाचं हवं त्याचं मोल देऊन माझा देश आधी स्वतंत्र केला पाहिजे ह्या जाणिवेनं असंख्य चळवळी उभ्या केल्या, संघटना बांधल्या गेल्या, पक्षोपपक्षही तयार केले गेले. बलाढ्य, आसुरी शक्तीशी सर्वस्व पणाला लावून झुंजणं, ती सत्ता उखडून टाकण्याचा प्रयत्न करणं, एवढंच त्या राजकारणाचं प्राथमिक स्वरूप होतं. या संघर्षात खरोखरीच अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले, अनेकांना फासावर जावं लागलं, तर कित्येकांना तुरुंगात झिजून, पिचून मरणाला कवटाळावं लागलं. राजसत्तेच्या रोषामुळं सर्व कुटुंबियांच्यावर कोसळलेल्या संकटांच्या राशींचे चटके अजूनही शहारे आणणारे आहेत. अशा परिस्थितीत नव्या तरुणपिढीच्या हिताच्या दृष्टीनं वयोवृद्धांनी, नव्या पिढीच्या कल्याणाची काळजी करीत जरा सबुरीचा, सावधगिरीचा इशारा दिला तर त्यात त्यांची काही चूक आहे असं म्हणता येणार नाही!

पण मित्रहो, आता नीट लक्षात घ्या, की पारतंत्र्याच्या काळामधल्या ह्या राजकारणाचं स्वरूप आता पूर्णपणे पालटलं आहे! जुलूम, अन्याय, जबरदस्ती ह्या साऱ्या गोष्टी आपल्या भाग्यानं आता पार दूर लोटल्या गेल्या आहेत!

राजकारणाबद्दल भीतीची भावना आपण आता साफसाफ झुगारून दिली पाहिजे ! लोकशाहीच्या नव्या युगात आपण वावरत आहोत, ही जाणीव प्रत्येक नागरिकाच्या अंतःकरणात यापुढं निर्माण झाली पाहिजे. घटनेनंच आपल्याला काही नागरी आणि राजकीय हक्क निर्माण करून दिले आहेत. आचार, विचार, धर्म, पक्ष, लेखन अशा कितीतरी बाबतींत कुणाही व्यक्तीचं दडपण न घेता निर्भयपणानं, स्वतःला जे आवडेल, रुचेल, पटेल तेच स्वीकारण्याचं स्वातंत्र्य आता तुम्हाआम्हांला लाभलेलं आहे ! हे नागरिक वा राजकीय हक्क फार काळजीपूर्वक आपण सांभाळले पाहिजेत. स्वतःच्या व समाजाच्या हिताहिताचा, प्रगतीचा, वैभवाचा विचार आजवर कधी केला नव्हता, एवढ्या जागरूकतेनं यापुढं आपण केला पाहिजे.....आणि मला असं वाटतं, यापुढं तुमच्या-माझ्यापैकी कोणाही तरुणाला राजकारण, समाजकारण टाळू या, म्हणून टाळता येणारच नाही ! लोकशाहीमधला एक जबाबदार नागरिक, एक घटक म्हणून आपल्याला जगायचं असेल तर दैनंदिन कर्तव्यांपैकी, गरजांपैकीच एक आवश्यक गोष्ट म्हणून यापुढं राजकारणाकडं आपल्याला लक्ष द्यावंच लागणार आहे !

आपला देश स्वतंत्र व्हावा आणि या खंडप्राय देशात लोकशाही समाजवाद निर्माण व्हावा, यासाठी किती थोर विभूतींनी प्रयत्न केले ते नीट ध्यानात घ्या. त्या थोरांनी आत्मार्पण करताना नजरेसमोर पाहिलेली थोर, उदात्त स्वप्नं साकार करण्याचं काम तुम्हा-आम्हा तरुणाचं पवित्र कर्तव्य आहे. तेव्हा आजचा व उद्याचा या देशामधला नागरिक, मग तो सुशिक्षित असो, गरीब असो अथवा सधन असो, प्रत्येकानं उद्याचा आदर्श देश घडविण्यासाठी तनमनधन सर्वस्व अर्पण करून आपलं ध्येय साकार केलंच पाहिजे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुमारे बारापंधरा वर्षांचं सिंहावलोकन केल्यानंतर मोठ्या खेदानं म्हणावं लागतं, की देशामधल्या सुजाण, बुद्धिमान, कर्तबगार अशा तरुणवर्गानं राज्यकारणामध्ये जेवढा भाग घ्यायला हवा होता, ज्या जबाबदाऱ्या स्वीकारायला हव्या होत्या, त्या स्वीकारल्या नाहीत आणि केवळ या बेफिकीरपणासुळं म्हणा अथवा कर्तव्याची जाणीव न झाल्यामुळं म्हणा, या देशात लहानसहान गावापासून तो अखिल भारतीय पातळीपर्यंत जे जोमाचं,

ध्येयवादी, आदर्श नेतृत्व निर्माण व्हायला हवं होतं, ते निर्माण होऊ शकलं नाही! उलट कर्तबगारी, बुद्धिमत्ता आणि मतं देणाऱ्या लोकांची गटबाजी असे पृथक पृथक विभाग आपल्यामध्ये निर्माण झाले. याचा फायदा धूर्त नि चाणाक्ष अशा उपद्व्यापी लोकांनी घेतला. सर्व क्षेत्रांत जे असंख्य निंद्य प्रकार दररोज घडताहेत, त्याचं खरं कारण हे आहे आणि आज देश नानाविध आपत्तीच्या टोकावर येऊन उभा राहिला आहे. हे स्वातंत्र्यच मुळीं टिकणार की नाहीसं होणार अशा कुशंकेचं दाट सावट साऱ्या देशभर पसरू पाहतं आहे. नेहरूनंतर कोण? चव्हाणानंतर कोण? असले नुसते प्रश्न उपस्थित झाले तरी आपण सारे अस्वस्थ होऊन जातो. नाव घ्यायलादेखील थोर नि कर्तबगार माणसं नसावीत यापरतं दुर्दैव कोणतं असेल?

देशामधल्या ज्या नागरिकाच्या आधारावर आपली लोकशाही चालायची ते नागरिक खरोखरीच अजून जबाबदार झालेले नाहीत. दर पाच वर्षांनी एकदा मतदान केलं की संपलं आपलं काम, या भावनेनंच आपली जनता आजवर वागत आली आहे. आपल्या प्रतिनिधींच्या पात्रापात्रतेबद्दल जेवढा विचार केला गेला पाहिजे, तेवढा कधीच विचार होत नाही. अशा परिस्थिती-मुळं ज्याचा प्रचार मोठा, आवाज मोठा आणि त्यातही पैशाची थैली मोठी, तोच निवडणूक जिंकतो. त्यामुळं आपल्या विधानसभा आणि लोकसभा येथील बरेच प्रतिनिधी म्हणजे कर्तृत्वशून्य, विचारशून्य प्राण्यांचे अध्वर्यु एवढंच समीकरण होऊन बसलं आहे. या परिस्थितीचाच फायदा देशाबाहेरील आणि आतील शत्रूंनी घेतला व घेत आहेत.

केवळ एवढ्यासाठीच आग्रहानं सांगतो आहे, की यापुढं राजकारणात आपल्याला भाग घेतलाच पाहिजे. देशामध्ये पक्षोपपक्ष, त्यांच्या हालचाली, देशामधले विविध प्रश्न, आपलं राष्ट्रीय व परराष्ट्रीय धोरण, साऱ्या साऱ्या गोष्टी बहुजन समाजाला समजावून दिल्या पाहिजेत ज्या ज्या मार्गांनी आपला समाज जागृत करता येइल, ते ते मार्ग आपण हाताळले पाहिजेत. प्रत्येक क्षेत्रात तरुण-वर्गानं ध्येयवादानं पुढं सरसावलं पाहिजे. या देशाचं सुख तेच माझं सुख, याची कीर्ती तीच माझी कीर्ती, याचा अपमान तोच माझा अपमान अशा आत्मीयतेच्या भावनेनं नवी पिढी तयार झाल्याखेरीज या देशाला उज्ज्वल भवितव्य निर्माण होणार नाही!

मित्रहो! असं म्हणतात ना, पाण्यात पडल्याखेरीज पोहता येत नाही! रियाझ केल्याशिवाय गाता येत नाही! व्यायाम करून घाम गाळल्याशिवाय शरीर सुधारत नाही. अगदी त्याप्रमाणंच राजकारण खेळल्याशिवाय नेतृत्व करता येणार नाही, जबाबदाऱ्यांची जाणीव होणार नाही. आमच्या जीवनाची, भवितव्याची काळजी वाहणाऱ्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्धांना कळकळीनं तेवढ्याच आदर्शानंही सांगावंसं वाटतं, की राजकारण याचा अर्थ संप, चळवळी, हरताळ, घातपात, फासावर जाणं हा आता संपला आहे! आज दैनंदिन परिस्थितीच पालटली आहे. श्वासोच्छ्वासाची जितकी आवश्यकता आपल्याला भासते, तितकीच आवश्यकता हरघडी राजकारणाच्या विविध विषयांतील माहितीची राहणार आहे. एवढ्याचसाठी अशी विनवणी करावीशी वाटते– आम्हा तरुण पिढीला राजकारणाच्या मैदानात उतरू द्या. उघड उघड वावरू द्या. खेळू द्या. झुंजू द्या. मायेच्या पिंजऱ्यातच कोंडून आम्हाला दुर्बल करू नका! कुठं लागेल, खुपेल, कुठं चुका होतील, कधी भांबावून जाऊ, तिथं आपल्या अनुभवाचा, मार्गदर्शनाचा, दिलाशाचा हात द्या. त्यातूनही समजा हे नाहीच घडलं, तर झुंजून झुंजून मरू द्या! कर्तृत्व गाजवून नामशेष होऊ द्या. दीन-दुबळेपणाचा कंटाळा आला आता!

वाटर्लूची लढाई तिथल्या शाळेच्या क्रीडांगणावरच खेळली गेली, असं एक इंग्रजी वचन आहे. ते अगदी खरं आहे. आयसेन हॉवर, केनडी, गॅलब्रेथ, क्रुश्चेव्ह ही जी मोठी माणसं आज आपण पाहतो आहोत, त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाची जडणघडण शालेय व महाविद्यालयीन शिक्षणामधून व प्रमुख्यानं तरुणपणीच्या धडाडीमधून झालेली आहे, हे नीट ध्यानी घ्या. तुम्हाला माहिती आहे ?– रशियामध्ये कॉन्सोमोल नावाची तरुणांची एक संघटना आहे. या संघटनेत १,८०,००,००० एवढे सभासद आहेत. हे सारे सभासद चौदा ते सव्वीस या वयाचे आहेत. ते गटागटानं एकत्र जमतात. मार्क्स, लेनिन, स्टॅलिनच्या विचार–तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात! हरएक क्षेत्रात समाजाच्या खालच्या थरापर्यंत आपले विचार पोहोचवण्याचा प्रयत्न करतात! इंग्लंड–अमेरिकेतही अशा युवकसंघटना आहेत. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत राजकीय परिस्थितीवर होणाऱ्या चर्चा ऐकण्यासाठी तेथील

वृत्तपत्रांचे संपादक, पक्षोपपक्षांचे कार्यकर्ते, फार कशाला कधी कधी मंत्री आणि देशाचे पंतप्रधानही हजर राहतात! तेथील नेते असे तयार होतात! शेवटी मला हेच म्हणायचं आहे, आम्हाला अशी संधी द्या. आम्ही टिळक-आगरकरांचे, फुले - आंबेडकरांचे वारसदार आहोत. देश चोहोबाजूंनी वैभवाच्या शिखरावर नेऊ!--

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ५७०६
क्रमांक २६०३ वि: निबंध
नों दि: २८।१।५६

१५

# आजचे शालेय व शाळेबाहेरील शिक्षण आणि संस्कार आदर्श नागरिक निर्माण करणारे आहेत ! ( प्रस्तावाच्या बाजूने )

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

आजची विद्यार्थ्यांची पिढी आणि तिचं भवितव्य यासंबंधी जेव्हा जेव्हा चर्चा चालते, लेख लिहिले जातात, वादविवाद घेतले जातात, तेव्हा तेव्हा – जो तो आपला ‘ परोपदेशेपांडित्य ’ या न्यायानं चार उपदेशाच्या गोष्टी आम्हा विद्यार्थ्यांना सुनवतो. आमच्या भवितव्याची काळजी करतो ! दिव्य भूतकालाची आठवण करून देऊन वर्तमानाची विदारक जाणीव करून देऊ पाहत असतो. कर्तव्य, जबाबदाऱ्या, परंपरा, निष्ठा, श्रद्धा अशा भयंकर शब्दांचा मारा करून एकतर तो आम्हाला गांगरुन टाकण्याचा प्रयत्न करतो किंवा ‘ झालं, संपलं सारं, काय या पिढीच्या हातून होणार ? ’ – असे उंट मेलेल्या सारवानासारखं हताश होऊन निराशेचेच उद्गार काढतो ? मला हे कळत नाही, आम्हा विद्यार्थ्यांचं हे सुदैव आहे का दुर्दैव आहे. आम्हाला सल्लागारांचा तुटवडा कधी पडतच नाही ! वृत्तपत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, पुढारी, शिक्षक, पालक सारेजण सदान्‌कदा भरपूर उपदेश करतात ! आणि त्यात

भरीस भर म्हणूनच की काय आम्हा विद्यार्थ्यांमधले काही अर्धवटही – पोक्तपणाचा आव आणून या साऱ्या उपदेशकांच्या कोल्हेकुईत आपला आवाज मिसळू पाहतात. या प्रस्तावाच्या विरुद्ध बाजूनं बोलणारे हे विरोधक मित्र आपली केवळ फटफजिती करून घेण्यासाठीच इथं आले आहेत की काय कोण जाणे ! —

आजचे शालेय व शाळेबाहेरील शिक्षण आणि संस्कार आदर्श नागरिक निर्माण करणारे आहेत- या विषयावर विरुद्ध बाजूनं बोलण्याचं धाडस त्यांनी केलं आहे, त्या सर्वांनी आपलं अज्ञानच तुमच्यापुढं प्रकट केलं आहे. आपल्या विचारांचा अपरिपक्वपणाच तुमच्यासमोर मांडला आहे, असं प्रामाणिकपणानं मला वाटतं !

कोणीही आज हे मान्य करेल, की आज शाळेत दिलं जाणारं शिक्षण हे खऱ्या अर्थानं शिक्षणच नाही. त्यातून सुसंस्कार होत नाहीत. जीवनदृष्टी त्यांतून प्राप्त होत नाही. शाळेबाहेरील विचार व आचारप्रवाह, व्यक्ती, पथ, पंथ या साऱ्यांमधून दिवसेंदिवस दुष्परिणामच जिकडे तिकडे होत चालले आहेत. या साऱ्या गोष्टींची कारणमीमांसा आमच्या विरोधक मित्रांनी खूप शहाणपणाचा आव आणून केलेली आहेच. ती कदाचित खरीही असेल, पण बराच वेळ विचार करूनही माझ्यासमोर असा प्रश्न उभा राहतो आहे, की या साऱ्या चर्चेचा आणि आदर्श नागरिक निर्माण होण्याचा संबंध येतोच कुठे ?

एक गोष्ट प्रारंभीच कृपा करून ध्यानी घ्या, की विशिष्ट पद्धतीच्या शिक्षणक्रमानं आणि नीतिमूल्यांच्या सतत वचनानं एखाद्या व्यक्तीचं जीवन घडविता येतं, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला हवा तसा आकार देता येतो, हाच मुळी एक भ्रम आहे ! कुणीही कुणाला घडवू शकत नाही आणि तयार करू शकत नाही. विद्यार्थी म्हणजे काय मातीचा – चिखलाचा गोळा समजता की काय ? त्याला तुमच्या इच्छेप्रमाणं बनवायला ! जगात जन्माला येणारी प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक पिढी, प्रत्येक समाज हा इतर प्रत्येक घटकापासून वेगळा असतो, स्वतंत्र असतो. शिंपल्यात मोती तयार होतो ना ? तो जसा स्वातीच्या पाण्याच्या थेंबाहून, शिंपल्याहून रूपानं, आकारानं भिन्न असतो ना- अगदी तशीच परिस्थिती इथंही असते. प्रत्येकाच्या आवडीनिवडी, ध्येय, कार्य, जीवनाचं साफल्य हे हरएकापेक्षा स्वतंत्र असतं, भिन्न असतं. त्याला कोणी एकच एक

रंगरूप–आकार देऊ पाहील, तर तो शुद्ध वेडेपणाच ठरेल! तेव्हा जुन्या पिढीतील विद्यार्थी, नव्या पिढीतील विद्यार्थी, इंग्लंड-अमेरिकेतील विद्यार्थी आणि महाराष्ट्रातले विद्यार्थी अशी तुलना करणं हे सर्वस्वी अयोग्य आहे! नव्हे चुकीचं आहे!

देशोदेशींच्या विद्यार्थ्यांचे दाखले आमच्या विरोधक मित्रांनी इथं सांगितले, पण त्यांना नम्रपणानं असं सांगावसं वाटतं, प्रत्येक देशाच्या उत्थानपतनाचा बारकाईनं अभ्यास कराल आणि त्यावर विचार कराल, तर एक गोष्ट ध्यानी येईल ती ही, की सुखामागोमाग दुःखाचे, ऐश्वर्यामागोमाग दारिद्र्याचे, कर्तृत्वामागोमाग कर्तृत्वशून्यतेचे कालखंड चक्रनेमिक्रमे एकेका राष्ट्रात अवतीर्ण होतच असतात. त्या त्या कालाचे प्रतिनिधित्व करणारे लोक जन्माला येतात. आपल्या वाट्याचं बरं अथवा वाईट काम करून भूतकालात गडप होतात. कोणत्या काळातील व्यक्ती खऱ्या अर्थानं कुणाच्या आदर्शाची, शिकवणुकीची, संस्कारांची अपेक्षा करीत नसतात. मग जगाच्या इतिहासात आपली पदचिन्हं अक्षय्य उमटवून जाणारे अलेक्झांडर, नेपोलियनसारखे ते योद्धे असोत, अब्राहम लिंकन, महात्मा गांधी यांच्यासारखे दलितांचे कैवारी असोत किंवा जोसेफ मॅझिनी, सावरकरांच्यासारखे ते क्रांतिकारक असोत. ही सारी थोर माणसं असामान्य कर्तृत्वाचीच असतात. निसर्गदत्त गुणांनीच मोठी असतात. हा माझा पराक्रम नव्हे, हे माझ्या कर्तृत्वाचे फल नव्हे, असे कोणी त्यांत म्हणणारे असतीलही, पण तो त्यांचा विनय असतो, हे आपण ओळखलं पाहिजे. गडकऱ्यांनी सांगितल्याप्रमाणं त्या थोरामोठ्यांची जीवनं ही आकाशातल्या तेजस्वी ग्रहगोलांच्या शर्यती असतात. त्यांच्याशी आपण बरोबरी अथवा तुलना करायचीच नसते! आपल्याही देशात जुन्या पिढीत, जुन्या काळात होऊन गेलेल्या महापुरुषांची नामावली वाचून–आज कुठं आहेत असे थोर पुरुष? आजचे विद्यार्थी यांच्याप्रमाणं मोठे होतील का?–असा प्रश्न विचारणाऱ्यांनी व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या जीवनामधलं हे कठोर सत्य कृपया सदैव ध्यानात ठेवावे!

एवढी मोठी ग्रीक, रोमन लोकांची संस्कृती, केवढा थोर व पुढारलेला समाज, पृथ्वीलाही हादरा बसावा असा भीमपराक्रम करणारे एकाहून एक थोर योद्धे, किती तत्त्वज्ञानी, कलावंत, समाजसुधारक त्या राष्ट्रात निर्माण

झालेले–पण त्यांचीसुद्धा या कालप्रवाहात पार वाताहत झाली. शेजारच्या– डोंगराळ भागामधल्या चोरलुटारूंच्या टोळ्यांनी सारं राष्ट्र नामशेष करून टाकलं ! आज तिथं उरले आहेत केवळ भग्न अवशेष आणि इतिहास पुराणांतरीच्या कथा ! भगवान श्रीकृष्ण ज्यांच्यात जन्माला आले, त्या यादव-कुळाची कथा काय सांगते ? राजकुळामधल्या बायकापोरांना लुबाडून, लुटून नेलं, आपआपसात युद्ध करून अखेर सारेजण मातीतच गडप झाले ना ? तेव्हा विशिष्ट शिक्षणसंस्कारांनी युक्त असा नागरिकांचा आपण समाज तयार करू शकू व तो राष्ट्रोद्धारासाठीं टिकवून ठेवू, हा एक वेडा विचार आहे.

एकेका विशिष्ट कालखंडात विशिष्ट तऱ्हेचंच साहित्य, कला, तत्त्वज्ञान, जीवननिष्ठा—या साऱ्या गोष्टी का आणि कशा अवतीर्ण होतात, वाढतात याचं खरं उत्तर महाभारतकारही देऊ शकले नाहीत. बर्ट्रांड रसेल सांगू शकत नाहीत आणि विनोबाही सांगतील असं मला वाटत नाही. त्या त्या काळाची ती एक अपरिहार्य गरज असते, एवढ्यावरच आपल्याला समाधान मानावं लागतं. तेव्हा आजच्या प्रस्तावाच्या विरुद्ध बोलणाऱ्या नि व्यर्थ काळजी करणाऱ्या चिंतातुर जंतूंना मी एवढंच सांगू इच्छितो, आज आपल्याला मिळणारं शिक्षण, आपल्यावर होणारे संस्कार हे आजच्या काळाच्या दृष्टीनं आवश्यकच आहेत. आजच्या आदर्श नागरिकांच्या दृष्टीनं योग्य असेच आहेत. हे शिक्षण व संस्कार तुम्हा – आम्हा सर्वांनाच स्वीकारावे लागणार आहेत. नको म्हणणाऱ्यांनाही ते घ्यावेच लागणार आहेत. शरणागती पत्करून मान्य करावे लागणार आहेत. तेव्हा खुल्या दिलानं, प्रसन्न मनानं ते स्वीकारा. आनंदानं आज वाट्याला येणारं जीवन जगा. व्यर्थ उद्याची चिंता कशाला करता आणि भूतकालातील गाडलेली भुतं स्वतःच्या छातीवर तरी कशाला बसवून घेता !!

२६

# आजचे शालेय व शाळेबाहेरील शिक्षण आणि संस्कार आदर्श नागरिक निर्माण करणारे आहेत ! (प्रस्तावाच्या विरुद्ध बाजूने)

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

" आजचे शालेय व शाळेबाहेरील शिक्षण आणि संस्कार आदर्श नागरिक निर्माण करणारे आहेत !"–हा प्रस्ताव जेव्हा प्रथम मी वाचला, तेव्हा आश्चर्यचकितच झालो. या प्रस्तावनाच्या बाजूनं बोलण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्पर्धकांची ती केविलवाणी तयारी आणि आपल्या विचारांचं समर्थन करण्यासाठी त्यांच्याच बुद्धीची चाललेली ती तऱ्हेवाईक कसरत, या साऱ्या गोष्टी पाहिल्यावर लॅबेनॉनचा सुप्रसिद्ध कवी खलील जिब्रान याच्या एका कवितेची मला आठवण झाली. कवितेचं शीर्षक आहे-- 'त्या राष्ट्राची कींव करा !'

जिथे गुंडांना नरवीरांचा सन्मान मिळतो आणि विद्वान व मुत्सद्दी कस्पटासमान लेखले जातात !
जिथले राजकारणी कावेबाज कोल्हे बनले आहेत, तत्त्वज्ञानी नजरबंदीचे खेळ खेळताहेत आणि कलावंत जनतेच्या क्षुद्र भावना उद्दिपित करण्यात धन्यता मानीत आहेत !

अशा राष्ट्राचा वर्तमानकाळ दुःखानेच भरलेला असतो आणि
त्याचा भविष्यकाळ नानाविध आपत्ती आणि संकटे घेऊन
येत असतो अशा त्या राष्ट्राची कींव करा-!....

मित्रहो! या कवितेमधल्या 'राष्ट्र' या शब्दाऐवजी आमच्या या 'विरोधक मित्रांची' एवढेच शब्द घालून असे म्हणू इच्छितो की, या आमच्या साऱ्या विरोधक मित्रांची खरोखरीच कींव करा! कारण शिक्षण, संस्कार, आदर्श नागरिक या साऱ्या गोष्टींसंबंधी या सर्वांनाच विलक्षण भ्रम झाला आहे. अंधेराइतकं काळंकुट्ट असणारं असत्य हे सूर्यप्रकाशाइतकं लखलखीत आहे, असं प्रतिपादण्यासाठीच आपली बुद्धी, वक्तृत्व, तत्त्वज्ञान, अभ्यास यांचा उपयोग करीत आहेत. नानाविध दुःखांनी आपत्तींनी, हालआपेष्टांनी वर्तमानकाळी आपण गांजून गेलो असता व भावी पिढ्यांना याच यमयातना भोगीत जावे लागणार, अशी दाहक परिस्थिती असता हे आमचे विरोधक मित्र नजरबंदीचा खेळ करून तुम्हा सर्वांना फसवू पाहत आहेत! रोम धडाडून पेटत असता आनंदानं फिडल वाजवीत बसणाऱ्या नीरोचेच हे सगेसोयरे आहेत की काय, असंच मला राहून राहून वाटू लागलं आहे!

वादविवादासाठी ठेवण्यात आलेल्या प्रस्तावामधील तीन प्रमुख शब्दांकडं मी आपलं लक्ष वेधू इच्छितो. एक शिक्षण, दुसरा संस्कार आणि आदर्श नागरिक! या तिन्ही शब्दांचा खराखुरा अर्थ आपण प्रथम ध्यानात घेऊ. शिक्षण म्हणजे नेमकं काय! या प्रश्नाचं निश्चित असं एकच उत्तर देणं जरी कठीण असलं, तरी व्हाइट हेड्पासून डॉ. राधाकृष्णन यांच्यापर्यंत सारेजण हे मान्य करतात की, "शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास! तोही अशा पद्धतीनं व्हावा की, त्यामधूनच त्याला जीवनदृष्टी प्राप्त व्हावी!" प्रश्न असा आहे, ही मूलगामी दृष्टी ठेवून खरोखरीच आज आपल्याला काही शिक्षण दिलं जातं का? प्रामाणिकपणे उत्तर द्यायचं झालं तर कुणाही शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि शिक्षणाधिकाऱ्यांनाही 'नाही' असेच उद्गार काढावे लागतील! स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी आपल्या शिक्षणाचं जे ध्येय, स्वरूप आणि कार्यपद्धती होती, त्यात काडीमात्र बदल झालेला आढळत नाही! आणि जो बदल म्हणून केला गेला, त्यात प्रयोगावारी पिढीच्या पिढी गारद करण्याची किमया आमच्या शिक्षणतज्ज्ञांनी व शिक्षणमंत्र्यांनी

करून दाखविली ! आजची शाळा–कॉलेजं म्हणजे सोयीस्कररीत्या चालणारा एक फायदेशीर धंदा होऊ पाहत आहे. अकार्यक्षम, ध्येयशून्य आणि बेजबाबदार लोकांच्या चरितार्थाची पद्धतशीर सोय हे या क्षेत्रांचं स्वरूप बनू लागलं आहे.

संस्कार याचा अर्थ श्रेष्ठ जीवनमूल्यांवर श्रद्धा बसवणं आणि त्यांना आदर्श मानून त्या मूल्यांचं आचरण करीत जीवन जगण्याची मनाची तयारी ठेवणं. पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे, की सत्य, अहिंसा, परोपकार, बंधुता, दया या जीवनमूल्यांनाच हादरे बसू लागले आहेत. उद्या न जाणो कदाचित असत्य, हिंसा, कपटीपणा, अन्याय यांचेच सर्वत्र साम्राज्य पसरेल की काय असा आजचा आपला समाज वागू लागला आहे. यंत्रयुगाने भोवतालच्या राजकीय, सामाजिक परिस्थितीत भयानक स्थित्यंतरे होऊन हरएक व्यक्ती इतकी अगतिक बनत चालली आहे, की कोणी कोणावर सुसंस्कार करू पाहील, तर तो वेडाच ठरावा. त्या जीवनमूल्यांमागे जाणं हे मृगजळामागं धावणाऱ्या तृषार्त हरिणाप्रमाणे ठरावं. आजकाल घरी आई–वडील मुलाला वळण लावू शकत नाहीत. शाळेत शिक्षक मुलाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करू शकत नाहीत. उपलब्ध असणारं साहित्य इतकं गलिच्छ आणि विकृत असत, की क्षणार्धात चांगल्या संस्कारांनी धुळीस मिळावं. आजच्या देशभक्ताची, पुढाऱ्यांची, नेत्यांची नुसती चरीत्रं आणि चारित्र्यं पाहिली तर शरमेनं मान खाली घालावी लागते. अशा या सभोवतालच्या परिस्थितीमधून आदर्श नागरिक निर्माण होईल, ही आशा बाळगणं म्हणजे शुद्ध मूर्खपणाच नव्हे काय ?

आदर्श नागरिकाची व्याख्या सुभाषितकार सांगतात—कुलाच्या उद्धारासाठी जो आत्मत्यागाला तयार होतो, गावाच्या उद्धारासाठी जो कुलाच्या त्यागाला तयार होतो, देशाच्या उद्धारासाठी जो गावाच्या त्यागाला तयार होतो, तोच खरा नागरिक होय ! आज वेगळंच सुभाषित लिहावं लागेल. आपण तर पाहतो केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी कूळ, गाव. फार कशाला देशाचासुद्धा बळी द्यायला तयार झालेले महाभाग या देशात निर्माण झाले आहेत.

मित्रहो ! सारांश काय ? शाळेत नि शाळेबाहेर मिळणाऱ्या शिक्षणसंस्कारां-मुळेच दिवसेंदिवस आपल्या देशातील तरुणपिढी अधोगतीला लागली आहे. कुठे उत्साह नाही, साहस नाही, प्राणपणानं झुंजण्याची ताकद नाही. श्रद्धा, निष्ठा, प्रामाणिकपणा, सेवा या साऱ्या चांगल्या गोष्टी नव्या पिढीतल्या जीवना-

मधून नष्ट होत चालल्या आहेत. वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय ध्येयवादाची ओळखही आता राहिलेली दिसत नाही. सिनेमा, नाटकं, क्रिकेटच्या मॅचेस्, उत्तम उत्तम कपडे आणि केवळ चैन...बस्स! या पलीकडे कशाचंही आकर्षण आपल्या तरुणपिढीला राहिलेलं नाही. बर्नाड शॉ एकदा म्हणाला होता, कोणत्याही तरुणपिढीचं भवितव्य मला विचारा, मी ते अचूक सांगेन. पण त्यापूर्वी फक्त त्या तरुणाच्या तोंडी कोणती गाणी घोळविली जातात, याची कल्पना द्या– मित्रहो! थोडा विचार करा. तुमचा–आमचा भविष्यकाल कसा असेल! किती भीषण दुःखदायक असेल!

असं म्हणतात, एखादंवेळीं मनुष्य खरोखरीच झोपलेला असेल तर त्याला जाग आणता येईल, पण झोपेचं सोंग करणाऱ्याला जागं कसं करायचं? माझ्या विरोधकमित्रांना हेच विचारायचं आहे. शाळेतील आणि शाळेबाहेरील शिक्षण-संस्कारांनी अक्षरशः तुम्ही–आम्ही नाडले जात आहोत. अशावेळी प्रांजळ-पणानं आपलं दुःख तरी समाजापुढं मांडा. स्वतःची आणि इतरांची फसवणूक कशासाठी करताहात?

१७

# राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक आहे ! (बाजूने)

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो !—*

माझ्या भाषणाच्या प्रारंभीच मी या स्पर्धेच्या विषयनियामक समितीला अगदी मनःपूर्वक धन्यवाद देणार आहे. त्यांचे आभार मानणार आहे. हे धन्यवाद आणि आभार केवळ एवढ्याचसाठी आहेत, की या मंडळींनी कळत असो अगर नकळत असो; हेतुपुरस्सर असो अथवा अहेतुकपणे असो; या वादविवादाच्या विषयाचा निर्णय आपण होऊनच सांगून टाकला आहे ! " राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक आहे "— हे अगदी साधं, सरळ विधान त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांसमोर ठेवलं आहे. या विधानात वादविवादाला, चर्चेला, भांडणाला वावच नाही; पण तरीही आमचे हे विरोधक मित्र मोठ्या अहमहमिकेनं इथं वादविवाद करताहेत, मोठमोठ्या ग्रंथांचा, ग्रंथकारांचा, विचारवंतांचा नामोल्लेख करीत आहेत. मुठी आपटून, गर्जना करून आपली बाजू तेवढीच सत्य आहे, असं काहीसं पटवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या या वावदूकपणाची अगर भांडखोरपणाची परीक्षा म्हणून उद्या तुम्ही या सर्वांसमोर मृगजळाने राष्ट्रोत्कर्षास मदत होईल काय ? किंवा वाळूच्या तेलापासून लोककल्याण होईल, असे विषय जरी दिलेत तरी सात

मिनिटंच काय, सात दिवसही ही मंडळी तावातावाने वादविवाद करीत राहतील! खरं सांगायचं तर "दिव्यत्वाची येथ प्रचीती" असं म्हणून या सर्वांना कोपरापासून फक्त हात जोडणं आणि वादविवाद बंद करणं एवढंच इष्ट नि आवश्यक आहे!...

पण मित्रहो! कोळशाच्या प्रचंड खाणीत एखादा हिरा सापडावा, शेकडो मृगांमध्ये एखादाच कस्तुरीमृग गवसावा, चंद्रिकांनी खाऊन गेलेल्या तारांगणात एखादाच शुभ्र प्रकाशाचा अगदी तद्वत, अती दुर्मिळ, क्वचितच कोणी चर्चेसाठी घेतला जाणारा पण जीवनामधलं एक कठोर सत्य प्रकट करून सांगण्याची संधी देणारा हा विषय हाती लाभला – शिवाय तुम्हासारखे दर्दी परीक्षक आणि चोखंदळ श्रोते लाभले—केवळ एवढ्यासाठी हा सारा विषय मी एका वेगळ्याच पातळीवरून मांडण्याचं ठरवलं आहे! –

एक गोष्ट प्रारंभीच ध्यानी ठेवा, की सत्य हे अतिशय कठोर असतं, दाहक असतं, कटु आणि म्हणूनच अप्रियही असतं. तरीही खराखुरा विचारवंत त्यालाच महत्त्व देतो, त्यांच्या दर्शनानं आनंदित होतो, समाधान पावतो. मला वाटतं, "राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचं अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक आहे!" हे विधान असलंच एक कठोर नि कटु सत्य आहे!

प्रामाणिकपणानं जगाच्या खऱ्या इतिहासाचा अभ्यास करायचा असेल, तर हे सर्वांना मान्य करावंच लागेल, की प्रत्येक राष्ट्राचा इतिहास हा केवळ रक्तानं रंगलेला आहे. हजारो निरपराधी लोकांच्या कत्तलींनी भरलेला आहे. लक्षावधी अबलांच्या बेअब्रूनं बरबटलेला आहे. जिथे धर्मवेडाचा सैतान आपल्या हातात रक्तानं माखलेली तलवार घेऊन उन्मत्तपणानं हिंडला नाही, असा या पृथ्वीतलावर देश नाही. आपल्या स्वतःच्या ईर्षेखातर आणि लहरीखातर रक्ताच्या नद्या वाहवल्या नाहीत, असा सम्राट या पृथ्वीतलावर अद्यापि जन्माला आलेला नाही. जिथल्या देशभक्तांना स्वातंत्र्यासाठी फासावर चढावं लागलं नाही, आत्मयज्ञ करावे लागलेले नाहीत, असं स्वातंत्र्य या जगात आजवर कुठंही लाभलेलं नाही! अखिल मानवजातीच्या उद्धारासाठी तळमळणाऱ्या संताला स्वतःच्याच खांद्यावर आपल्यालाच फाशी दिला जाणारा क्रूस ओढून न्यावा लागला. जीवनामधली चिरंतन सत्यं उघडपणानं मांडू पाहणाऱ्या तत्त्वज्ञाला विषाचा प्याला घ्यावा लागला. बहुजनाच्या कल्याणा-

साठी तळमळणाऱ्या ज्ञानयोग्याला जन्मभर निंदा, अपमान, उपेक्षा सहन कराव्या लागल्या. सतीसाध्वींना अग्निशुद्धी करावी लागली. किती गोष्टी, किती प्रसंग या क्षणी माझ्या नजरेसमोर तरळत आहेत. मित्रहो, या खऱ्याखुऱ्या इतिहासाचं नुसतं सिंहावलोकन केलं, की भयानं अंगावर काटा उभा राहतो. शरमेनं मान खाली घालावी लागते. माणसाच्या बुद्धिमत्तेबद्दलचा आणि कर्तृत्वाबद्दलचा सारा अहंकार क्षणार्धात विरघळून जातो !...

विरुद्ध बाजूनं बोलणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी भारताच्या इतिहासाचा वारंवार गौरव केला. शिवाजी, राणाप्रताप, माधवराव पेशवे, झाशीची राणी अशा प्रख्यात इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचा आवर्जून उल्लेख केला. मला तरी प्रामाणिकपणं भारताचा इतिहास फक्त तीन वाक्यांत सांगावासा वाटतो — एकदा आपल्याला मुसलमानांनी लुटले, एकदा इंग्रजांनी लुबाडलं आणि आज आपणच आपल्याला फसवीत आहोत ! बस्स ! संपला भारताचा इतिहास ! हे काय कर्तृत्व आहे ? हा काय पराक्रम आहे ? हा काय स्वाभिमानाचा विषय आहे ?....

गझनीच्या महंमदानं १००१ साली भारतात पहिलं पाऊल टाकलं आणि पुढं वीस वर्षांत भारतात सतरा स्वाऱ्या केल्या. एकाही स्वारीत त्याचा कधी पराभव झाला नाही. प्रचंड लूट, कत्तली करीत तो हैवानासारखा भटकत राहिला ! अल्लाउद्दीन, मलिकाफर, महमद तुघलक, चंगीजखान या साऱ्यांनी केलेल्या त्या भयानक कत्तली आठवा. शरमेनं मान तुटून खाली पडेल. आपआपसातच भांडण, हेवेदावे साधीत, शत्रूंना आसरा देत या क्षणापर्यंत आपण वागत आहोत आणि त्यापायी मातृभूमीला वेगवेगळयांच्या दारी दरिद्री, भिकारी, दासी, बटिक बनवीत आहोत, हे कधी लक्षात येणार आपल्या ?

कधी काळी मेवाड, जोधपूर, जयपूर, अजमीरला डोळसपणानं जाऊन या. भावनोत्कटतेनं तिथल्या गडकिल्ल्यांना खरा खरा इतिहास विचारा — असा दुःखांनी भरलेला, अश्रूंनी भिजलेला इतिहास जगात कुठं आढळणार नाही ! मुसलमानी अमलात अखेरी अखेरी प्रत्येक रजपूत सरदाराला आपल्या घराण्यातील एकेक स्त्री मुसलमानांना अर्पण करावी लागलेली आहे. नौरोज, खुषरोज, मीनाबाजार या जत्रांच्या प्रसंगी आपल्या खूबसुरत स्त्रिया मुसलमानांना भेट म्हणून द्याव्या लागल्या....ही खरी खरी परिस्थिती तिथला बुरुज न् बुरुज, कडा न् कडा धाय मोकलून तुम्हाला सांगेल. जोहार करणाऱ्या स्त्रियांच्या पराक्रमाचे

पोवाडे गाता ? काय आनंदानं त्यांनी ते जोहार केले ? सुखानं हसत हसत त्यांनी त्या ज्वालांना मिठ्या मारल्या. वस्तुस्थिती अशी होती, की कर्त्या वीरांच्या हातून त्यांच्या शीलाचं, अब्रूचं, संरक्षणही होणं अशक्य आहे, हे जाणून त्या आत्मार्पण करीत होत्या. हा इतिहास, त्या आठवणी म्हणजे भारतीयांच्या दौर्बल्याचा, पराभवाचा पाढा आहे, हे कसं तुमच्या ध्यानी येत नाही ?

शूर स्त्रियांची परंपरा सांगणाऱ्यांनी हे ध्यानी घ्यायला हवं, की त्या त्या काळात पुरुषपिढी कर्तृत्वहीन, चारित्र्यहीन बनली म्हणून त्यांना हाती शस्त्र धरावं लागलं. मग ती ताराबाई असो, अहिल्याबाई असो अगर झाशीची राणी लक्ष्मी असो.

शिवछत्रपती राज्य स्थापू लागले तर त्यांचेच भाईबंद त्यांचे वैरी बनले. बाजी घोरपड्याचा इतिहास माहिती आहे तुम्हाला ? पेशव्यांनी साऱ्या भारतभर मराठ्यांचा दरारा बसवला, पण रघुनाथरावदादांचा घरबुडवेपणा तुम्ही विसरू शकता ? आपल्या हातांनी शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकवणारा बाळाजीपंत नातू-त्याच्या कर्तबगारीचं समर्थन तुम्ही करू शकाल !! मित्रहो, मला सांगायचं आहे ते हेच-आपल्या इतिहासाच्या दालनात उजेडापेक्षा अंधेरच जास्त. मौल्यवान रत्नं, जडजवाहिरांपेक्षा साप-विंचूच जास्त ! इतिहास-इति + ह + आस — हे असं घडलं ! आणि जे जे घडलं ते निःपक्षपातीपणानं खरंखुरं सांगायचं ठरवलं तर आपल्याच चुकांचे पर्वत उभे करावे लागतील ! मूर्खपणाचे महासागर तयार होतील. राष्ट्राच्या नव्या तरुण पिढीला केवळ निराशा—दारुण निराशा त्यापासून पत्करावी लागेल !

मूर्ख लोक इतिहासाचे मुडदे शोधत बसतात आणि अज्ञानी लोक त्यांचा अभिमान वाहत बसतात, हा विचार या क्षणी मला सर्वांत महत्त्वाचा वाटतो. पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल, हे एखाद्या कवीनं खुशाल म्हणत बसावं, पण प्लेटोनं आपल्या आदर्श राज्यव्यवस्थेत या कवींना पार हाकलून लावलं आहे, हे ध्यानी ठेवा ! आपल्या राष्ट्राचा उत्कर्ष आज व्हावा असं वाटत असेल, तर आजच कष्ट केले पाहिजेत, पराक्रम केले पाहिजेत-तिथं इतिहासाचे पोवाडे गाऊन काय उपयोग आहे.

रशियानं आपला उत्कर्ष नव्या तयार केलेल्या इतिहासामुळं साधला. स्टॅलिननं ट्रॉटस्कीचा कालखंडच बदलला. बुल्गानीन, क्रुश्चेव्ह यांनीही तेच

केलं ! ज्याच्या हाती ससा तो पारधी, अशी एक म्हण आपल्याकडं आहे. याचा अर्थच असा, की ज्याच्या हाती सामर्थ्य आणि सत्ता तोच आज अधिकार गाजवू शकतो. आपल्या हवा तसा इतिहास तो निर्माण करू शकतो.

नुसते रामायण आणि महाभारत वाचून शिवाजी निर्माण झाला असता, तर सारे हरिदास–पुराणिक शिवाजीच व्हायला हवे होते. अकिलस सीझरचे पराक्रम वाचून नेपोलियन तयार होत असतील, तर पराक्रमी वीरांच्या रांगा तयार करणारा कारखाना काढायला काहीच हरकत नाही ! केवळ जुना इतिहास सांगून-शिकवून राष्ट्रोत्कर्ष होत नाही, हे लक्षात घ्या ! तेव्हा राष्ट्रोत्कर्ष साधणं हेच खरं उद्दिष्ट असेल, तर ज्यातून स्फूर्ती मिळेल, चांगलं ध्येय निर्माण होईल, असाच इतिहास सांगा. गरज पडेल तर तयार करा, कारण राष्ट्राचे केवळ खरे इतिहास हे राष्ट्रोत्कर्षास निःसंशय हानिकारक आहेत, हे कठोर सत्य आहे ! एवढचं सांगून मी माझं भाषण संपवितो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४००४६ दि: १-१-९६
क्रमांक १६०३ नों दि: २८-११-५६

१८

# राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक आहे ! (विरुद्ध)

*सन्माननीय अध्यक्ष,*
*आणि मित्रहो !—*

भारतीयांचा आवडता कवी कुलगुरू कालिदास यानं परमेश्वराजवळ अशी कळवळून प्रार्थना केली आहे, की 'परमेश्वरा मला हवी ती कठोर शिक्षा तू दिलीस तरी चालेल, पण अरसिकेषु कवित्व निवेदनम् शिरसी मा लिख मा लिख, मा लिख।'— महाकवी कालिदासाची ही उक्ती मला आता या ठिकाणी का आठवली असावी, हे आपण सुज्ञांनी जाणलंच असेल ! या दिलेल्या प्रस्तावाच्या विरुद्ध बाजूनं बोलणाऱ्या आम्हा सर्व स्पर्धकांची स्थिती आज त्या कालिदासासारखीच झाली आहे ! राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचं अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक नाही, हे पटवून देण्याची पाळी यावी यापरतं दुर्दैव ते कोणतं ? सूर्याचं तेज प्रखर असतं, चंद्राचं चांदणं शीतल असतं, कोकिळेचा आलाप मधुर असतो. गुलाबपाकळ्या नाजुक असतात, हे पटवून द्यायचे, सिद्ध करायचे का विषय आहेत ? तद्वतच राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक नाही, हे तत्त्व अथवा हा विचार पाहू गेल्यास सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ, हिमालयाइतका अढळ, न बदलणारा आहे. वास्तविक या विषयावर वादविवाद होऊच शकत नाही ! पण करणार काय ?

'तू रोमला जाशील तर रोमन लोकांप्रमाणंच वाग !' असा उपदेश जगज्जेत्या अलेक्झांडरलाही त्याच्या गुरूनं केला होता. इथंही तीच परिस्थिती आहे. विनाकारण वेड घेऊन पेडगावला जाणाऱ्या या वावदुकांच्या परिसरात आम्ही आलो आहोत खरे, तेव्हा नाइलाजानं कां होईना, वादविवाद केलाच पाहिजे. आपली बाजू पटवून देण्याचा प्रयत्नही केला पाहिजे.

आम्ही लहान विद्यार्थी आहोत, तेव्हाच आमच्या म्हणण्यानं विरोधकांचं समाधान होणार नाही, हे तर दिसतंच आहे. तेव्हा प्रथमच जगन्मान्यता पावलेल्या चारदोन श्रेष्ठ व्यक्तींचेच बोल तुमच्यासमोर ठेवतो मराठी भाषेचे शिवाजी म्हणून ज्यांचा गौरव केला जातो, ते विष्णुशास्त्री चिपळूणकर आपल्या 'इतिहास' या प्रसिद्ध निबंधामध्ये म्हणतात– "खऱ्या इतिहासाच्या अध्ययनाने व अध्यापनाने जिज्ञासावृत्ती, सदुपदेश, मनास प्रसन्नत्व व उन्नती, मनोरंजन, नीतिज्ञान व मनाचे पोषण असे सहा प्रमुख फायदे होतात !" स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे–हा स्वातंत्र्याचा महामंत्र जपणारे लोकमान्य टिळक तेरा एप्रिल एकोणीसशे पाचच्या 'केसरी'मधील आपल्या अग्रलेखात आग्रहानं सांगतात, " इतिहास हा देशाच्या अवनत स्थितीमध्ये लोकास समाधान वृत्ती प्राप्त करून देण्यास व पुढील काळ चांगला येईल या आशेवर दिवस कंठण्याचे सामर्थ्य आणण्यास एक प्रकारची शक्ती आहे. तरुण पिढी तेजस्वी निपजण्यास जुन्या कागदपत्रांच्या सहाय्याने लिहिलेल्या खऱ्या इतिहासाचा फार उपयोग होतो !" इंदिरेला लिहिलेल्या पत्रात पंडित जवाहरलाल नेहरू आत्मविश्वासानं सांगतात, की "जीवनाकडे पाहण्याची दृष्टी स्वच्छ, विशाल व्हावयाला हवी असेल, तर इतिहासाचाच अभ्यास जरूर पाहिजे. जगातील मोठमोठ्या राष्ट्रांचा उदयास्त कसा झाला, अनेक थोर संस्कृत्या कोणत्या कारणाने वृद्धिंगत झाल्या व नाश पावल्या; विद्या, कला, व्यापार यांच्या परंपरा कशा जोपासल्या गेल्या, या सर्व गोष्टींचा मानवी जीवनावर कसकसा परिणाम होत गेला, या साऱ्या गोष्टी केवळ इतिहासाच्या अभ्यासानंच ध्यानी येतात. तरुण पिढीने केवळ स्वराष्ट्राचाच नव्हे तर इतर राष्ट्रांच्या इतिहासाचाही आस्थेनं अभ्यास अवश्य करावा !"

मित्रहो, या महापुरुषांच्या वचनांवरून तरी खऱ्या इतिहासाच्या अध्ययन–अध्यापनाचे महत्त्व तुमच्या ध्यानी यावे ! राष्ट्राच्या खऱ्या इतिहासाचे

अध्यापन राष्ट्रोत्कर्षास हानिकारक नाही, हे आमचं म्हणणं आणखी दोन तऱ्हांनी तुमच्यासमोर ठेवू इच्छितो. एक तऱ्हा अशी, की ज्या ज्या देशात, जेव्हा जेव्हा आपल्या खऱ्या इतिहासाचे अध्यापन झाले त्या त्या वेळीच राष्ट्रोत्कर्ष कसा झाला, हे नीट समजावून, पटवून दिलं, की मग वादाला जागाच उरणार नाही ! ...

ग्रीक देशात होमर कवीला आद्यकवी म्हणून जसा मान आहे, अगदी तसाच हिरॉडटस् या इतिहासकारालाही मान आहे. आद्यइ तिहासकार म्हणून व राष्ट्राचा थोर उद्धारक म्हणून सारं राष्ट्र त्याला आदरानं आजही वंदन करतं ! ग्रीकांचे फारसिकांशी जेव्हा दारुण युद्ध झा ले होते, त्या काळात तो जन्मला होता. त्याने दूर दूर देशांचा प्रवास केला, अविश्रांत परिश्रम केले. आपल्या लोकांच्या पराक्रमाच्या आठवणी, कागदपत्रे, मुद्रा गोळा करून ग्रीक भाषेतला पहिला इतिहास त्याने लिहिला आणि तो ऑलेम्पिक गेम्सप्रसंगी असंख्य लोकांसमोर वाचून दाखवला. ग्रीकांच्या प्रचंड पराक्रमाचा तो रोमांचकारी इतिहास ऐकून लक्षावधी माणसे आनंदून गेली. राष्ट्राभिमानाची फार मोठी जागृती त्या ग्रंथानेच केली. हिरॉडटस्नंतर थुसिडिडिज हा इतिहासकार तेथे झाला. सॉक्रेटिस, जिनोफन व त्याचे अनेक शिष्य आणि सांप्रदायिक इतिहासकारांनी ओजस्वी भाषेत लिहिलेले इतिहास वाचून अनेक पिढ्यांनी स्फूर्ती घेतली. पराक्रमामागून पराक्रम करून ग्रीक देश उत्कर्षाच्या कळसाला पोहचवला !

ग्रीकानंतर रोमन लोकांचे भाग्य उदयास आले. त्यांच्यातही अनेक थोर इतिहासकार झाले. लिव्ही, सालस्ट, सीझर, प्लुटार्क, यासिटस इत्यादींनी रोमन लोकांची संस्कृत परपंरा व पराक्रमाचे पोवाडे मुक्त कंठाने गाइले आहेत. हजार-दीड हजार वर्षांचा राज्यवैभवाचा त्यांचा इतिहास म्हणजे आजही मोठमोठ्या विद्वानांचा चिंतन, मननाचा विषय बनून राहिला आहे !

महाराष्ट्राच्या काय अगर भारताच्या काय, उत्कर्षाचं हेच इंगित आहे. आपल्या हजारो वर्षांच्या इतिहासाचा, संस्कृतीचा जेव्हा आपण अभिमान बाळगला, त्याच्या उत्थानपतनाची दखलगिरी प्राणपणाला लावून घेतली, त्या त्या वेळीच आपली अस्मिता जागी झालेली आहे. त्याचवेळी या देशीच्या पराक्रमी महापुरुषांच्या हातून दाही दिशांना पराक्रमाचा विजयचिन्हांकित ध्वज फडकत गेला आहे. तलवारीच्या खणखणाटांनी दिशा दुमदुमून गेल्या

आहेत. गर्जना–घोषणांनी आकाश कोंदून गेलं आहे. संपत्ती आणि ऐश्वर्य यांचा साठा एवढा प्रचंड झाला होता, की आकाशातील चंद्रचांदण्यांनी आश्चर्यानं डोळे मिचकविण्यास प्रारंभ केला. आंगठयाएवढया भारतवासीयांनी असे उत्तुंग पराक्रम केले, की हिमालय आपला माथा उचलून ते पाहत आजतागायत उभा राहिला! तो चंद्रगुप्त, तो यशोवर्मा, हर्षवर्मा, तो विक्रमादित्य, तो पृथ्वीराज, तो राणासंग, तो राणाप्रताप, ते छत्रपती शिवाजी महाराज, ते सदाशिवरावभाऊ. किती महावीरांची नुसती नामावली उच्चारावी ?– अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहावेत; स्फूर्तीनं बाहू स्फुरण पावावेत; छाती अभिमानानं फुगून जावी, असा आपला थोर इतिहास आहे. ज्यांना हा थोरपणाच कळत नाही, जाणता येत नाही, ते कपाळकरंटेच त्यांच्या दुर्भाग्याला पारावर नाही!

खऱ्या इतिहासाच्या अध्ययन-अध्यापनामधूनच जगात थोर पुरुष निर्माण झालेले आहेत, या दुसऱ्याही तऱ्हेनी विचार करण्यासारखा आहे! – होमर कवीने अकिलसाचा पराक्रम वर्णन केला तो शिकंदराने वाचला, त्यातून त्याला प्रेरणा मिळाली. शिकंदराच्या पराक्रमाचा इतिहास नसता तर सीझर झालाच नसता! सीझरच्या पराक्रमाचे पोवाडे ऐका-वाचायला न मिळते तर नेपोलियनही झाला नसता! आपल्याही देशाचा विचार करा. व्यासांनी रामायण–महाभारत लिहिले नसते, तर शिवाजी झाला नसता! थोर शिवचरित्र व मराठे झाले नसते, तर वासुदेव बळवंत निर्माण न होता! आणि १८५७ च्या क्रांतिकारकाच्या इतिहास उपलब्धच झाला नसता, तर स्वा. सावरकर आणि सुभाषचंद्र बोस कितपत बंड उभारू शकले असते?

सद्गृहस्थहो आणि विरुद्ध बाजूच्या स्पर्धक मित्रांनो-वेळ असता तर देशोदेशीच्या इतिहासाची महती, महापुरुषांची जयगीतं, फार कशाला आपल्याच इतिहासाचा थोरपणा विस्तारानं सांगितला असता. विनायक कवी सांगतात त्या प्रमाणं “ पूर्व दिव्य ज्यांचे त्याला रम्य भावी काळ! ” आपल्या भाग्यानं फार थोर भूतकाल आपल्या पाठीशी उभा आहे. इतिहासाचे अंजन घालून तो पाहू या. आपल्याच पूर्वजांच्या हर्षशोकाच्या, सुखदुःखाच्या, अभिमानअपमानाच्या प्रसंगाचे अवलोकन करू या आणि समर्थ सांगतात त्याप्रमाणे ‘ उत्कट भव्य तेवढेच घेऊन, ’ ‘ मळमळीत अवघेची टाकून ’ रम्य भावी काल घडवू या–एवढं सांगून मी माझं भाषण संपवितो!

१९

## " माध्यमिक शाळेत संस्कृत विषयाचे प्राधान्य अलीकडे कमी करण्यात आले आहे ! हे इष्ट आहे "––( प्रस्तावाच्या बाजूने )

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो ! —*

चालू वर्षाच्या या वक्तृत्वस्पर्धेत भाग घेऊन वादविवाद गाजविण्यासाठी आलेल्या आमच्या या विरोधक मित्रांना काय म्हणून संबोधावं हेच माझ्या ध्यानी येत नाही. हे सारेजण बिचारे अज्ञानी तरी असावेत किंवा निव्वळ भांडखोर तरी असावेत ! उद्या गंमत म्हणून कोणी या स्पर्धेसाठी आजच्या काळात "सशांना शिंगे आल्यास मानवता नष्ट होईल काय ?" "किंवा कावळ्या-बगळ्यांनी रियाज सुरू केल्यास कोकिळांनी गाणं बंद करावं काय ?"— असे विषय ठेवले तरी आमचे हे विरोधक मित्र अस्तन्या सरसावून वादविवादाला उभे राहतील ! त्यांच्या लक्षात हे यायचंच नाही की सशाला कधीही शिंगे येत नसतात आणि कावळा कितीही ओरडला तरी कोकिळेच्या गाण्याची सर त्याला कधीच येणार नाही ! ... अगदी तीच अवस्था आज याही ठिकाणी प्राप्त झाली आहे.

आमच्या साऱ्या विरोधक-मित्रांच्या भाषणांचा सारांश अखेरी एवढाच

आहे, की संस्कृत भाषा फार प्राचीन आहे. साहित्य, राजकारण, तत्त्वज्ञान अशा सर्व विषयांवर त्या भाषेत विपुल वाङ्मय आहे. एक ते मोठे रत्न-भांडारच आहे. अनेक पाश्चिमात्य विद्वानांनीही संस्कृत भाषेचा मुक्तकंठाने गौरव केला आहे.... वगैरे वगैरे. फार झालं तर अशीच आणखी दहापाच गौरवाची वाक्यं तुम्हीही भर म्हणून यात घाला !

मित्रहो ! प्रथमच मी हे आनंदानं मान्य करतो, की त्यांचं हे सार म्हणणं आम्हाला मान्य आहे. एकदम कबूल आहे ! मी ही मान्यता अशासाठी देतो आहे, की संस्कृत भाषेत साहित्यभाण्डार, ज्ञानभाण्डार, आहे अथवा नाही, हा मुळीं वादाचा प्रश्नच नाही ! कोणीहि हे मान्य करील, की महाकवी कालिदासाच्या काव्यनाटकांनी मनाला अतिशय आनंद होतो. कौटिल्यानं आपल्या अर्थशास्त्रात राजकारणाची चर्चा अतिशय बुद्धिकौशल्यानं केलेली आहे. कदाचित त्यातील विचार आजही मार्गदर्शक ठरतील ! वेदउपनिषदांतील तत्त्वज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे. कोणाही जागतिक कीर्तीच्या प्रकांडपंडितानं या तत्त्वज्ञानासमोर नतमस्तक व्हावं !... या साऱ्या गोष्टी आमच्या विरोधक मित्रांपेक्षा आम्ही अधिक चांगल्या जाणतो. संस्कृत साहित्याचा हा श्रेष्ठपणा पूर्वी होता, आजही आहे, उद्याही खात्रीनं राहील, पण कृपा करून हे लक्षात घ्या – या विचारांचा आणि वादासाठी दिलेल्या प्रस्तावाचा काहीही संबंध नाही !! ...

माझ्या दृष्टीनं प्रस्तावामधले दोनच शब्द महत्त्वाचे आहेत. पहिला ‘ माध्यमिक शाळेतील ’ व दुसरा ‘ अलीकडे. ’

आज माध्यमिक शाळेत दिल्या जाणाऱ्या संस्कृतच्या शिक्षणाला काहीतरी अर्थ आहे का ? साधारणपणे ८ ते ११ या तीन वर्षांत आपण नेमकं काय नि किती संस्कृत शिकतो बरं ? काही गद्य उतारे, त्यांचं भाषांतर, प्रथम-गणापासून दशमगणापर्यंतचे धातू, काही रूपं, पाठांतरासाठी असलेली काही सुभाषितं .... झाला, संपला अभ्यास ! शिवाय हे सारं शिक्षण देण्याघेण्या-साठी शिक्षक आणि विद्यार्थी यांचा केवढा आटापिटा चाललेला असतो ! प्रांजलपणानं सांगायचं तर सारे विद्यार्थी आईवडिलांची, शिक्षकांची केवळ जबरदस्ती म्हणूनच हा विषय शिकत राहतात आणि परिश्रम करीत राहतात. तशात ते संस्कृतचे शिक्षक पाठशाळा, वेदशाळेचे अभिमानी असले म्हणजे

तर मग त्राहि माम् त्राहि माम् म्हणायचीच पाळी येते ! ही खरीखुरी शालेय परिस्थिती ध्यानी घेतली म्हणजे हे संस्कृतचं जुन्या काळचं प्रस्थ कमी झालं याबद्दल सर्वजण मनातून धन्यवादच देताना आढळतात.

संस्कृत भाषेच्या शिक्षणाचा आम्ही तिरस्कार करतो, किंवा तिला दुय्यम-तिय्यम दर्जा शिक्षणक्रमात देऊ इच्छितो, त्याचं खरं कारण हे आहे, की या शिक्षणाचा आणि आमच्या व्यावहारिक जीवनाचा कुठंही संबंध येत नाही, यासाठी एस. एस सी. परीक्षा पास झाल्यानंतर कोणत्याही कोर्ससाठी जायचं असेल अगर महाविद्यालयात प्रवेश करायचा असेल, तर सर्वप्रथम प्रश्न विचारला जातो तो हाच, की गणित होतं का ? इंग्रजीत किती मार्क पडले ? सायन्स विषय घेतला होतात का ? – आज पुढील शिक्षणक्रमातही संस्कृत भाषेचं महत्त्व मानलं गेलेलं नाही. इतरत्र संस्कृतची कोणी चौकशीसुद्धा करीत नाही. मग माध्यमिक शाळेतील संस्कृत विषयाचे महत्त्व कमी झालं, तर त्याविरुद्ध ओरड कशासाठी ही विरोधक मंडळी करीत आहेत, हेच कळत नाही !

बरं, दुसरी गोष्ट अशी, की या देवः देवौ पासून श्वाः श्वानौपर्यंत केलेल्या व्याकरणाच्या झुंजीमुळे आणि ‘ आकाशात् पतितं तोयं ’ सारख्या सुभाषितांच्या पाठांतरामुळं जीवनावर फार मोठा परिणाम होतो, असं कोणीही विचारवंत मनुष्य सांगणार नाही ! केवळ संस्कृत भाषेच्या अध्ययनानं मनावर सुसंस्कार होतात, जीवनाकडं पाहण्याची दृष्टी प्राप्त होते, वगैरे भलभलते मुद्दे मांडून या भाषेचा मोठेपणा पटवू पाहत असतील, तर ध्यानी घ्या, ते तुमची शुद्ध फसवणूक करतात. माध्यमिक शाळेतील, एखाद्या पाठ्यपुस्तकातील बाणाच्या कादंबरीचा साडेतेरा ओळींचा उतारा वाचून संस्कृत साहित्याची गोडी लागली आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रामधल्या एखाद्या श्लोकाचा अन्वयअर्थ पाठ करून सांप्रत कोणी नवा चंद्रगुप्त अवतरला, अशी वार्ता आमच्या काही कानी आलेली नाही ! बरं, आपण माध्यमिक शाळेत असताना संस्कृत भाषेचं अध्ययन केलं नाही, म्हणून पश्चात्तापही व्यक्त करताना कोणी आढळत नाही अगर केवळ संस्कृतचा सखोल व्यासंग करण्याची आवड माध्यमिक शिक्षण घेतानाच निर्माण झाली, असंही कोणी सांगताना आढळत नाही ! माझ्या तक्रारीचा नेमका रोख कृपा करून आपण ध्यानी घ्या ! माध्यमिक शाळेत दिलं जाणारं संस्कृतचं शिक्षण अती रूक्ष, कंटाळवाणं असतं. ते फार तोकडं असतं. त्या एकाच

विषयाच्या तयारीसाठी सर्व विद्यार्थ्यांना राबायला लावणं, हा त्यांच्यावर शुद्ध अन्याय आहे, जुलूम आहे, नव्हे तो कालाचा अपव्यय आहे.

मित्रहो, या प्रस्तावामधला माझ्या दृष्टीनं दुसरा विशेष महत्त्वाचा शब्द 'अलीकडे' हा आहे, हे मी मघाच तुम्हाला सांगितलं आहे. 'अलीकडे' याचा अभिप्रेत अर्थ आहे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर! आणि ही गोष्टदेखील फार चांगली झाली असंच मला म्हणायचं आहे. कारण असं, दीडशे वर्षांच्या पारतंत्र्याच्या काळात सारा बहुजन समाज हा कोणत्याही तऱ्हेच्या शिक्षणापासून अलिप्तच राहिला होता! त्यामुळं त्या काळात विशिष्ट जातीतील मूठभर लोकच ज्ञानाचे ठेकेदार झाले होते! तशात खालच्या जातीजमातींमधील एखादा हुशार, प्रज्ञावंत, स्वप्रयत्नानं श्रेष्ठत्व मिळवू पाहील, तर ही स्वतः ज्ञानी म्हणविणारी माणसं त्या व्यक्तीची कशी ससेहोलपट करीत असत, हे डॉ. आंबेडकरांचं चरित्र वाचाल तर ध्यानात येईल! आज सारा देश या पंधरा-सतरा वर्षांत जागा होतो आहे. आपला आळस आणि अज्ञाननिद्रा झटकून उभा राहू पाहतो आहे. सामान्यांतला सामान्य माणूसही स्पर्धेत उतरू पाहतो आहे; धावू पाहतो आहे. आपले हक्क मिळवू पाहतो आहे. सुखी जीवनाची, ऐश्वर्याची, सत्तेची तोही स्वप्नं रंगवतो आहे. व्यापार, उद्योगधंदे, कारखाने, साहित्य, कला सर्वच क्षेत्रांत आपल्या देशाला फार मोठी प्रगती करायची आहे. इंग्लंड, रशिया, अमेरिका येथील शिक्षणाच्या तुलनेनं आपण निदान शंभर वर्षे तरी मागसलेले आहोत आणि एवढ्याचसाठी आपल्या देशातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणक्रमात अपरिहार्यपणे महत्त्वाचे बदल केले जात आहेत. करावे लागणार आहेत! तुलनेनं बहुजनसमाजातला शेतकरी, कामकऱ्याचा विद्यार्थी हा सामान्य आहे, हेदेखील विसरून चालणार नाही. त्याला 'न' आणि 'ण' मधला फरक कळतच नाही. शब्दाच्या चतुर्थी-षष्ठीची रूपं त्याच्या ध्यानात राहत नाहीत. ते जाडे जाडे समास तो सोडवू शकत नाहीत. ती जीवघेणारी 'शक्रूपचमुचरिच-वच्विच्' ची घोकंपट्टी त्याच्या हातून होत नाही. उघड सांगायचं झालं तर असंच म्हणावं लागेल, की संस्कृत भाषेचं अध्ययन हा त्याच्या प्रगतीमधला एक मोठा अडसर होऊन बसतो. मग तो दूर करायला नको काय? त्याची ज्ञानलालसा, प्रगतीची इच्छा आपण पूर्ण करणार नाही काय? माध्यमिक शाळेतील आजचं संस्कृत भाषेचं स्थान महत्त्वाचं, की माध्यमिक शाळेतील

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचं स्थान, त्यांची परिस्थिती, प्रगती या गोष्टी महत्त्वाच्या? यात प्राधान्य कशाला देणार? असा प्रश्न असेल तर निदान मी तरी जाहीररीतीनं आणि तितक्याच प्रामाणिकपणानं सांगू इच्छितो, की इथं बहुजन समाजामधील विद्यार्थ्यांनाच प्राधान्य दिलं गेलं पाहिजे! बहुजन समाजामधील सारी नवी पिढी शिक्षण घेऊन तयार झाली पाहिजे, हीच लोकशाही जीवनाची प्राथमिक गरज आहे. यासाठीच अटळ म्हणून, अपरिहार्य म्हणून माध्यमिक शाळेत संस्कृत भाषेचं स्थान कमी दर्जाचं ठेवावं लागलं आहे!

पण त्याबरोबरच हेही लक्षात घ्या, की संस्कृत भाषेचा मोठेपणा शिक्षणखात्यानं किंवा सरकारनं कधीच अमान्य केलेला नाही! टिळक विद्यापीठ, भांडारकर इन्स्टिटयूट, भारतीय विद्याभवन यांसारख्या अध्ययन-अध्यापन, संशोधन करणाऱ्या संस्थांना केंद्रसरकारकडून, प्रांतिक सरकारकडून अनुदानं दिली जातात. सर्व तऱ्हेचं सहाय्य देऊन या संस्थात तिथं काम करणाऱ्या विद्वान पंडितांच्या परिश्रमाचं चीज केलं जातं. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांच्यासारख्या थोर संस्कृत-पंडिताचा सन्मान करण्यात चिंतामणराव देशमुख, डॉ. राधाकृष्णन अशा थोर संस्कृत भाषेच्या अभ्यासकांची उचित जागी योजना करण्यात कसूर केली जात नाही. आपलं सारं साहित्य खचितच थोर आहे. त्याचा व्यासंग करणाऱ्या व्यक्ती खात्रीनं आदरणीय आहेत, पण तेवढ्यासाठी माध्यमिक शाळेत तो विषय सक्तीचा करावा अगर संस्कृत ही राष्ट्रभाषा करावी, ही मागणी न्याय्य ठरणार नाही! आज सभोवताली जगात इतरही अनेक भाषांमधून नवनवीन साहित्य निर्माण होत आहे. नव्या जीवन-मंथनामधून नवे विचार-आचार निर्माण होत आहेत. त्यांच्या अभ्यासाकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. इतिहास, संस्कृती, परंपरा असे मोठमोठे शब्द उच्चारून जुने तेच सोने असा आक्रोश करणं हे असमंजसपणाचं ठरेल. 'पुराणमित्येव न साधु सर्वम्' असं तुमचा कविकुलगुरू कालिदास यानंच सांगितलं आहे ना?

आपलं माध्यमिक अगर महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर साहजिकच याच विद्यार्थ्यांच्या मनी ज्ञानलालसा निर्माण होईल. त्या ज्ञानलालसेला तृप्त करण्यासाठी हेच विद्यार्थी कालांतराने संस्कृत भाषेचं अध्ययन-अध्यापन उद्या जरूर करतील. कालांतरानं पुन्हा या संस्कृत भाषेला पूर्वीची प्रतिष्ठा लाभेलही.

ती प्रतिष्ठाच लाभू नये म्हणून ती भाषा व तीमधलं साहित्य नष्ट करण्याचा कोणी प्रयत्न केलेला नाही. खात्रीनं करणारही नाहीत!

माझ्या विरोधक मित्रांच्या सद्भावना मी ओळखू शकतो. त्यांच्या अपेक्षा भविष्यकाळात पूर्ण होऊ शकतील, हेदेखील मी जाणू शकतो....पण आज? आज हे मान्य केलंच पाहिजे-माध्यमिक शाळेत संस्कृत विषयाचे अध्यापन अलीकडे कमी करण्यात आले आहे, ते योग्यच आहे! नव्हे नव्हे, ते आवश्यक आहे. नमस्ते!

# माध्यमिक शाळेतील संस्कृत विषयाचे प्राधान्य....
# ( प्रस्तावाच्या विरुद्ध बाजूने )

*सन्माननीय परीक्षक,*
*आणि मित्रहो!—*

आमच्या विरोधक मित्रांची भाषणं ऐकल्यानंतर भर्तृहरीच्या नीतिशतकांमधील एका श्लोकाची मला राहून राहून आठवण होत आहे. भर्तृहरी म्हणतो–

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि च तं नरं न रंजयति ॥

जो केवळ अज्ञानी आहे, त्याची लवकर समजूत घालता येते, किंवा जो ज्ञानी आहे, त्याची तर त्याहून लवकर समजूत घालता येते, पण ज्ञानाचा अर्धामुर्धाच संस्कार ज्याच्यावर झाला आहे, अशांना नमस्कार असो! साक्षात ब्रह्मदेवालाही त्यांचे समाधान करता येणार नाही!

आमच्या विरोधकमित्रांची अवस्था खरोखरीच मोठी चमत्कारिक झालेली आहे. ते पूर्णपणे अज्ञानी असते तर त्यांची समजूत तरी घालता आली असती. बरं, ते पूर्ण ज्ञानी असते तर त्यांनी आमचाच पक्ष खात्रीनं घेतला असता! ते बिचारे पूर्ण अज्ञानीही नाहीत आणि ज्ञानी तर नाहीतच नाहीत! तेव्हा त्यांच्याशी वादविवाद करून आमचं म्हणणं पटवून देणं हा शुद्ध

मराठा ग्रंथ ... अनुक्रम ४००४६ वि. निबंध ... ९६०३ नों दि: २८।१२।५६

कालाचा अपव्ययच ठरणार आहे, पण नाइलाज आहे. खटनटाशी खटनट आणि उद्धटाशी उद्धट हे झालंच पाहिजे आणि एवढयाचसाठी याप्रसंगी त्यांना त्यांच्या भाषेत, त्यांच्या शब्दात पटेल असं काहीतरी सांगितलं पाहिजे !

माध्यमिक शाळांत संस्कृत भाषेचे प्राधान्य अलीकडे कमी करण्यात आले आहे, ही गोष्ट इष्ट झाली असं आमचे विरोधक सांगताहेत आणि आपल्या अज्ञानाचं आणि अदूरदर्शीपणाचं अहमहमिकेनं हे जे जाहीर प्रदर्शन करीत आहेत, ते पाहून मला प्रथम सखेद आश्चर्य वाटतं आहे.

पण स्वत्व विसरून, स्वभाषा, संस्कृती, इतिहास यांचा उपहास व निंदा करून त्यांचं महत्त्व कमी मानणाऱ्यांची परंपरा निदान महाराष्ट्रात तरी काही नवीन नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर सांगतात, १८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाली आणि इंग्रजी साम्राज्यानं आपला सारा देश चकित होऊन गेला. त्यामुळे "आपण हिंदू म्हणजे काय कस्पटापेक्षा कस्पट, अधमाहून अधम, मूर्खापेक्षा मूर्ख असे वेडगळ समज साऱ्या लोकांचे होऊन बसले. धर्माची तर अशी लाज वाटू लागली, की काही बोलण्याची सोय नाही. तेव्हा एकंदरीत देश नाही, धर्म नाही, भाषा नाही, रीतिरिवाज नाही, असं पोरके राष्ट्र आपण सद्यःस्थितीत बनलो आहोत. असे झाल्यामुळे जो कोणी पूर्वीच्या संबंधाने चांगलं म्हणेल तो एक वेडगळ तरी असेल किंवा मूर्ख तरी असेल, असा एकंदरीत लोकांचा ग्रह होऊन गेला आहे ! —" १८७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेले हे विचार आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही खरे ठरावेत हे केवढे आश्चर्य आहे ? इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीमधून आपण सुटलो, पण मानसिक गुलामगिरीत मात्र अद्यापि आहोत, हे ध्यानी येईल. स्वत्वाचा विसर पडून पराक्रम-अभिमानाला मुकला, की देश कसा गलितमात्र होऊन जातो, हे आज चिनी आक्रमणानं सिद्ध होऊन चुकलं आहे ! आणि हे स्वत्व केवळ स्वभाषा, संस्कृती, इतिहासाच्या अभिमानानंच जागृत राहतं, विकास पावतं आणि पराक्रमास उद्युक्त करतं हे निदान यापुढं तरी ओळखावयास शिकलं पाहिजे, असं तुम्हा सुज्ञास वाटत नाही काय ?

या संस्कृत भाषेनंच आजवर साऱ्या जगाला वेद, उपनिषद, गीतेमधल्या तत्त्वज्ञानांनी जीवनाला प्रेरणा दिलेली आहे. रामायण-महाभारतासारख्य-महाकाव्यांमधून जीवनातील उदात्ततेचे आदर्श रंगवले आहेत. कालिदासा

भवभूतीसारखे अलौकिक प्रतिभेचे नाटककार, पाणिनीसारखा वैय्याकरणी, कौटिल्यासारखा अर्थशास्त्रज्ञ, भास्कराचार्यांसारखे गणितज्ञ याच भाषेत निर्माण झाले. त्यांची कीर्ती दशदिशांत शतकानुशतकं दरवळते आहे. त्यांनी आपल्या प्रतिभासामर्थ्यावर केलेले ते चमत्कार पाहून भलेभले आजही आश्चर्यचकित होत आहेत ! विष्णुशास्त्री चिपळूणकर अभिमानाने बेहोष होऊन लिहितात – "अरे आमच्या बुद्धिमत्तेचे प्रभाव जगाच्या इतिहासावर अक्षय्य खोदले गेलेले आहेत व सूर्यचंद्र असेतोपर्यंत त्यांचा झेंडा मिरवीत राहील !" कुणीकडे हा चिपळूणकरांचा तेजस्वी अभिमान आणि संस्कृत भाषेला शिक्षणक्रमात अवमानाची जागा मिळाली ही गोष्ट फार बरी झाली, म्हणून कठरवानी सांगणारी आमच्या विरोधकांची ही नतद्रष्ट पिढी ! !.... जगन्नाथराय पंडित भामिनिविलासामध्ये एका श्लोकात म्हणतात — ज्या गुहेपुढे आले असता मदोन्मत्त हत्तींनी भयचकित होऊन क्षणभरही न ठरता दूर पळून जावं, जिथं हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्यांचा खच पडला आहे, त्याच सिंहाच्या गुहेत– अरेरे, आज कोल्ह्या, कुत्र्यांच्या गर्जना ऐकू येत आहेत ! – प्राण कंठाशी आले तरी यवनांची भाषा उच्चारणार नाही, असा आपल्या पूर्वजांचा भाषाभिमान कुणीकडे ? आणि यापुढे प्राण गेला तरी संस्कृतभाषेचं पुनरुज्जीवन होता कामा नये असं सांगणारी ही क्षुद्र पिढी कुणीकडे ? ....

या संस्कृत भाषेचा मोठेपणा दुर्दैवानं तुम्हा आम्हांला कळत नसेल तर पाश्चात्त्य विद्वानांनी काढलेले गौरवाचे उद्‍गार तरी नीट ध्यानी घ्या. "मानवी जीवनाची सर्वश्रेष्ठ उन्नती आणि उदात्त भावनांचा परमोत्कर्ष ऋग्वेदामध्ये आहे," ग्रिफिथ म्हणतो. "वेदाइतके सांगण्यासारखे श्रेष्ठ तत्त्वज्ञान जगातील कुठल्याही ग्रंथसंभारात नाही," असं ॲनी बेझंट सांगते. "भारताच्या प्राचीन ग्रंथांमधूनच सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान प्रभावीपणं मांडलं गेलं आहे," असं मॅक्समुल्लर म्हणतो. "जोवर वेद, उपनिषदं जगात टिकून आहेत, तोवरच मानव सुखानं जगू शकेल !" असं रोमारोलाँ खात्री देऊ शकतो. आज रशियन भाषेत वेद, उपनिषदं, रामायण, महाभारताची भाषांतरं मोठ्या परिश्रमपूर्वक आणि आस्थेनं केली जात आहेत आणि जर्मन राष्ट्र तर संस्कृत भाषेचं अध्ययन व अध्यापन करण्यात स्वतःला धन्य मानत आहे. कुठं या पाश्चात्त्य विद्वानांच्या संस्कृत भाषेबद्दलच्या व थोरवीबद्दलच्या निष्ठा आणि संस्कृत कमीच करा, ती गाडूनच

दा. क.

टाका, ती आज निरुपयोगी आहे, असा टाहो फोडणारे आमचे विरोधक विद्वान ! या साऱ्या परिस्थितीला दैवदुर्विलास यापलीकडं काय म्हणायचं ! घरी कामधेनू असताना ताकासाठी दुसऱ्याकडे भांड करावं, कल्पवृक्षाखाली आत्मनाशच चिंतावा, चिंतामणीची पूजा करून भिक्षेची याचना करावी, याला कर्मदरिद्री याखेरीज दुसरं नाव काय द्यायचं ? पु. ल. देशपांड्यांच्याच भाषेत सांगावयाचं झालं तर— आमच्या नाकर्तेपणाची, नामुष्कीची आणि भयानक न्यूनगंडाने पीडित अशा लोकांची ही केविलवाणी कथा आहे. घरच्या म्हातारीचे काळ झालेल्या महापुरुषांच्या महापतनाचा हाच एक इतिहास आहे !

संस्कृत भाषेची थोरवी, पाश्चात्त्य विद्वानांनीही तिचा केलेला गौरव आणि आपली तीविषयीची वृत्ती आणि भावना या संबंधीचं विवेचन केल्यानंतर विरोधकांच्या एका महत्त्वाच्या मुद्द्याचा या ठिकाणी आवर्जून परामर्श मला घेतलाच पाहिजे. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या सूत्राचा अनेकांनी उच्चार करून ही संस्कृत भाषा कुचकामी आहे, तिचा समाज - प्रगतीला अडथळाच होतो, म्हणून तिकडे दुर्लक्षच केले पाहिजे, असा सूर बऱ्याच विरोधक मित्रांनी काढला. आज विज्ञानयुग आहे, तेव्हा सूर्यचंद्रांना अर्घ्य आणि मन्त्रपुष्पं वाहात बसण्यापेक्षा त्यावर स्वारी करण्याचे प्रयोग करून इतर राष्ट्रांबरोबर प्रगती केली पाहिजे, असं काहींनी प्रतिपादन केलं. आजच्या जीवनातील, बहुजन समाजाच्या गरजा मीही समजू शकतो, पण केवळ विज्ञानाचीच प्रगती केलेल्या राष्ट्रांची आज काय अवस्था झालेली आहे, तिकडेही तुमचे लक्ष वेधू इच्छितो. आत्मघाताच्या खाईत ते नेते आणि राष्ट्र तुम्हालाही त्याच खाईत ओढू पाहत आहेत, हे विसरू नका. विविध विषयांचं नवीन शिक्षण, विज्ञानातील शाखोपशाखांचा अभ्यास तुम्ही नव्या पिढीला जरूर द्या, पण त्याचबरोबर साधुता, सुचिता, मांगल्य आणि मानवता यांचा उद्घोष करून चिरंतन शांतता आणि शाश्वत सुखाचे मार्ग दाखवून जीवन सर्वार्थांनी सुखी कसं करावं याची माहिती देणाऱ्या संस्कृत भाषेचंही अध्ययन, संशोधन तितक्याच तत्परतेनं व काळजीनं करा, तरच या अणुयुगाच्या, भस्मासुराच्या हातून आपला देश सुटेल. अन्यथा इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन या देशांप्रमाणं विज्ञानराक्षसाच्या कराल दाढेत आपला देशही लोटला गेल्याशिवाय राहणार नाही.

केवळ यासाठीच संस्कृत साहित्याची, काव्य-तत्त्वज्ञानाची गोडी बालपणीच

लावली पाहिजे. संस्कृत भाषा काहीशी कठीण असेल, त्या अध्ययन-अध्यापनासाठी परिश्रम करावे लागतील, पण ते केलेच पाहिजेत. कोणतंही शिक्षण क्रिकेट खेळता खेळता, विटीदांडू खेळता खेळता घेता येत नाही. मग ते गणिताचं असो, सायन्सचं असो अगर संस्कृतचं असो. आजच्या शिक्षणक्रमात परिश्रमाविना ज्ञान पैदा करणारी एक दुबळी पिढी निर्माण होऊ पाहत आहे. वेळीच तिला बलशाली केलं पाहिजे. साऱ्या जगात एक नवी संस्कृती, नवा समाज घडतो आहे, याची जाणीव मला आहे. आज चंद्रमंगळावरच स्वाऱ्या करायच्या आहेत, क्षणात सागरतळाशी तर क्षणात हिमालयाच्या शिखरांशी झुंजावयाचं आहे, हेही मला मान्य आहे, पण या साऱ्या गोष्टी करताना अंतःकरणात अखिल मानवजातीच्या कल्याणाचीच चिंता करावयाची आहे, याची जाणीव आणि प्रेरणा केवळ संस्कृत भाषा, संस्कृत साहित्य आणि त्यांतील तत्त्वज्ञानच देऊ शकेल, हे ध्यानी असू द्या !

" प्रत्येक व्यक्तीप्रमाणंच राष्ट्रालाही एक कार्य असतं. त्याचा असा स्वतंत्र जीवनोद्देश असतो. साऱ्या जगाला अध्यात्म आणि थोर जीवनमूल्य सांगण्याचं कार्य केवळ भारताला करावयाचं आहे. "— असं स्वामी विवेकानंद म्हणाले होते. शतकानुशतकं चालत आलेला हा दिव्य वारसा आपल्यालाच जपला पाहिजे. भोंगळ कल्पना, वल्गनांच्या नादी लागून आपण राष्ट्राच्या जीवनोद्देशापासून वंचित होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझं भाषण संपवितो.

● ● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७००९६ वि: निबंध
दाखल क्रमांक ९६०३ दि: २८।।५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ९८३९३
REFBK-0014393